म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३१८४

'गर्द अंधार'

पुष्पा त्रिलोकेकर



REFBK-0025140

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परतावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ जादा वर्गणी भरावी लागेल.

26 NOV 1986

14 JAN 1988

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ निबंध
३७८४
२५७४०
८८।७८।८६

गर्द अंधार

: लेखिका :

पुष्पा त्रिलोकेकर

REFBK-0025140

मनोविकास प्रकाशन मुंबई-१२

Rs 18.00

प्रकाशक :

मनोविकास प्रकाशन
३।३९, दातार बिल्डींग
साने गुरुजी मार्ग, लालबाग,
मुंबई–४०० ०१२

प्रकाशन क्रमांक– सात

प्रथम आवृत्ती ५ ऑगस्ट ८६

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

पुष्पा त्रिलोकेकर

एच–२८, न्यू आंबिवली को. ऑपरेटिव्ह हौसिंग
सोसायटी,
विरा देसाई रोड,
अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०१२

मुखपृष्ठ
दत्तात्रय पाडेकर
एल । टी–२३।२१
विजयनगर
मरोळ मरोशी रोड,
मरोळ, मुंबई–४०० ०५९

मुद्रक :
मनोहर प्रधान
सेवक मुद्रणालय
मु. पो. अलिबाग
जिल्हा रायगड

वितरण :
मनोविकास बुक सेंबर
आमदार निवास कंपाऊंड
मंत्रालयाशेजारी मुंबई–४०० ०३२

प्रस्तावना

त्याचे डोळे आता पाण्यानं भरून आलेले असतात. त्याचा शब्द जड झालेला असतो. चेहरा गहिवरून गेलेला असतो.

काही क्षण तसेच जातात. भावनांचा एक आवेग काहीसा आवरतो आणि तो एकदम उठून उभा राहतो. डॉक्टर-पेशंट असं व्यावसायिक नातं एका झटक्यात उडवून लावून तो माझ्या पाया पडतो. तरीही त्याला राहावत नाही, उठून उभा राहून तो मला कडकडून मिठी मारतो.

शब्दांची गरज संपलेली असते. स्पर्शानं संवाद केलेला असतो.

माझ्याही नकळत मी त्याच्याबरोबर दोन पावलं पुढे चालतो आणि माझ्या कन्सल्टिंगरुमच्या कक्षेबाहेर सोडतो.

कशाची आठवण झाली हे वाचून ? त्याला बाहेर सोडून मी पुन्हा आपल्या खुर्चीत येऊन बसतो. माझ्यातला मानसशास्त्रज्ञ जागा होतो. हा सगळा प्रसंग 'पाठवणी'ची आठवण करून देणारा आहे.

एका नव्या जगात, नव्या विश्वात मी त्याची पाठवणी केली होती. नर्सिंग होम, माझ्या सहवासाची पाखर सोडून तो बाहेरच्या जगात जात होता. आधाराच्या आश्वासकतेच्या कक्षा ओलांडून पलिकडच्या जगात ! आणि माझं मनही पाठवणी करणाऱ्या आईसारखं साशंक होतं. पूर्ण सुधारण्याची आशाही पल्लवित झालेली होती, तरीही शंकाकुशंकांची पाल चुकचुकत होतीच.

ब्राऊनशुगरच्या मगरमिठीतून स्वकष्टाने धडपडून बाहेर पडणाऱ्या एखाद्या तरुणाची पाठवणी करताना माझं हृदय हे अशाच भावनानी भरलेलं असतं. स्वत:च्या कौशल्यावर विश्वास नसतो म्हणून नाही, त्याच्या आत्मविश्वासाविषयी खात्री नसते म्हणूनही नाही तर ज्या जगात त्या तरुणाला पाठवायचं असतं त्या जगाविषयी खात्री वाटत नसते.

आणि हे जग असं बेभरवशाचं असतं, म्हणजे नेमकं कसं असतं ? हा 'जालिम जमाना' किती जालीम आहे याची अगदी पुरेपूर कल्पना पुष्पा त्रिलोकेकर आपल्याला या छोटेखानी पुस्तकातून देत आहेत.

खरं पाहतो, ब्राऊन शुगर किंवा अंमली पदार्थांचं तरुणांमधलं व्यसन हा एका पुस्तकाचा विषयच नव्हे. या विषयामधल्या बारकाईचा अभ्यास करायचा झाला तर त्यावर ग्रंथ लिहावे लागतील. तरीही प्रस्तुत पुस्तकातून या भयानक प्रकाराची पुरेशी कल्पना वाचकाला येऊ शकेल.

मनोविकारशास्त्राचा अभ्यास शिकवताना आमचे शिक्षक नेहमी असं म्हणायचे की मनोविकार ही पोकळीत घडणारी घटना नव्हे. मनोविकार ही एक जीवशास्त्रीय–मानसशास्त्रीय–सामाजिक (Bio-Psycho Social) घटना असते. पण मनोविकाराची ही व्याप्तीही मला चुकीची वाटू लागलेली आहे. मनोविकार ही 'जीवशास्त्रीय–मानसशास्त्रीय–सामाजिक आणि राजकीय' घटना आहे. (Bio-Psycho-Sclio-Political)

आज आपल्या सर्वांगानं राजकीयता भिडलेली आहे. शुद्ध पाणी हवं, शुद्ध हवा हवी, शुद्ध अन्न हवं, खात्रीचा निवारा हवा असेल तर त्या प्रत्येक मागणीमागे त्याचं त्याचं व्यस्त राजकारण असतं. त्यामागे अनेकांचे प्रस्थापित हितसंबंध असतात.

अशाच महाप्रचंड राजकारणानं बरबटून गेलेली ही समस्या आहे.

आपण म्हणतो जग जवळ आलंय, दूरसंचार अतिशय प्रभावी झालाय, यातायात सोपी झाल्येय. पण या जवळ येण्याचे हे अंगावर येणारे परिणाम आपल्याला चांगलेच भोवताहेत.

आणि ब्राऊन शुगर किती भीषण आणि भेसूर अवस्था निर्माण करू शकते याचं नेमकं चित्र या पुस्तकातून उभं केलेलं आहे.

पुस्तक वाचून झाल्यावर येणारा सुन्नपणा हा अर्थातच क्षणभरच टिकावा अशी अपेक्षा आहे. अनेकदा आपल्या शत्रूचं नेमकं स्वरुप काय आहे. हे समजल्यावर आपण गांगरून जातो. अगदी अर्जुनासारखा महापराक्रमी योद्धाही असाच गोंधळला होता, सुन्न झाला होता.

पण ही वेळ वैऱ्याची आहे. शत्रूचं नेमकं आकलन झालंय, आता लढा देण्याच्या योजना आखायला हव्यात आणि तशी स्फूर्तीही या पुस्तकातून मिळावी अशी अपेक्षा आहे.

प्रत्यक्ष ब्राऊन शुगरग्रस्त बांधवानी हे पुस्तक वाचलं तर त्याना हीच जाणीव होईल की एका महाप्रचंड राजकीय दुर्घटनेचे आपण बळी आहोत. पण असं जरी असलं तरी त्यानी डगमगून चालणार नाही. आपला झगडा केवळ बहिर्गत राजकीय परिस्थितीशी नसतो तर तो अंतर्गत दुबळ्या आणि कोत्या मनोवृत्तीशी असतो.

व्यक्तिगत पातळीचा विचार करायचा झाला तर इच्छाशक्ती आणि आशावाद याना पर्याय नाही. या दोन शक्तींच्या जोरावरच ब्राऊन शुगरच्या लालसेचा पाडाव करायचा असतो.

जे वाचक किनाऱ्यावर उभे आहेत, ब्राऊन शुगरचं जग त्याना खुणावतंय दम मारो दम म्हणणारं मित्र (?) मंडळ आपल्याकडे ओढतायत त्याना या पुस्तकातून धोक्याचा लाल कंदील स्पष्टपणे दिसणार आहे. साहित्यसम्राट गडकरी म्हणतात त्याप्रमाणे मद्याचा एकच प्याला घातक असतो, तसा 'एकच झुरका' घातक आणि विध्वंसक असतो.

एवढी जागृती जरी या पुस्तकानी झाली तरी पुस्तकाचा हेतू साध्य झालाय असं आपण म्हणू शकू.

–डॉ. राजेन्द्र बर्वे

श्री मेडिकेअर, ५६ सुशील टेरेस
हिन्दू कॉलनी लेन नं १
दादर टी. टी. मुंबई ४०० १४

मनोगत

गेली काही वर्षे या व्यवसायावद्दलच्या बातम्यांनी मी विलक्षण अस्वस्थ होत होते. त्यावद्दल कुतुहल म्हणून मी जी जी माहिती मिळव लागले तो तो त्यामागील कौटाळ आणि त्या प्रश्नाचे अक्राळविक्राळ स्वरुप यानी मला सुन्न करून सोडले.

हे तांतडीने लिहायला हवे, असे कुठेतरी पोटतिडकीने वाटत राहिले. हे पुस्तक मी तयार करते हे सांगितल्यावर अनेकांनी आपणहून मदतीचा हात पुढे केला. त्यात डॉ. भाल पाटील यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा.

हे पुस्तक गर्दचे व तत्सम नशेबाजीचे स्वरुप उघडे करण्याच्या दृष्टीने लिहिले आहे. त्यामुळे बारीकसारीक तपशीलाऐवजी ढोबळ रुपरेषा देऊन या प्रश्नाचे सम्यक स्वरूप सर्वसामान्य माणसाला आकलन व्हावे यावर मी भर दिला आहे.

ज्यांचे आभार मानावे त्यात आणखी एक नाव म्हणजे डॉ. राजेन्द्र बर्वे. माझा नवरा म्हणजे प्रदीप वर्मा याने एकाद्या कुशल ग्रंथपालाप्रमाणे या पुस्तकासाठी मला लागतील ते सगळे संदर्भ मिळवून दिले. पण त्याचे आभार मानणे म्हणजे स्वतःचेच आभार मानल्यासारखे ठरेल.

या पुस्तकामुळे किमान दोनचार मुले जरी गर्दपासून माघारी वळली तरी मी या लेखनाचे सार्थक मानीन !

–पुष्पा त्रिलोकेकर

परिशिष्ट

असेसिन हा इंग्रजी शब्द माहीत आहे का तुम्हाला ? असेसिन म्हणजे मारेकरी. त्याचे मूळ आहे हशीश म्हणजे चरस या शब्दात. एक डोंगरी राजा आपल्या गुलामाना 'हशीश' चारायचा व त्यांच्याकडून कुठलीही कामे करवून घ्यायचा. चरस एकदा का पोटात गेला व डोक्यात भिनला की ते त्या राजाचे नव्हेत, चरसाचे गुलाम बनत आणि त्या अंमलासाठी हवे ते काम करीत अगदी खुनापर्यंत देखील ! हशीशच्या अंमलाखाली राहणारे ते हशीशीअेन. त्याचाच पुढे अपभ्रंश होऊ असेसीन हा शब्द तयार झाला. चरस–गांजा अफूच्या व्यवहारात गुंतलेल्या माणसांसाठी इतका अचूक शब्द क्वचितच कुठे सापडेल– हशीशीअेन, असेसिन, मारेकरी.

समाजाचे, सामाजिक मूल्यांचे, उगवत्या पिढ्यांचे मारेकरी. माणसाचे मन व शरीर नपुंसक बनवणारे मारेकरी.

पण त्याच्या सुखविभ्रमात गटांगळ्या खाणाऱ्या लेखक, कलावंतानी हे अंमली पदार्थ म्हणजे प्रतिभेचा दिव्य खुराक आहे असा गवगवा करून अनेकांच्या आयुष्याची राखरांगोळी स्वतःसोबतच केली आहे.

हशीश वा हेरॉईन, अफू, गर्द यांच्यामुळे प्रतिभेला उधाण वगैरे किती प्रमाणात येते ? अजिबात येत नाही. आपल्याला भव्यदिव्य साक्षात्कार घडताहेत असे जे भास या नशेच्या अंमलाखाली होतात त्याना लेखणीद्वारे कागदावर वा कुंचल्याद्वारे कॅनव्हासवर उतरवणे आजपर्यंत कुणाही कलावंताला शक्य झालेले नाही. उलटपक्षी त्यांची कला नशेबाजीनंतर हिणकस वा कमअस्सल झाली आहे असे आढळून येते.

युरोपात लेखक–कलावंतानी सुरू केलेल्या या सुखभ्रमात फार मोठा बुद्धिवाद अडकला होता. त्यातील अनेकांची प्रतिभा नशेबाजीत पार लोपूनच गेल्याचे आढळून आले.

अशाच प्रकारे साधूसंन्यासी या चरसी 'सुखभ्रमां'ना दैवी साक्षात्कार समजतात आणि त्यांची खरीखोटी वर्णने सांगून भाविकांना झुलवतात.

व्यसनमुक्तीचा आणखी एक चांगला मार्ग मात्र आध्यात्मिक आहे.

अर्थात त्याला आध्यात्मिक म्हणण्यापेक्षा यौगिक म्हणणे अधिक श्रेयस्कर ठरेल. हा मार्ग म्हणजे प्राणायाम व ध्यानधारणा.

शवासनासारखे यौगिक आसन तुम्हाला मन स्थिरचित्र बनवायला मदत करतें आणि ध्यानधारणेतून मन पूर्णपणे मुक्त करणे शक्य होते. अंमली पदार्थ कृत्रिमरीत्या हेच घडवतात; पण त्यांच्या क्रियाप्रक्रियावर माणसाचा ताबा राहत नसल्याने पुढचा अनर्थ ओढवतो. उलट ध्यानधारणा योगासने, प्राणायाम या क्रियांवर माणसाची स्वतःची पूर्ण हुकमत राहते. त्यामुळे आपल्याला हवे त्या वेळी व हवा तितका वेळ मनाची ही उन्मनी अवस्था हुकमीपणे साधणे शक्य होते.

उपचार केंद्रात इतर उपचारांबरोबरच योगसाधना व प्राणायाम यांचे शास्त्रोक्त शिक्षण देणे नशाग्रस्तांना मनोबल देण्यास अत्यंत उपयुक्त ठरेल.

★



१

वंशवृक्ष

आपल्या फोफावत्या कुटुंबकबिल्याला माणसाने केवढी यथार्थ उपमा दिली आहे ! एक छोटसं बीज–पण ते फळले की भरारा त्यातून दोन चिमुकली पानं हातात हात घालून येतात. बघता बघता त्यांच्या सुकोमल देठाचा राठ, बळकट बुंधा होतो. झाडाच्या सगळ्या विस्ताराला मग वर्षानुवर्षे त्याचा भक्कम आधार मिळत राहतो.

बुंध्याला फांद्या फुटतात, फांद्यांना उपफांद्या–उपउपफांद्या. पानांमागून पाने, फुलांमागून फुले, फळांमागून फळे–झाडाचा संसार असा भरगच्च फुलत–फळत असतो.

पण वृक्षाचे हे जगणे काही सरळसोट नसते. आयुष्याच्या वाटचालीत कितीतरी आघात तो सोसत असतो, पचवत असतो, उन्हापावसाच्या माऱ्याला, वादळवाऱ्याला, विद्युत् थैमानाला कसोशीने तोंड देत तो भक्कम उभाच असतो. काळजात कळ उठावी तशी गेलेल्या एकेका मोसमाचे फक्त एक वर्तुळ काय ते त्याच्या उदांत गोंदले जाते–बस्स !

पण अशा भक्कम वृक्षावर कधी कधी एखादी विषवेल चढते, फोफावते, ती त्याच्या काळजातच तोंड खुपसून त्याचा सगळा जीवन-रसावर ती भक्कम व अस्ताव्यस्त फैलावते आणि तो वृक्ष ?

त्याचा बहार गळतो. फुले जागीच माना टाकतात. पाने पिवळी पडून गळू लागतात, फांद्या–उपफांद्या निष्पर्ण बोडक्या होतात, खोड वाळून शुष्क व पोकळ होते. जमिनीत खोल गेलेली मुळे आक्रसून कोरडी होतात. आणि... आणि... झाड मरते ! ठार मरते !!

ते उभे असते त्या जागेवर कालांतराने उरते ती फक्त माती आणि त्या मातीत माजलेली ती विषवेल !

वंशवृक्षांच्या बाबतही घडते, घडत असते ! आणि अलिकडे तर अशा विषवेलींनी लक्षावधी मानव समूहांच्या वंशवृक्षांना असे काही जखडले आहे की, त्यात हजारो वंशवृक्ष केव्हाच नेस्तनाबूत झाले आहेत, आणि त्यांच्या जीवनरसावर उन्मत्त बनलेल्या या विषवेलीचे जाळे अधिकाधिक मानवसमूहांना ग्रासू लागले आहे. अमेरिकेपासून ऑस्ट्रेलिया-पर्यंत जगातील फार मोठ्या लोकसंख्येला या विषवेलीने पार विळखून टाकले आहे. गेल्या काही वर्षात आपल्या भारताभोवतीदेखील तिच्या कराल पाशाचे वेढे अधिकाधिक गच्च आवळले जाऊ लागले आहेत.

आजच तिच्या प्रतापाने कोलमडून पडलेल्या वंशवृक्षांची संख्या हजारात मोजावी लागते आणि तिच्या वाढीचा वेग विचारात घेतला तर आणखी एखाद–दोन वर्षात ती लाखांनी मोजावी लागणार आहे !

वंशवृक्षाची उपमा इथे केवळ 'चूष' म्हणून वापरलेली नाही. खरोखरच हिच्यापायी अनेक कुटुंबांचा अक्षरशः निर्वंश झालेला आहे; आणि आणखी कैकांचा होऊ घातला आहे.

उपमा–उत्प्रेक्षांची आडवळणं सोडून अगदी रोखठोक भाषेत सांगायचे तर या विषवेलीचं नाव आहे 'गर्द' !

जगभर ती अनेकानेक वेगवेगळ्या नावाने परिचित आहे. खुद्द भारतातदेखील गर्दुल्यांनी प्यारमोहब्बतीखातर तिला अनेकानेक लाडकी नावे ठेवली आहेत.

पण तिचे खरेखुरे नि रोकडे नाव आहे–हेरॉईन उर्फ अफूचा अर्क ! गर्द म्हणजेच अशुद्ध हेरॉईन.

कुठे कुठे जगात इतरत्र हिच्याच जातकुळीचे आणखी एक द्रव्य थैमान घालीत आहे. त्याचे शास्त्रोक्त नाव आहे कोकेन. अफूच्या व कोकेनच्यापासून बनवलेल्या जितक्या म्हणून चिजा आहेत त्या सर्वांना व्यवहारात एकच एक नाव रूढ आहे–अंमली पदार्थ. माणसाचा मेंदू आणि शरीर यांना काबूत घेऊन पार गुलाम बनवणारे नशेखोर पदार्थ.

तीस–चाळिशीच्या पुढील वयाच्या मातापित्यांना मुळात अशा तऱ्हेचे नशा आणणारे पदार्थ जगात अस्तित्वात असतात याचीच मुळी

सुतराम कल्पना नसते. नशेबाजीचे त्यांच्या दृष्टीने एकच समीकरण असते-ते म्हणजे दारू.

दारू पिऊन झिंगलेली, रस्त्याच्या कडेला पडलेली माणसे त्यांनी खूप बघितलेली असतात. दारूमुळे एकाद्याच्या संसाराचे पार वाटोळे झाल्याचे उदाहरणदेखील त्याना माहीत असते.

पण दारू मर्यादित प्रमाणात व उंची प्रकारची घेतली तर त्याला त्यांची फारशी हरकत नसते; आणि कुठे कुठे तर प्रतिष्ठेचे व उच्चभ्रूपणाचे लक्षणच मानले जाते. बऱ्याच ठिकाणी, मुलांच्या, विशेषत: किशोरवयीन मुलांच्या बाबतीत दारूबाबत पालकांचे धोरण खूपसे उदार असते. मुलांच्या 'ड्रिंक पार्ट्या' बद्दल फारशी नाराजी दाखवली जात नाही. नोकरी करणाऱ्या सुस्थापित तरुणात तर अशा पार्ट्या अगदी नियमित होत असतात. आणि बहुधा त्या घरच्यांना सांगून सवरून होत असतात.

माझ्या ओळखीची कित्येक मुले आईवडिलांसमोर 'सन्मान' म्हणून सिगरेट ओढत नाहीत. पण त्यांच्या समवेत कॉकटेल पार्टीत दारू मात्र विनासंकोच घेतात.

तेव्हा 'गर्द' हे प्रकरणही साधारणत: याच कोटीत मोडत असावे, अशी अनेक पालकांची भाबडी समजूत असते. आणि दारू वा सिगरेटसारखे ते माफक व मर्यादित ठेवले तर काही बिघडणार नाही, असे त्यांना वाटते.

पण बहुसंख्य पालकांना तर अलिकडे अलिकडेच या शब्दाची तोंडओळख झालेली आहे, नि तीही वर्तमानपत्रांतून त्याबद्दल एकदम गवगवा झाल्यामुळे.

शिवाय वर्तमानपत्राच्या बातम्या असतात अशरीरी. 'असे कळते की, फलाण्या फलाण्या ठिकाणी अमुक एक लाख किंमतीचे अमूक एक किलो कोकेन (वा हेरॉईन वा गर्द) जप्त करण्यात आले असून पोलीस अधिक चौकशी करीत आहेत-' एकूण अशा थाटाच्या.

म्हणजे ते जे काही अमुक लाखाचे हेरॉईन असेल त्याचा आपल्या घरापर्यंत काही संबंध येऊ शकले याची सुतराम कल्पना त्यावरून येणार नाही.

पुनः 'गर्द' किंवा 'ब्राऊन शुगर' ही तर तदवत अपरिचित नावे. या नावाचे हे पदार्थ कसे व कशासाठी वापरायचे याचीही माहिती कुणाला नसते.

हा 'ब्राऊन शुगर' हे गर्दचेच एक नाव आहे.

आता याच नावाचा एक पदार्थ केकमधे वापरला जातो. त्यामुळे तर अनेकांची दांडीच उडते.

माझी बहीण घरी हौसेने व कौतुकाने केक वगैरे तयार करते. 'ब्राऊन शुगर' बद्दलचा गदारोळ ऐकून ती भलतीच चिंताक्रांत झाली. 'म्हणजे अता केकमधे ब्राऊन शुगर वापरायची नाही?' हा तिचा चिंतायुक्त प्रश्न.

तीच नाही—अगदी खूप खूप माणसे व पालक या पदार्थांबद्दल अगदी अनभिज्ञ असतात! पण त्यांची मुले किंवा पाल्य मात्र या विषयात चांगलेच जाणकार असतात.

मुंबईतील एका संघटनेने जुहू—पार्ले विभागातील पाच शाळांत मुलांची या दृष्टीने चाचपणी केली. तर 'गर्द' वा 'ब्राऊन शुगर' याबद्दल चांगली जाणकारी मुलांना असल्याचे आढळले. संस्थेने तशीच तपासणी त्यांच्या पालकांची केली. तर पालक त्याबद्दल पुरते 'ढ' निघाले! रवींद्र सिंगच्या आईबापाप्रमाणे!

रवींद्र सिंग हे नाव ऐकलंय् का तुम्ही!

भारतात प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची सूची बघितली तर त्याच्या नावावर एक पुस्तक प्रसिद्ध झालेले तुम्हाला आढळेल. 'व्हेन आय वॉज अ ड्रग अॅडिक्ट' (मी नशेबाज होतो तेव्हा—)

नशा म्हणजे काय. ती कशी येते, कशी चढते, कशी अंगात भिनते! आणि ती उतरल्यानंतर यमयातना कशा होतात याच्या प्रत्यक्षानुभावर रवींद्रने हे पुस्तक लिहिले आहे.

रवी होता दिल्लीतील एका बड्या सेनाधिकाऱ्याचा मुलगा. घरची सुवत्ता, कशाला काहीच कमी नाही. 'पॉकेटमनी म्हणून पोरासोरांचे खिसेही चांगले उबदार असायचे. दिल्लीच्या वरिष्ठ उच्चभ्रू समाजाप्रमाणे रवींद्रही इंग्रजी माध्यमाच्या एका बड्या शाळेत शिकत होता. नुसता शिकत नव्हता; चांगला हुशार होता. अभ्यासात, खेळात इतरही कार्यक्रमात.

सहावी सातवीपर्यंत सगळे कसे सुरळीत चालले होते. रवींद्रची प्रगती बघून आईबाप, भावंडे खूष होती.

एके दिवशी त्याच्याच वयाच्या कुणी दोस्ताने रवींद्रला सिगरेट दिली. 'घे–मला मजा वाटते–' रवींद्रने 'दम' घेतला; आणि मग 'दम मारो दम' च्या घातचक्रात तो भिरभिरू लागला.

नशेचा एकच झुरका–बस्स–त्यापुढे अभ्यास नको, खेळ नको, नाटक–सिनेमाची करमणूक नको, काही काही नको, फक्त एक 'दम' हवा दम.

टापटीप राहणारा रवींद्र कपड्यांकडे लक्ष देईनासा झाला. शारीरिक स्वच्छता त्याच्या खिजगणतीत राहिली नाही. अभ्यासाचा बोऱ्या वाजला. तो सतत पैशाच्या तंगीत असायचा. घरच्यादारच्याशी बोलायचा नाही.

घरच्यांनो प्रेमाने, समजुतीने, धाकदपटशाने, प्रलोभन दाखवून त्याला मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला, पण रवींद्र ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता.

तो घराला आणि घरचे त्याला अगदी पार पार उबगले होते. परिणाम अर्थातच अटळ होता. वयाच्या सोळाव्या वर्षी रवींद्र घराबाहेर पडला.

मग सुरू झाली एक दिशाहीन भटकंती. नेपाळमधील हिमालयाच्या गिरीकंदरातून थेट गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत. काळोखातून काळोखाकडे. काळोखातच संपणाऱ्या या अंधारयात्रेच्या वाटेवर त्याला कधी भेटले त्याच्यासारखेच नशेबाज सांगाती–सोबती.

कधी नुसतीच एकाकी वाटचाल, नशेची चट अशी की तिची तल्लफ वाढत्या द्रव्यानेच भागायची. नशा... आणखी नशा... पुनः वाढीव मात्रा... मग आणखीन वाढवून.

अंगावरच्या होत्या नव्हत्या त्या सगळ्या वस्तू नशेपायी मोडून टाकल्या. कपड्यांची लक्तरे झाली. लहान सहान चोऱ्या करून नशिल्या द्रव्यांसाठी पैसे मिळवावे लागले. पोलिसांची संशयित नजर पाळत ठेवू लागली. एका अड्ड्याकडून दुसऱ्या अड्ड्याकडे बिनबुडाच्या गाडग्यासारखा तो गडगडत राहिला.

पण नशेने आता रवींद्रच्या शरीराचा, मनाचा, बुद्धीचा पूर्ण कब्जा घेतला होता. नशिल्या द्रव्याचे वाढत्या प्रमाणावर, सतत वाढत्या प्रमाणावर सेवन एवढेच आयुष्य त्यापुढे उरले होते. मूक, तहान, लैंगिक सुख, कलास्वाद सारे सारे फजूल होते, व्यर्थ होते.

नशेचा दम म्हणजे रवीद्रच्या लेखी होती एक विलक्षण आनंद-यात्रा. शरीरापासून मन असे अलग व्हायचे; आणि स्वर्गीय रंगांच्या सुरांच्या महोत्सवाची सफर करायचे. या महोत्सवातील रंग कसे झगमगत्या झिलाईने झळाळत असायचे. त्यांचा झणत्कारता झिम्मा मनाला मध्ये घेऊन गरगरा फेर धरायचा. नशेचा अंमल असेस्तोवर हा स्वर्गीय रंगोत्सव चालायचा.

पण नशा कधीतरी उतरायचीच (आणि नंतर नंतर ती झटकन उतरायची. वाढती नशीली द्रव्येही पुरेही नशा आणायला समर्थ ठरायची नाहीत) मग आणखी तेज नशेची द्रव्ये शोधत फिरायचे. त्यांचीही सवय अंगवळणी पडायची. त्याच्या वाढीव मात्रा लागू पडायच्या नाहीत आणि मग...

सारे शरीर मरणकळांनी तडफडत राह्यचे. शरीराचा कणन्‌कण नशेची मागणी करीत पिळवटून उठायचा. आतडी उमळून गळ्यापर्यंत यायला धावायची. एक दम मिळावा म्हणून मन चोरी, मारामाऱ्या– एवढेच काय खूनही करायला उद्युक्त करायचे. बुद्धीत फक्त एकच विचार पिंगा घालायचा–आणखी नशेसाठी कुठे पैसे मिळतील ?

मग लोकांची खिसापाकिटे हेरत राहायचे. जीर्णशीर्ण झालेले शरीर मनाच्या हुकमतीखाली मग गुन्हेगारी व्यवहार करायचे.

चार वर्षे रवींद्रने असले नरकतुल्य आयुष्य कंठले आणि मग सगळे बळ एकवटून तो परत दिल्लीला आला–स्वत:च्या घरी.

अस्थिपंजर अवस्थेतील हा पोरगा बघून घरच्यांची अवस्था विलक्षण झाली. पण त्यांनी त्याला पोटाशी धरले. माणसातून उठलेल्या या मुलाला पुन: माणसात आणण्याचा चंग बांधला. औषधोपचार, हवापालट करीत घरच्यांनी रवींद्रचे मन विविध छंदात गुंतून राहावे म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्याला चित्रकलेत रस होता म्हणून त्यासाठी कनव्हास, रंग, इझेल घरात आली. तो अंधेमधे काहीबाही लिहायचाही.

मग रवींद्रच्या वडलांना एक कल्पना सुचली.

'तू जे अनुभवलंयस तेच का नाही लिहीस ?'

वडलांची सूचना त्याला भावली. रवींद्र लिहू लागला. कागदामागून कागद भरले. रवींद्रचे पुस्तक पुरे झाले.

पुरे झाले; पण संपले नाही ! त्याचा शोकांत शिल्लक होता–तो त्याच्यां वडलांनी लिहून पूर्ण केला !

कसा कोण जाणे; पण रवींद्र पुन: त्या जुन्याच व्यसनाच्या, नशेच्या आहारी गेला होता–जिनें त्याला आपले जन्माचे गुलाम बनवलेले होते तिला त्याचे प्राण हवे होते–ते तिने घेतले. वयाच्या वीसएक–विसाव्या वर्षी रवींद्र जराजर्जर वृद्धाच्या सुरकुतलेल्या देहाने मरण पावला !

रवींद्रच्या पुस्तकाचे अखेरचे प्रकरण मग त्याच्या वडलांनी लिहून पुरे केले. सगळ्या नशेबाज मुलांचे नि त्याच्या आईवडलांचे डोळे या उघडावेत या एकमात्र उद्दिष्टाने !

तर ही रवींद्राची कथा. पण 'गर्द' म्हणजे निव्वळ रवींद्रची गोष्ट नाही. आज हजारो, लाखो रवींद्र या जहरीलया नशेच्या जाळ्यात अडकलेले आहेत. नुसत्या भारतातच आज अशा व्यसन-

ग्रस्तांची संख्या कित्येक लाखांच्या घरात पोचली आहे; आणि सगळ्या जगभर तर कोटी त्यांची गणना करावी लागेल.

म्हणूनच अगदी संयुक्त राष्ट्र संघटनेपासून जगभरचे सर्व देश या व्यसनाविरुद्ध आज निकराने लढा देण्यास सिद्ध झालेले आहेत. पण तरीही नवनवीन माणसे वाढत्या संख्येने आज या 'गर्द'च्या विळख्यात कचकचून आवळली जात आहेत.

का ?

कारण 'गर्द'च्या विषवल्लीची मुळे राजकारण, अर्थकारण, समाजकारण, न्यायनीती यांनाही विळखून बसलेली आहेत. एकेका वेटोळ्यात समाजाचे एकेक अंग गुरफटून गेलेले आहे.

गर्दचा विळखा सोडवायचा असेल तर हे एकेक वेटोळे सर्व शक्तीनिशी सोडवून भागणार नाही. सापाचे मस्तक ठेचले तरच त्याने घातलेले विळखे सैल पडतात; तसेच गर्दचे आहे. त्याचे मुख ठेचायचे तर त्यासाठी या विषयाची समग्र माहिती करून घ्यायला हवी; तरच त्याच्याशी मुकाबला सर्व पातळीवर करता येईल.

२

'अंमली पदार्थ' ही संज्ञा आपल्याकडे अगदी अलीकडे जोरात प्रचलित झाली. तत्पूर्वी परदेशात त्याचा गवगवा होत होता; आणि हिप्पींच्या भारताबरील 'आक्रमणा'मुळे मूठभर मंडळींना त्याचा थोडाफार परिचय झाला होता एवढेच. एरवी व्यसन म्हणजे आमच्या लेखी दोनच गोष्टी असायच्या– सिगरेट व दारू. (अर्थात जुगार, रंडीबाजी ही भारी व्यसने होती; पण ती नशेबाजीच्या कोटीत मोडत नसत !)

त्यामुळे अंमली पदार्थ या संज्ञेबद्दल एकूणच भरपूर नि बऱ्याचदा पूर्ण अज्ञान असे.

अफू, गांजा, चरस, चंडोल अशी काही नावे बऱ्याच जणांनी ऐकलेली असत. पण या वस्तू नजरेने बघणारे फारच थोडे असत. अजूनही अनेक प्रौढ माणसांनी या 'चिजा' पाहिलेल्या नाहीत.

अफू, गांजा, चरस किंवा भांग ही एकाच पदार्थाची स्थानपरत्वे वेगवेगळी नावे असून त्यानाच इंग्रजीत कोकेन, मेरिजुआना, एलएसडी, मार्फीन वगैरे नावे आहेत अशी बऱ्याच जणांची समजूत असते. एवढेच काय खसखस नामक जो पदार्थ आपण मसाल्यात वा पक्वान्नात वगैरे वापरतो तिचा व अफूचा काही परस्पर संबंध आहे याचीही सुतराम कल्पना बहुतेकाना नसते.

वस्तुस्थिती अशी आहे की, खसखस म्हणजे अफूची बी. अफूची पेरणी खसखस पेरूनच केली जाते.

हशीश उर्फ गांजा उर्फ चरस हा एकच पदार्थ आहे. भांग, मेरिजुआना ही साधारणतः एकाच वर्गातील वनस्पतीपासून बनतात. मुख्यत्वे या वनस्पतीची फुले, पाने, देठ त्यासाठी वापरली जातात. या झाडाचा चीक म्हणजे चरस.

अलिकडे तुफान चर्चिले जाणारे गर्द वा 'ब्राऊन शुगर' मात्र वेगळ्या वनस्पतीपासून बनते. भारतात ही वनस्पती सर्वदूर 'अफू' म्हणून ओळखली जाते. गर्द उर्फ ब्राऊन शुगर म्हणजे अफूचा अर्क जो हेरॉईन त्याचेच अशुद्ध रूप असते ! फार प्राचीन काळापासून भारतात तिची लागवड केली जात आहे.

नशा चढवणाऱ्या या वनस्पतीत 'अल्कलाईड' नावाची काही द्रव्ये असतात. औषधशास्त्राच्या दृष्टीने ती अत्यंत मौल्यवान असतात. अल्प व नियंत्रित स्वरूपातील त्यांचा उपयोग अनेक व्याधींवर होत असतो. त्यांचा मुख्य गुण म्हणजे वेदनांचे शमन करणे, मन शांत व स्थिर करणे, निद्रा आणणे, शरीर व मनाला समाधान देणे. साहजिकच कॅन्सरपासून अनेक दुर्धर व्याधी–ग्रस्तांना या वेदनाशामक औषधांचे

फार मोठे वरदान मिळते. विविध भावनोद्रेकानी प्रक्षुब्ध बनलेल्या माणसांना त्यामुळे सुखचैन प्राप्त होते. त्यामुळे वैद्यकशास्त्रात या वनस्पतींपासून मिळणाऱ्या अनेकानेक अल्कलाईडना तुफान मागणी असते.

पण हीच द्रव्ये जर अंदाधुंदपणे वापरली वा अज्ञानी, अडाणी माणसांकडून वाटेल त्या स्वरूपात घेतली गेली तर मात्र त्यांच्यासारख्या राक्षसी वनस्पती त्याच ठरतील !

या सर्व अल्कालॉईडचे पृथक परिणाम शरीरावर होत असले तरी त्यांचा अंतिम परिणाम मात्र एकच असतो– त्यांचा वापर करणाऱ्या माणसाचे मन व शरीर त्यांचे संपूर्णपणे गुलाम बनते. म्हणूनच वैद्यकशास्त्रातदेखील अगदी निष्णात डॉक्टर अत्यंत काळजीपूर्वक त्यांचा वापर करीत असतात. आणि तरीही कित्येक दुर्धर व्याधीग्रस्त या औषधांच्या अंमलाचे आधीन होतात.

अशी ही औषधे वाण्याच्या दुकानात, पानाच्या गादीवर, ठेल्यावर, चणेकुरमुरेवाल्यांकडे सहजगत्या मिळू लागली तर ?

तर जो हाहाःकार माजेल त्याची चुणूक सध्या सर्वत्र बघायला मिळते– बघायला नव्हे; भोगायला लागते आहे.

या सर्व नशेबाज पदार्थातील अत्यंत महत्त्वाची वनस्पती म्हणजे अफू. तिच्यात चौदापंधरा अल्कलाईडस आहेत. अगदी पूर्वापारपासून तिचे ओषधी गुण व मनाला उत्तेजना देण्याचा तिचा गुणधर्म प्राचीन वैद्यकशास्त्राने ओळखला होता. वसाहतवाद व साम्राज्यवादाच्या उदयानंतर तिच्या उत्पादनाशी अर्थकारण जखडले गेले आणि व्यापारीदृष्टया अत्यंत महत्वाचे पीक म्हणून अफूची गणना होऊ लागली.

भारत हा जगातला सर्वात मोठा अफू उत्पादक देश. अगदी अलिकडे अलिकडेपर्यंत जगातील बहुतेक अफू भारत वा त्याखालोखाल तुर्कस्तान जगाला पुरवीत असत. अलिकडे मात्र अमेरिका, फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रेलिया यानीही अफूचे उत्पादन सुरू केले आहे. शिवाय अफूद्वारे

मिळणाऱ्या अल्कलाईडसपेक्षा परिणामकारक अशी अन्य रसायने कृत्रिमरीत्या बनू लागल्याने भारतीय अफूची मागणी बरीच कमी झाली आहे.

ही मागणी घटल्याने काय झाले ते नंतर वघू. तूर्तास अफूच्या लागवडीबद्दल.

भारतात उत्तर प्रदेश, राजस्थान व मध्यप्रदेश ही अफू उत्पादक राज्ये.

साधारणत: खरीप मक्याची कापणी झाली की, लागलीच खसखसीची पेरणी केली जाते.

अफू हे अत्यंत नाजूक पीक आहे. तिला माती अगदी मऊ, ढेकूळ विरहित लागते. म्हणून पेरणीपूर्वी शेत तीनचारदा चांगले नांगरून काढावे लागते.

साधारणत: साडेतीन फूट उंचीचे रोप झाले की, जानेवारीला त्याला फुले येऊ लागतात. त्या जांभळट गुलाबी फुलांचा बहार विलक्षण सुंदर व रमणीय दिसतो. या दिवसात मुंबईहून पश्चिम वा मध्य रेल्वेने राजस्थान–मध्यप्रदेशकडे निघालो तर अफूची ही मनोहारी शेते रेल्वेच्या दुतर्फा पसरलेली दिसतात.

बहार संपला की झाडावर हिरवीगार टपोरी बोंडे येतात. आता अफूच्या शेतीचे मुख्य काम सुरू होते.

भल्या पहाटे, सूर्योदयापूर्वी शेतात जाऊन नरम हिरव्या बोंडांना दोनतीन चिरा पाडल्या जातात. या चिरातून बोंडातील दाट पांढरा चिक अलगद बाहेर येऊ लागतो आणि बोंडाभोवती भरभरून साचून राहतो. हवेने, उन्हाने तो सुकून काळपट तपकिरी होतो.

दुसऱ्या दिवशी जाऊन हा चीक खरडून जमा करायचा आणि बोंडाला नव्या चिरा द्यायच्या. अशा पाच-सहा वेळा चिरा दिल्या की चीक पुरता बाहेर येतो आणि मग बोंडात फक्त खसखस खुळखुळत राहते.

हा रोजच्या रोज चीक गोळा करणे, चिरा देणे यासाठी मजुरांचे ताफे लागत असतात. त्यामुळे अफूच्या शेतीवर शेतकऱ्याखेरीज फार मोठ्या संख्येने शेतमजूरही जगत असतात.

भारतातीलच नव्हें तर जगातील सर्व अफू उत्पादन हे संयुक्त राष्ट्रांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीच होत असते. मादक, नशिल्या पदार्थांचा बेकायदा उपयोग होऊ नये म्हणून एकशेसोळा राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या अधिपत्याखाली असा करार करून हे बंधन स्वीकारले आहे. भारत हा त्यातीलच एक वचनबद्ध देश.

मनात आले की, उठावे नि अफूची शेती करावी असे कुणाला करता येत नाही. शेतात अफू पिकवायची असेल तर त्यासाठी भारत सरकारकडून खास परवाना घ्यावा लागतो. अफू पिकवण्याचे खास पट्टे भारत सरकार देत असते. आणि पिकवलेली सगळी अफू सरकारच विकत घेत असते. ती अन्य कुणालाही विकता येत नाही. अफूचे भाव सरकारने ठरविलेले असतात. सुगीच्या दिवसात अफू गोळा करणारी केन्द्रे जागोजाग उघडली जातात व तिथे रोजच्या रोज जमा होणारी अफू नेऊन द्यावी लागते.

पण इतके कडक जाचक निर्बंध असूनदेखील अधिकाधिक शेतकरी अफू पिकवण्यासाठी विलक्षण उत्सुक असतात. कारण अफू हे विलक्षण फायदा मिळवून देणारे पिक आहे.

हेक्टरी गव्हापासून साधारणत: ३६०० रु. उत्पन्न मिळते; तर उसापासून अदमासे ४६०० रु. उलट अफूचे हेक्टरी उत्पन्न असते ७५०० रुपये एवढे. त्यातील शेतकऱ्याचा लागवडीचा खर्च वजा केला तरी त्याला पाच हजार रुपये प्रतिहेक्टरी नफा मिळत असतो !

आंतरराष्ट्रीय बाजारात अफूची मागणी वाढत होती तेव्हा अफूच्या शेतीचे पट्टे अनेक शेतकऱ्यांनी मिळवले. १९७५ तें १९७९ या काळात भारतात ५३६५८ हेक्टर क्षेत्र अफूखाली होते. ती-पासून १५५·६ टन मॉर्फीन, हेरॉईन आदि शुद्ध स्वरूपातली अफू-अल्कलाईडस् मिळाली.

मंदी आल्यानंतर भारत सरकारने अफूखालची जमीन कमी केली व ती १९८०–८४ मध्ये ०४९६ हेक्टर ठेवली. या काळातील अफूजन्य अल्कलाईडस्चे उत्पादन होते १००·८ टन.

एक स्पेन सोडला तर जगातील इतर राष्ट्रांतदेखील अफूखालील क्षेत्र व अफूजन्य पदार्थाचे उत्पादन अशाच प्रकारे घटविण्यात आले. आहे.

भारताखालोखाल तुर्कस्थान हा दुसरा मोठा अफू उत्पादक देश. तिथे याच काळात अफूचे क्षेत्र ३४२२० हेक्टरर्सवरून १४३६४ हेक्टर्सवर आणण्यात आले व उत्पादन ६९·३ टनांवरून ३५·८ टनांवर उतरले.

अर्थात् युरोपमधील स्वीडन वगैरे देशात खसखशीसाठी व शोभिवंत सजावटीच्या दृष्टीने बोंडासाठी म्हणून अफूचे उत्पादन पूर्वापार होते; पण तिथल्या अफूच्या दांड्यात मार्फीनचे प्रमाण अत्यल्प असल्याने त्याचा अल्कलाईडस काढण्यासाठी उपयोग कधीच केला जात नाही.

सजावटीवरून आठवले, तुर्कस्थान व युरोपीय देशात अफूच्या बोंडांची नक्षी कशिदा यासाठी फार मोठ्या प्रमाणात केला जातो. माथ्यावर पुष्पकेसरांचा मुकुट धारण केलेली ही हिरवीगार टपोरी बोंडे विलक्षण रमणीय दिसतात नि कलासक्त मनाला भुरळ घालतात यात शंकाच नाही. नाहीतरी सगळ्या जीवघेण्या गोष्टी अशाच भुरळ पाडणाऱ्या असतात म्हणा ! धत्तुरा (किंवा धोत्रा) वा बेशरम नावाची विषारी फुले काय कमी सुंदर असतात ?

अफूची मागणी घटण्याचे मुख्य कारण म्हणजे अफूजन्य अल्कलॉईडसची– यात कोडीन, मार्फिन, डायहायड्रोकोडीन, फोंकोडाईन, एथिलमॉर्फीन, मॉर्फीन यांची जागतिक गरज १९० टनांवरच गेली, काही वर्षे स्थिरावली आहे. आणि नवनवे देश अफू उत्पादनात स्वयंपूर्ण व्हावे म्हणून झटत असल्याने भारत व तुर्कस्थान या मुख्य परंपरागत अफू नियातदार देशांना त्याचा फटका बसला आहे.

इथे आणखी एक मोठी गोची होऊन बसली आहे. या व्यवसायावर फार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे जीवन अवलंबून आहे; तसेच शेत-मजुराचे देखील. त्यामुळे तडकाफडकी अफूखालील क्षेत्र घटवणे अत्यंत जिकीरीचे झाले आहे. गेल्या काही वर्षात क्रांतिकारी कृषिसुधारणा, खते सुधारित बीबियाणे व रासायनिक आदीमुळे एकूणच कृषि-उत्पादनात विक्रमी उच्चांक गाठले गेले. तसेच अफूबाबत झालेले क्षेत्र कमी झाले तरी अफूचे प्रतिहेक्टर उत्पादन वाढतच राहिले.

आधीच मागणी नसल्याने सरकारी गोदामात अफूचे साठे साचत राहिलेले होते. त्यात या नव्या विक्रमी उत्पादनाची भर पडत राहिली. गोदाम भरभरून वाहू लागली. नवा माल ठेवायचा कुठे, हा प्रश्न सरकारी अधिकाऱ्यांना सतावू लागला.

सरकार हे अफूचे एकमात्र गिऱ्हाईक होते. पण शेतकऱ्यांना अफूची ठराविक किंमत द्यायला ते बांधील होते. अफू-उत्पादक शेतकऱ्याला कमी किंमत देऊन उत्तर प्रदेश. मध्य प्रदेश व राजस्थान या तीन हिंदीभाषी राज्यात असंतोष माजवणे सत्तारूढ काँग्रेस सरकारला परवडणारेच नव्हते. कारण ही हिंदीभाषिक राज्ये हाच मुख्यत्वे या सरकारचा कणा होता !

पण अफू उत्पादन वा मागणी यांच्या संदर्भातले हे चढउतार होत होते. अधिकृत क्षेत्रात– जिथे अफूची खरेदी-विक्री, उत्पादन व शुद्धीकरण हे अधिकृत सरकारे व त्यांच्या परवानेप्राप्त कंपन्या यांच्या अखत्यारीत होते.

पण जगात अशी काही क्षेत्रे होती की, जिथे अफूचे उत्पादन शुद्धीकरण, व्यापार व नेआण यांवर कुठलेच अधिकृत नियंत्रण नव्हते नव्हे या अफूच्या तुफानी तेजाळ व्यवहारात एक जबरदस्त आंतरराष्ट्रीय कौटाळ भक्कमपणे उभे राहिलेले होते. त्याची अफूचीच नव्हे तर एकूणच अंमली पदार्थांची भूक विलक्षण राक्षसी होती. या चोरट्या

अंमली पदार्थांच्या आधारावर त्यांच्या मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय संघटना देशोदेशी तयार झालेल्या होत्या. चोरटचा मालाची नेआण करण्याची व्यवस्था भक्कम उभी राहिलेली होती; आणि त्याना संरक्षण देणाऱ्या अत्यंत निर्दय अशी गुन्हेगारी यंत्रणाही जय्यत तयार होती !

भारतातील अफूचे वाढते साठे त्याना हवे होते; पण मुख्यत्वे त्याना हवी होती त्यांच्या चोरटचा माल ला एक उतारपेठ.

भारत त्या दृष्टीने अत्यंत मोक्याचा होता. त्याला प्रचंड सागरकिनारा लाभलेला आहे. आसेतू हिमाचल पसरलेल्या या खंडप्राय देशाच्या सीमा मध्यपूर्व व आग्नेय आशिया या दोन महत्त्वाच्या भूभागाना भिडलेल्या आहेत. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाण्याला तिथे कुठेही प्रतिबंध होत नाही. विषम अर्थव्यवस्थेमुळे इथली लोकसंख्या सतत हलती असते. शहरांकडे गर्दीचे प्रचंड लोंढे एखाद्या महापुराप्रमाणे सूसाटत निघालेले असतात. ही सततची हलती (मोबाहिल) लोकसंख्या हे गुन्हेगारीचे अत्यंत मजबूत असे संरक्षण असते.

या सर्व कारणाखेरीज आणखीही महत्त्वाचे कारण भारताची निवड करण्यामागे होते. ते म्हणजे प्रचलित राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे इथल्या लोकवस्तीत सतत वाढत राहिलेले प्रचंड ताणतणाव अशी ताणावाखाली जगणारी लोकवस्ती हीच तर अंमली पदार्थांची सर्वात मोठी बाजारपेठ असते.

अशी कोणती परिस्थिती उद्‌भवली होती त्यामुळे भारताकडे या मंडळींची नजर वळली ?

त्यासाठी जरा मागे जायला पाहिजे. तरच अफूच्या व्यसनाला पद्धतशीर खतपाणी घालून कुणी कसे वाढवले याची कल्पना येऊ शकेल. त्यामागे दडलेले हिडीस राजकारण लक्षात येऊ शकेल.

३

नशा आणणारे पदार्थ माणसाला अगदी फार पूर्वापारपासून माहीत आहेत. कारण माणूस हे अखेर निसर्गाचेच बाळ आहे. निसर्गाशी त्याची नाळ जोवर तुटलेली नव्हती तोपर्यंत 'वृक्षवल्ली' हेच त्याचे सोयरेधायरे, सखेसांगाती होते ते त्याला अन्न पुरवीत, वस्त्रे पुरवीत, निवारा देत व औषधपाणीही पुरवीत. झाडपाल्याचा अखंड शोध घेताना त्याला अनेकानेक उत्तेजक पदार्थांचा शोध लागला. चहा, कॉफी, कोको, कोका, तंबाखू तशीच अफू त्याच्या परिचयाची झाली. त्याचे औषधी गुण ज्ञात झाले. मनाला उत्तेजना देणारी भांगेची पाने तो सणासुदीला थंडाईत वापरून चार घटका स्वतःची व इतरांची करमणूक करू लागला. अफूच्या चारणाने किरकिरे मूल रडायचे थांबते हे कष्टकरी गावंढळ बाईलाही समजायला लागले. गांजाची पाने चिलमीत घालून ओढली तर त्याने जी 'तार' लागते त्यात रोजच्या विवंचनांचा घडीभर विसर पडून वेगळेच सुखभ्रम दोनचार घटका भोगता येतात हेही आमच्या आदिम माणसाला समजले होते.

पण तरी अफू हे प्राचीन भारताचे देखील एक महत्त्वाचे पीक होते. एकतर खसखस हा मसाल्याचा पदार्थ जगभर लोकप्रिय होता व युनानी वैद्यकात देखील अफूला मागणी असायची पण व्यापारी पीक म्हणून त्याला जी महत्ता प्राप्त झाली ती मात्र वसाहतवादाच्या काळात. ईस्ट इंडिया कंपनीने अफूचे व्यापारी महत्त्व प्रथम ओळखून भारतातील तिचे उत्पादन, शुद्धीकरण व व्यापार यांच्यावर स्वतःचे संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित केले. या ईस्ट इंडिया कंपनीने भारत व चीन यांच्याशी होणाऱ्या व्यापारात स्वतःचा एकाधिकार निर्माण केला.

वसाहतवाद कशावर पोसला जायचा ? तर वसाहतीतील कच्चा माल स्वत: प्रक्रिया करून पक्का बनवायचा व तो वसाहतीतील व इतरत्र दामदुपटीने विकून वारेमाप नफा कमवायचा. या पद्धतीने त्यानी भारतातील परंपरागत वस्त्रोद्योग देशोधडीला लावला होता; आणि विदेशी कापड इथल्या बाजारपेठात लादले होते.

इंग्लंडमध्ये यंत्रांच्या साह्याने भारतीय कापसापासून जेवढे कापड वनायचे ते सगळेच्या सगळे इथल्या बाजारपेठात जिरायचे नाही. तेव्हा मग या कापडासाठी ईस्ट इंडिया कंपचीने आपला मोर्चा चीनकडे वळवला.

चीनमध्ये तेव्हा पिंग सम्राट गादीवर होते. अवाढव्य चीन आणि त्याची अफाट लोकसंख्या याचे नियंत्रण सम्राट प्रांतिक अधिकाऱ्यांकरवी करायचा. चिनी सरदारदरकदार विलक्षण सुखलोलुप व सत्तास्पर्धेने ग्रासलेले होते. नोकरशाही आडमुठी व भ्रष्ट होती. पण चीनची परंपरागत व्यवस्था अशी होती की सर्वसामान्य हलाखीत जगत असला तरी अन्नवस्त्राबाबतीत स्वयंपूर्ण होता. पुरुषाने शेती करायची आणि बाईने घरच्या घरी सूत तयार करून विणून वस्त्रे बनवायची अशी व्यवस्था होती. पोटाला जेमतेम खाऊन उरेल ते बाकी सर्व मुळी सरकारी सारा भरण्यातच खर्च व्हायचे. त्यामुळे सर्वसामान्य चिनी शेतकऱ्याकडे क्रयशक्ती जवळ जवळ नव्हतीच असे म्हटले तरी चालेल.

त्यामुळे हिंदुस्थानी कापडाला चिनी बाजारपेठेत विकण्याचा ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकार यांचा प्रयत्न पुरता विफल झाला.

चीन हा चहाचा प्रमुख उत्पादक; आणि चहा हे ब्रिटनचे मुख्य पेय. शिवाय चिनी रेशीम जगप्रसिद्ध. इंग्लंड–युरोपात त्याला जबरदस्त मागणी होती.

चिनी व्यापाराची आणखी एक गोची होती. चीनशी त्याकाळचा सर्व व्यापार चांदीच्या शिक्क्यात चालायचा. माल घ्या, चांदी द्या– माल द्या चांदी न्या :

ब्रिटनकडे चीनला विकण्याजोगी एकच गोष्ट होती. ती म्हणजे लोकरी कपडे; आणि धातूच्या वस्तू. इंग्लीश मखमल वगैरे कापडे थोडीफार संपायची. पण सर्वसाधारणत: इंग्लंड–चीनच्या व्यवहारात 'चांदी' झाली होती ती चीनचीच. कारण चीन जेवढा माल घ्यायचा त्याच्या दसपट किंमतीचा माल इंग्लंडला चीनकडून घ्यावा लागायचा. त्यामुळे चांदीची अक्षरश: एकतर्फीच वाहतूक व्हायची. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस दहा ते चाळीस लाख चांदीची नाणी इंग्लंडशी होणाऱ्या व्यापारात चीनला मिळत असत.

युरोपीय वसाहतवाद्यांच्या इतरत्र होणाऱ्या कारवाया विचारात घेऊन चिनी सम्राटानी आणखी एक गोष्ट अत्यंत विचारपूर्वक ठरवली होती, त्यानी फक्त कॅन्टन हे एकच बंदर परदेशी व्यापारासाठी खुले ठेवलेले होते.

चीन हा भारताकडून पूर्वापार अफू घेत असे. ही अफू अर्थातच मुख्यत्वे औषधासाठी व थोडीफार सरदार–दरकदारांच्या अफीमबाजी-साठी वापरली जायची. वरिष्ठ वर्तुळातून अफूचे व्यसन हलके हलके सरकारी नोकर व अधिकाऱ्यांत झिरपू लागले होते.

इतर कुठलाच माल संपत नाही असे बघून मग ईस्ट इंडिया कंपनीने चीनमध्ये चोरून अफू पाठवायला सुरूवात केली. अमेरिकेहून काही धाडशी मंडळी चीनमध्ये नशीब काढायला आली होती. त्यानी कंपनीच्या मध्यस्थाचे काम केले. अफू हलके हलके चीनमध्ये झिरपू लागली. तशी सर्वसामान्य माणसेही या व्यसनाची शिकार बनू लागली. अफूचे वाढते व्यसन चिनी समाजधुरीणाना चिंतित करू लागले तेव्हा मग अफूला पायबंद घालण्याचा विचार सरकार करू लागले. अनेक वेळा अफूच्या आयातीवर बंदी घातली गेली. भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे उठवली गेली.

या अफूच्या व्यसनाने अखेर ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटन याना जे हवे ते साध्य झाले. चीन–इंग्लंड व्यापारात आता चांदीचा उलटा

प्रवाह सुरू झाला. अफूच्या बदल्यात चीनमधून चांदी इंग्लंडला जाण्याचे प्रमाण एवढे वाढले की, चिनी अर्थव्यवस्था पार डबघाईला आली. एरवी सहाशे ते सातशे तांब्याच्या नाण्यांबदल्यात चांदीचा चिनी शिक्का ताएल मिळायचा. अफूच्या आक्रमणानंतर एका ताएलची किंमत सोळाशे–सतराशे तांब्याची नाणी एवढी चढली.

या चलनवाढीने सर्वसामान्य शेतकरी पारच धुवून निघाला. कारण त्याला शेतसारा भरावा लागे चांदीच्या ताएलमधे. आणि या चलनवाढीमुळे त्याच्या कृषिमालाची किंमत इतकी घसरून गेली होती की, सारयासाठी आवश्यक ते ताएल मिळविण्यासाठी त्याला अक्षरशः घरदार, बायका–पोरे गहाण ठेवावी लागत. या सर्वांवर अर्थातच मूक अक्सीर तोडगा होता– अफू खा नि जीव द्या ! किमान-पक्षी सगळ्या यातना, विवंचना काळज्या विसरून जा.

परिस्थिती इतकी कडोविकडीची झाली तेव्हा मग सर्वसामान्य जनताच बंड करून उठली. अफूची आयात थांबवा असा देशभर जोरदार उठाव सुरू झाला. ब्रिटिश–अमेरिकन व्यापाऱ्यांची गोदामे लोक जाळूफोडू लागले. तेव्हा मग सरकारने अफूची आयात बंद केली.

पण ब्रिटिशांचा उन्मत्तपणा असा की, ते भर समुद्रात अफूची जहाजे नांगरून ठेवीत. आणि तिथून लहान होडक्यातून माल चीनमध्ये पाठवीत. एकेका वेळी वीसवीस अफूवाली जहाजे समुद्रात तळ ठोकून असत.

यातूनच जगातले कुप्रसिद्ध 'अफू–युद्ध' झाले. १८४० ते १८४२ या दोन वर्षात सुसज्ज ब्रिटिश आरमाराने चीनशी घनघोर लढाई केली आणि अखेर मकाव नदीच्या मुखावरचे हाँगकाँग स्वतःच्या ताब्यात घेतले.

भारतीय अफूच्या आधारे जगात लढले गेलेले हे अशा धर्तीचे पहिले युद्ध. अंमली पदार्थ हे राष्ट्रे नेस्तनाबूत करण्याचे एक महत्त्वाचे हत्यारच जणू या निमित्ताने भांडवलशाही जगाला सापडले. आज हे हत्यार जगातील अतिक्रूर, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांच्या हाती आले आहे.

गुन्हेगारांना देश नसतो, धर्म नसतो हे खरे; पण त्यांना बाजू घेता येतात; आणि या बाजू निव्वळ धनवंताच्या असतात.

'अफू'ला मातीत उगवणारा काळा हिरा अशी एक संज्ञा आहे. वसाहतवादी ब्रिटिशांना खरोखरच तिच्या रूपाने हिऱ्यांची खाणच गवसली होती.

१८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी अफूवर केवढा प्रचंड नफा कमवायची तेही बघण्यासारखे आहे. उत्तम प्रतीच्या अफूच्या पेटीला तेव्हा २३७ रुपयाना पडत असे. कंपनी जेव्हा लिलावात ती विकायची तेव्हा तिचो किंमत व्हायची २४२८ रु. अफूवर तेव्हा जबरदस्त म्हणजे तीनशे टक्के कर असे. हा कर म्हणजे ब्रिटिश सरकारचे अत्यंत मोलाचे उत्पन्न असे.

विल्यम जार्डीने हा अत्यंत बलाढ्य अफू व्यापारी होता. एका खाजगी पत्रात त्याने अफूच्या एकेका पेटीवर एकहजार पौंड निव्वळ नफा झाल्याचे नमूद केले आहे. अफूवर कमावलेल्या या अफाट संपत्तीच्या आधारावर हा जार्डीन नंतर ब्रिटिश पार्लमेंटमध्ये निवडून आला.

आणखी एक अफू व्यापारी– जेम्स मॅथेसन चीनहून गाशा गुंडाळून ब्रिटनला गेला तेव्हा त्याने स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर एक बेटच विकत घेतले व तिथे स्वत:साठी ३२९००० पौंड किंमतीचा एक भव्य प्रासाद बांधला. या मॅथेसनला राणी व्हिक्टोरियाने नंतर 'सरदारी' बहाल केली.

अफू केवढे अफाट धन मिळवून देते त्याचे हे सुमारे शंभरसव्वाशे वर्षापूर्वीचे किस्स, आज या अफूचा, अफूचा म्हणण्यापेक्षा अफूजन्य पदार्थांचा जो आंतरराष्ट्रीय धुमाकूळ सुरू आहे त्यातून किती प्रचंड पैसे मिळत असतील याची कल्पनाच केलेली बरी :

अलिकडे हेरॉइन, चरस, कोकेन, गर्द यांचा चोरटा माल पकडल्याच्या ज्या बातम्या वरचेवर येतात त्यात त्या मालाची एकेका वेळची किंमत लाखो रुपयांची असते. आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तर ती चौपट–पाचपटीने वाढत असते.

हा जो माल पकडला जातो तो प्रसारात असलेल्या एकूण मालाच्या एक टक्कासुद्धा नसतो असे जाणकारांचे म्हणणे आहे. म्हणजे किती रुपयाचे अंमली पदार्थ या देशात शिरत आहेत ते बघा !

एवढा प्रचंड माल येतो कुठून ? कोण आणते ? कसा आणते ? आणि कशासाठी आणते ?

सबुरीने, जरा सबुरीने या एकेका प्रश्नाचा परामर्ष घेऊ या.

प्रश्न पहिला : माल येतो कुठून ?

भारत व तुर्कस्थान हे जगातले दोन प्रमुख अफूउत्पादक देश आहेत. पण त्यांचे उत्पादन संयुक्त राष्ट्रांच्या देखरेखीखाली होते आणि त्या उत्पादनावर त्या त्या सरकारची नजर असल्याने अधिकृत मालातील फारच थोडा माल चोरट्या व्यापाऱ्यांच्या हातीं पडतो.

अफू गोळा केल्यानंतर आणि खसखस वेचल्यानंतर जे दांडे, पोकळ बोंडे वगैरे कचरा राहतो तो उकळून त्यापासून पेय बनवण्यात येते. पण त्यासाठीही परवाना लागतो. त्यामुळे भारत वा तुर्कस्तानमध्ये चोरटी अफू प्रचंड प्रमाणावर मिळणे कठीण आहे.

पण भारताच्या अगदी सीमांजवळच अफूचे चोरटे उत्पादन करणारी दोन मोठी केंद्रे आहेत. चोरट्या अफू–व्यवहारात त्यानी दोन यथार्थ संज्ञा आहेत– सुवर्णत्रिकोण व सुवर्णचंद्रकोर.

सुवर्ण त्रिकोण म्हणजे लाओस, ब्रह्मदेश व थायलंड या तीन देशांच्या सीमेवरचा डोंगराळ भाग. या दुर्गम भागात मुख्यत्वे आदिवासी राहतात; आणि त्यावर कुठल्याच देशाचे कायद्याचे राज्य नाही. हे आदिवासी तिथे अफू पिकवत आणि जीवनावश्यक वस्तूच्या मोबदल्यात ती फुकापासरी विकून टाकत.

आदिवासींना तिचे मोल समजलेले नसले तरी तिची खरी किंमत जाणणारे व्यापारी हाँगकाँगमधे बसलेले होतेच. त्यानी या आदिवासींना अफू–उत्पादन वाढवण्यासाठी प्रोत्साहन दिले; आणि सुवर्ण–त्रिकोण भरमसाट अफू पिकवू लागला– अगदी अनियंत्रितपणे. हाँगकाँगच्या व्यापाऱ्यांनी मग ब्रह्मदेश–लाओसच्या सीमांवर अफूपासून हेरॉईन

बनवण्याचे कारखाने उभारले आणि करोडो रुपयांचे हेरॉइन तिथे तयार होऊ लागले.

पण हाँगकाँगच्या चोरट्या व्यापाऱ्याचे नशीब असे बलवत्तर की, अमेरिकेने आग्नेय आशिया ही रणभूमी करण्याचे ठरवले. तिथल्या कित्येक देशात हजारोनी अमेरिकन कोवळे सैनिक ठाण मांडून बसले. त्यातच व्हिएतनाम युद्ध सुरू झाले; आणि तब्बल चौदा वर्षे धगधगत राहिले. अमेरिकन सैन्याच्या झुंडीमागून झुंडी तिथे येऊन भडकू लागल्या. त्यांच्या रूपाने ही भली थोरली बाजारपेठ चोरट्या व्यापाऱ्यांना उपलब्ध झाली.

पराजयानंतर माघारी गेलेल्या अमेरिकन सैनिकांनी हेही पदार्थ बरोबर नेले आणि या व्यवहारासाठी युरोपबरोबरच अमेरिकेची विस्तृत बाजारपेठ खुली झाली.

पण ब्रिटिश सरकार संयुक्त राष्ट्रांबरोबर कराराने वचनबद्ध होते. हाँगकाँगमधील चोरट्या व्यापाऱ्यांना असे मोकळे रान देणे त्याला परवडणारे नव्हते. त्यात पुनः युरोपीय राष्ट्रांचा दबाव ब्रिटनवर येत राहिल्याने हाँगकाँगमधली सुरक्षा व्यवस्था त्याने आवळून घेतली. तेव्हा मग हा माल ब्रह्मदेश, नेपाळकडे वळविण्यात आला आणि नेपाळमार्गे भारतात येऊ लागला. भारतात आलेला हा माल मग दिल्ली, कलकत्ता या विमानतळावरून ईप्सित स्थळी उड्डाण करायचा.

पण गेली काही वर्षे सुवर्ण त्रिकोणाला अवर्षणाचा तडाखा बसला; आणि तिथले अफूचे उत्पादन प्रचंड घटले. त्यात संयुक्त राष्ट्रांच्या दडपणामुळे ब्रह्मदेश–थायलंडच्या सीमेवरील हेरॉइनचे कारखाने बंद पडले. ब्रिटिश पोलिसांनी अंमली पदार्थांविरुद्धची कायदे–यंत्रणा अधिकाधिक गच्च आवळायला सुरूवात केली. त्यामुळे हाँगकाँगमधील चोरट्या व्यापाराच्या बादशहांनी तिथून सूंबाल्या ठोकायला सुरूवात केली. त्यामुळे सुवर्ण–त्रिकोणातील मालाचा पुरवठा चोरट्या स्मगलरांना नियमित व पुरेशा स्वरूपात होईना. त्यामुळे अत्यंत तातडीने नवे पुरवठा–केंद्र धुंडाळणे अत्यावश्यक बनले होते.

पण स्मगलर वगैरे मंडळी ही अत्यंत चलाख असतात. नव्हे असे चलाख असणे ही त्यांच्या धंद्याची एक महत्वाची गरजच असते. कायदा–यंत्रणेच्या 'एक पाऊल पुढे' हे त्यांच्या धंद्याचे मुख्य सूत्रच असते. त्यामुळे ते तहान लागल्यावर विहीर खणत नाहीत; सध्याची विहीर आटेल, दूषित होईल हे आधीच गृहित धरून पाण्याच्या नव्या साठ्याची आगाऊच तरतूद करतात !

तर या स्मगलर मंडळींनी आणखी एक अफू–उत्पादक केंद्र आधीच हेरून ठेवलेले होते. सुवर्ण–त्रिकोण होता भारताच्या ईशान्य सीमेनजीक; तर हे नवे केंद्र होते वायव्य बाजूस. चोरटी अफू पिकविण्यासाठी तिथे उत्तम वातावरण होते.

चोरट्या अफूसाठी कायमचे वेगळे हवामान लागते ? होय– हे हवामान भौगोलिक नसते; राजकीय असते. त्या दृष्टीने भारताच्या वायव्य सीमांवर ज्या आंतरराष्ट्रीय घडामोडी घडत होत्या त्या या गुन्हेगारी व्यवहाराला पोषक अशाच होत्या.

मध्यपूर्वेत नानाविध तऱ्हेचे तणाव त्यावेळी निर्माण झालेले होते आणि इराण ते तुर्कस्थानपर्यंत त्यांचे हादरे बसत होते. त्यातच इराणमधील अंतर्गत संघर्ष अगदी शिगेला पोहोचला होता. इराणच्या शहा विरुद्ध प्रचंड काहूर तेथल्या जनतेत माजले होते. आज ना उद्या शहा व त्यांचे भ्रष्ट नातेवाईक नि नोकरशहा यांना सत्ताच काय इराणही सोडून जावे लागणार याची स्पष्ट चिन्हे दिसत होती. या सर्व संबंधित व्यक्तीनादेखील याची आगाऊ कल्पना आलीच होती. त्यामुळें या ना त्या प्रकारे देशात निर्माण होणारी संपत्ती व पैसा आंतरराष्ट्रीय चलनात बदलून स्वतःसाठी परदेशात सुरक्षित ठेवण्याची आटोकाट धडपड त्यांनी चालवली होती. संपूर्ण देशाची अवस्था त्यामुळे पार दिवाळखोरीची बनली होती. प्रशासन पार कोलमडले होते. ज्याला जमेल तसा पैसा निर्माण करणे यासाठी प्रत्येकजण जमेल तो मार्ग काढीत होता.

हिंदुकुश पर्वतराजीच्या कुशीतील इराणी शेतकऱ्यांनी अफू-उत्पादनाचा मार्ग पत्करला. या चोरट्या अफूला काळ्या बाजारात भरपूर व झटपट किंमत मिळायची.

शेजारच्या अफगाणिस्तानात देखील राजकीय अस्थिरता अशाच कारणांमुळे चोरट्या अफू उत्पादनाला फायदेशीर ठरली नि त्यालगत होते पाकिस्तान. तिथे सततच्या लष्करी क्रांत्या. भारत-पाक युद्धांच्या फेरी, राजकीय असंतोषाचे वातावरण यामुळे राजकीय वातावरण तणातणीचे होते. सिंधपासून पठाणबलुचीपर्यंत फुटीरवादी चळवळी जोरात होत्या. या चळवळींना लागणारा पैसा अर्थातच चोरटी अफू देऊ शकत होती. सुदैवाने इराण-अफगाणिस्तानातून पाकिस्तानातील वायव्य सरहद्द प्रांतात हिंदुकुश पर्वतराजीचा अफू-लागवडीस योग्य असा पट्टा उरला होता.

हा पट्टा म्हणजेच चोरट्या अफूव्यवहारातील 'सुवर्ण चंद्रकोर.' सोने पिकवणारी चंद्रकोर. या पट्ट्यात पिकणाऱ्या मालाची उतारपेठ साहजिकच पाकिस्तान होती. पाकिस्तान हे त्यामुळे हेरॉईनच्या चोरट्या निर्यातीचे प्रमुख केंद्र बनले. अमेरिका, युरोप, मध्यपूर्वेत तिथून अंमली पदार्थ पोचवले जाऊ लागले.

अमेरिकेत अंमली पदार्थांचे जबरदस्त आक्रमण कोकेनच्या रूपाने दक्षिण अमेरिकेकडून होतच होते. जवळ जवळ घरटी एक या प्रमाणावर अमेरिकन माणसे या व्यसनाच्या आधीन होत होती; आणि तरीही अंमली पदार्थांच्या नशेबाजीचे व्यसन भयानक पद्धतीने वाढतच होते. या संकटाशी मुकाबला करण्याचे शर्थीचे प्रयत्न अमेरिका करीत असतानाच पाकिस्तानमार्फत हे नवे 'आक्रमण' अमेरिकन जनतेवर होऊ लागले.

पण अमेरिकेला हे 'आक्रमण' सोपवण्याचा अवसीर इलाज माहीत होता. पाकिस्तान सरकार त्यांच्या हातातले बाहुले होते. शस्त्रास्त्रांची मदत पूर्णपणे थांबवू अशी कठोर धमकी देऊन अमेरिकेने पाक

सरकारला देशातील चोरट्या अंमली व्यवहारावर कडक इलाज करण्याचा आदेश दिला.

ईप्सित परिणाम त्वरित साध्य झाला. पाक सरकारला चोरट्या अंमली व्यापारापेक्षा 'शस्त्रास्त्रांचा' व्यवहार अतीव महत्त्वाचा वाटत होता. त्याने तात्काळ कडक उपाययोजना केली आणि स्मगलरांचे व्यवहार बंद पाडले.

ह्या वेळपर्यंत सुवर्ण–त्रिकोणातील भौगोलिक संकट निवलेले होते. अफूचे उत्पादन तिथे पुनः जोरात सुरू झालेले होते. चंद्रकोरीच्या पट्ट्यात अफू पिकतच होती; आणि खुद्द भारतात अफूचे अवाढव्य साठे साचून पडलेले होते. सालोनी अफूचे विक्रमी पीक निघत होते, त्याचे काय करायचे ही जबरदस्त डोकेदुखी सरकारी अधिकाऱ्यांना सतावत होती; नि अफूला पूर्वीसारखा भाव कसा मिळेल याची विवंचना उत्पादक शेतकऱ्याना पडली होती.

भारतातील राजकीय परिस्थिती सर्वदूर कमालीची अस्वस्थ होती. माणसामाणसात संशयाचे, कलहाचे वातावरण फैलावलेले होते. पंजाब, गुजरात आसाम, दिल्ली, मुंबई महाराष्ट्र एका मागोमाग एक दंगलीचे उद्रेक होत होते शहराचे प्रश्न उग्रतम बनत होते. भ्रष्टाचाराला ऊत आलेला होता. राजकीय अस्थिरता प्रत्येक राज्यात माजलेली होती. नानाविध कारणांनी जनतेत हरतऱ्हेचे असंतोष धुमसत होते.

थोडक्यात म्हणजे गुन्हेगारीला अत्यंत पोषक असेच हे वातावरण होते. अशा वातावरणात चोरट्या अंमली पदार्थांची 'पेठ' भारतात नेण्याचे कुठल्याही ढढ्ढम गुन्हेगाराला सुचले असते. मग हे तर या व्यवहारात जगातील पहिल्या दर्जाचे अव्वल गुन्हेगार गुंतलेले होते. त्याना हे का सुचणार नाही !

सुवर्णत्रिकोण व सुवर्ण चंद्रकोर येथील चोरट्या मालाचा अविरत ओघ भारताकडे व तिथून जगभर सुरू झाला आणि 'गर्द' उर्फ हेराईन उर्फ अफू यांचे सर्वात भयावह पर्व सुरू झाले !

3968

४

'उतारपेठ'चा व्यावहारिक अर्थ आहे मालाची चढउतार करण्याची जागा. एका ठिकाणाहून आलेला माल उतरून घ्यायचा आणि तो पुढे ईप्सित स्थळी रवाना करायचा.

पण नशिल्या पदार्थांच्या उतारपेठेत एवढेच नाही घडत. तिथे तो माल स्थानिक बाजारपेठातही झिरपत असतो. अशा प्रकारे चोरट्या अंमली पदार्थांच्या ने-आणिचे आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून भारताचे स्थान मुक्रर करण्यात आले आणि इथल्या बाजारपेठात हे पदार्थ झपाट्याने फैलावू लागले. 'झपाट्याने फैलावू लागले' हा शब्दप्रयोग या संदर्भात अत्यंत थिटा आहे !

पर्यावरण संदर्भात एक कोडेवजा उदाहरण दिले जाते. तेच या संदर्भातदेखील सांगता येईल.

एक होते तळे. त्या तळ्यात एक विवक्षित विषारी वनस्पती जली, वाढू लागली. या वनस्पतीचे एक गंमतीदार वैशिष्ट्य होते. या वनस्पतीची पाने एका विवक्षित गतीने वाढायची. म्हणजे असे– आज एक पान असेल तर उद्या त्याची दोन पाने व्हायची. दुसऱ्या दिवशी दोनाची चार व्हायची. चाराचो आठ, आठाची सोळा, सोळाची बत्तीस अशी दुप्पटीच्या गतीने ती वाढत जायची. वाढता वाढता एकोणतीसाव्या दिवशी या वनस्पतीने ते निम्मे तळे व्यापले. पर्यावरण प्रश्न असा की या गतीने ते सगळे तळे कोणत्या दिवशी व्यापले जाईल ?

आता हा काही मोठा तल्लख प्रश्न नव्हे. थोडासा तर्क वापरला तर त्याचे चट्कन उत्तर देता येईल. आणि ते उत्तर मात्र हादरून टाकणारे असेल !

तळे पूर्ण कधी भरेल ? उत्तर तिसाव्या दिवशी. म्हणजेच दुसऱ्या दिवशी त्या संपूर्ण तळचात ती विषवेल ओतप्रोत व्यापून भरेल !

नशेबाजीच्या व्यसनाचा येथला वेग या विषवेलीइतकाच तुफान भयानक आहे; आणि वेळीच इलाज केला नाही तर इथल्या पिढचांमागून पिढचा या व्यसनाच्या संपूर्णपणे आहारी जातील यात शंका नाही. आणि काही थोडचा पिढचा जरी या व्यसनाने बरबाद झाल्या तरी पुढचा भारतीय वंशच त्यामुळे कुंठित होऊन जाईल.

याचे मुख्य कारण म्हणजे या व्यसनाने माणसांची कामेच्छा, लैंगिक भूकच नाहीशी होऊन जाते; आणि तो नंपुसक बनतो.

भारतात ही व्यसनाधीनता कधी आली ? अगदी अलिकडे म्हणजे ऐंशीच्या दशकात.

तत्पूर्वी फार अत्यल्प प्रमाणात; नि तेही उच्चवर्गीय श्रीमंत तरुणात तुरळक प्रमाणात या व्यसनाचा प्रादुर्भाव झाला होता; आणि तोही बव्हंशी पाश्चिमात्य संस्कृतीच्या आंधळचा प्रभावामुळे.

१९६० च्या सुमारास पाश्चिमात्य जगात या व्यसनाने जोर धरावयास सुरूवात केली; आणि १९७० च्या दशकात त्याने संपूर्ण युरोप व अमेरिका पादाक्रांत केले. इतके की, संयुक्त राष्ट्र संघटनेलाही या विषयाची अत्यंत गंभीरपणे दखल घेऊन त्याला संघटितपणे आळा घालण्यासाठी पुढे यावे लागले.

या काळात भारताने हे व्यसन आपल्या उंबरठचाबाहेर थोपवले म्हणून सर्वदूर भारताची पाठ थोपटली जात होती.

१९८० नंतर हे सगळेच चित्र पालटले. अंमली पदार्थांचा प्रसार देशभर होऊ लागला. मुंबई, कलकत्ता, पुणे, अहमदाबाद, दिल्ली ही बडी महानगरेच नव्हेत तर अगदी छोटी छोटी गावेदेखील या व्यसनाने पोखरली जाऊ लागली. हिमालय ते कन्याकुमारी; आणि कोहिमा ते द्वारका अशा चतुस्सीमात त्याचा चौफेर नंगा नाच सुरू झाला.

व्यसनाधीनता ही विशिष्ट वर्गाची वा वयाची मक्तेदारी उरली नाही. बापजाद्यांच्या कमाईवर मोटारी उडवणारे तरुण–तरुणी आणि

फुटपाथच्या कडेला कचरा गोळा करणारा वयोवृद्ध भिकारी एकाच 'दमात' या व्यसनाकडे ओढले जाऊ लागले. लठ्ठ पगारदार अधिकारी नि नोकरीपायी वणवणारा बेकार, निर्ढावलेले गुन्हेगार नि सातवी आठवीत शिकणारे कोवळे विद्यार्थी, कलावंत–बुद्धिवादी नि मणामणांची ओझी माथ्या–खांद्यावर वाहणारे हमाल हे सर्व 'चिलमी' च्या दुव्याने एकाच माळेत गुंफले गेले. जातपात, धर्म, पंथ सगळे भेदाभेद दूर करून या 'चिलमी' ने भारताची अशी 'एकात्मता' साधून दिली !

ज्या घरात अशांतता, भांडणतंटे त्या वातावरणाला उबगून माणसे या व्यसनाच्या आधीन झाली तर जिथे टापटीप, शिस्तीचे, प्रेमाचे वातावरण तिथूनही या व्यसनाला नवनवे 'रिक्रूट' प्रत्यही मिळत राहिले. कडक नीतिनियम, सोवळे यांची बंधने झुगारून मुले त्याकडे वळतात म्हणावे तर जिथे मुक्त कौटुंबिक वातावरण तिथूनही ते त्याकडे येतात असे दिसते. कुणी चैन म्हणून, कुणी दुःख विसरावे म्हणून, कुणी सहज गंमत म्हणून तर खरेच निव्वळ अनुकरण म्हणून नशेचा एक 'दम' घेतात; आणि मग 'दम मारो दम'च्या आवर्तात गरगरत राहतात !

या व्यसनाला कोणताच ठरीव 'पॅटर्न' नसल्याने त्याचा कार्यकारणभाव शोधणे नि त्यावरील उपाययोजना निश्चित करणे कर्मकठीण बनलेले आहे.

भारतात या व्यसनाचे प्रमाण नेमके किती आहे याची निश्चित आकडेवारी मिळते तीही डोके नि डोळे चक्रावून टाकते.

१९८१ च्या शिरगणनेनुसार मुंबईची लोकसंख्या आहे ऐंशी लाख. त्यात 'गर्दुल्यां'ची म्हणजे 'गर्द' ओढणाऱ्यांची संख्या किती ? मिळणारा कमीत कमी आकडा आहे ऐंशीहजार. पण जाणकारांच्या मते हा आकडा प्रत्यक्षात किमान दुप्पट तरी असायला हवा– नव्हे आहेच !

आता ऐंशी हजार हा कमीत कमी आकडा गृहित धरला तरी लोकसंख्येशी हे प्रमाण पडते शेकडा एक टक्का. म्हणजेच शंभरातला एक माणूस नशेबाज आहे असा त्याचा सरळ अर्थ. जाणकारांचा आकडा

जमेस धरला तर दर पन्नासात एक नशेबाज हे प्रमाण येते. ही परिस्थिती किती भयावह आहे याची या आकडेवारीवरून कल्पना येईल.

पाच वर्षांपूर्वी मुंबईतील नशेबाजीचे प्रमाण आठ ते दहा हजारांच्या घरात होते. पाच वर्षात त्यात आठपट वाढ झाली आहे. आणि याच वेगाने हे व्यसन वाढत राहिले तर आणखी दोनचार वर्षातच शेकडा दहा ते पंधरा टक्के माणसे नशेबाज होतील. टक्केवारीत सांगायचे तर दर सहा ते दहा माणसांमागे एक नशेबाज असे हे प्रमाण पडेल !

या व्यसनाला वयाचा व वर्गाचा धरबंध नाही तरी व्यसनासक्त माणसात वय दहा ते तीस या वयोगटातील मुलांचा भरणाच प्रामुख्याने असतो. अगदी तुरळक प्रमाणात सातआठ वर्षाची मुलेही त्याच्या नादी लागलेली दिसतात.

मुंबई शहरात 'गर्द' मिळते कुठे? कुठे मिळत नाही ते विचारा गल्लीच्या कोपऱ्यावरचा पानाचा ठेला, भेळवाला यांच्याकडे माहीतगाराला अचूक माल काढून दिला जातो. आणि साधारण मैलभराच्या क्षेत्रफळात अशा साधारणतः दीडेकशे 'जागा' असतातच. म्हणजे अगदी पावलापावलावरती म्हणानात !

आणि किंमत ?

मालाच्या गरजेनुसार 'लोडेड' म्हणजे 'माल' भरलेली सिगरेट आठ आणे ते रुपया किंमतीला मिळते. चिमुकली पुडी दोन ते चार रुपयाना, छोटी कुपी आठ ते पंधरा रुपयांना.

दीक्षा सुरू होते अर्थातच लोडेड सिगरेटने. खूपदा सुरुवातीला पाच सहाजण मिळून एक सिगरेट आपापसात फिरवतात. मग सामूहिक स्वरूपात सिगरेटस् वाढू लागल्या की मग एकेकटयाने स्वतंत्र सिगरेट ओढली जाऊ लागते. आणि मग अधिक, आणखी अधिक करता करता हा नशेबाज अशा एका अवस्थेला येऊत पोचतो की, तिथून माघारी वळण्याचा रस्ताच मुळी पुरता नष्ट झालेला असतो.

या नशेने नेमके काय होते ?

सुरुवातीला घेतले जातात गर्द उर्फ अशुद्ध 'हेरॉईन' चे एकाद-दोन झुरके. त्याचे अत्यल्प प्रमाण अर्थातच औषधी गुणांप्रमाणे परिणाम करते.

मन एकदम हलके वाटू लागते. काही चिंताउपाधी असतील तर त्यांचे मनावरचे दडपण एकदम नाहीसे होते. मनाला एक खोटी तरतरी, उभारी येते; आणि सगळीकडे मस्त हर्षोल्हास दाटून राहिला आहे असे उगीचच वाटत राहते.

परिणाम ओसरला की मात्र मन एकदम खचते. पहिली दडपणे पहिल्यापेक्षा अधिक जोरचकतेने मनावर आरूढ होतात. निराश मळम बनून मनावर झाकोळते. मनाच्या या अवस्थेला दूर करण्याचा इलाज नुकताच समजलेला असतो. तोच मग पुनः वापरला जातो.

पण काही दिवस गेले की, हा 'मस्त अनुभव' येईनासा होतो मग आणखी प्रमाण वाढवले जाते. मग थोडा वेळ याच प्रमाणावर 'किक' मिळत राहते. मग पुनः पहिले पाढे पंचावन्न की वाढवा प्रमाण.

एव्हापर्यंत मनच या सवयीचे गुलाम बनलेले होते; हलके हलके शरीरही या सवयीला अंगात मुरवून घेत असते. रक्ताभिसरणापासून पचनव्यवस्थेपर्यंत आणि मज्जासंस्थेपासून मेंदूपर्यंत शरीराची पेशी न् पेशी 'गर्द'ची गुलाम बनून जाते. मेंदूतील संदेशवहनाचे काम करणाऱ्या विद्युतलहरीदेखील त्याच्या प्रभावाखाली पार बदलून जातात; आणि मग या एकाच जन्मात नशिला माणूस नवा जन्म घेतो– यंत्रवत् पशूचा. ज्याला इंग्रजीत 'झोंबी' असा एक शब्द आहे !

त्याचे मूळ रूप, त्याचा स्वभाव, त्याचे वर्तन, चालचालणूक, बुद्धिमत्ता या सर्वांत अगदी ओळखताही येऊ नये असे जबरदस्त परिवर्तन घडते. आपल्या परिचयाचा तो माणूस केव्हाच संपलेला असतो.

हे झाले आपल्या लेखी, गर्द ओढणाऱ्या त्या माणसाच्या दृष्टीने जग कसे असते ?

कवडी किंमतीचे. त्याच्या लेखी ही नवरत्ना वसुंधरा, तिच्यावर पसरलेल्या नानाविध संस्कृती नि त्यात नांदणारी अब्जावधी माणसे,

त्यांचा देश, धर्म, नीतिनियम, कायदेकानू यांना शून्य किंमत असते. त्यांच्याबद्दलच नव्हे– अगदी स्वतःच्या शरीराबद्दलदेखील त्याला पराकोटीची अनास्था वाटू लागते. शारीरिक स्वच्छता, आहार, अन्नाची रुची नि पेयाची चव, कपड्यांची टापटीप, मायेचे बोलणे नि रागेजली निर्भर्त्सना– कशाकशाची म्हणून त्याला पर्वा नसते. त्याचे व्यसनाधीन मन शरीरापासून अलग होऊन स्वतःच्या वेगळ्याच जगात गुरफटून राहिलेले असते.

हे जगच त्याच्या लेखी 'वास्तव' असते– आणि इथले प्रत्यक्ष वास्तव हे पूर्णपणे मिथ्या !

या जगात काय असते ? तिथे असतो सुखाचा, परमसुखाचा प्रचंड आभास. शास्त्रोक्त परिभाषेत त्याला 'सुखभ्रम' अशी संज्ञा आहे. बाहेर अगदी वडवानल का पेटलेला असेना; या 'सुखभ्रमा'ची ताकद अशी की, त्यात भ्रमणारा नशेबाज अगदी हिमाच्छादित शिखरांची सफर करण्याचा आनंद लुटत असतो. या सुखभ्रमांमुळेच रोगी आपल्या शारीरिक वेदना विसरत असतो. अर्थातच मनाची ही हर्षोल्लासपूर्ण अवस्था नशेचा अंमल असेतोवर टिकते.

नशेबाज पुनः पुन्हा अंमली पदार्थ का घेतो माहीत आहे? कारण नशेचा अंमल उतरल्यानंतर जी दारुण अवस्था त्याला भोगावी लागते ती अक्षरशः मरणाहून भयंकर असते. एकदा का सुखभ्रमाचा भर ओसरला की, प्रत्यक्षात सुरू होते शारीरिक तडफडणे. शरीराचा कण न कण अलग होऊन जणू काही शरीराबाहेर पडू लागतो. नाक डोळे वाहायला लागतात. पोटातली आतडी डचमळून वांत्या होऊ लागतात. अनेकदा शौचाचे ढाळ सुरू होतात. पोटात असह्य वेदना होऊ लागतात, हातपाय थरथरू लागतात. झोप हरवते. मन कमालीचे सैरभैर बनते, चिडखोर बनते.

या सर्व लक्षणांना शास्त्रीय परिषेत 'विड्रॉवल सिम्प्टम्स' म्हणतात. नशेतून बाहेर आल्याची लक्षणे, ही अवस्थाच अत्यंत दुःसह

असते. त्यावर एकच इलाज नशेबाजाच्या हाती असतो. पुनः अंमली पदार्थ घेणे.

नशेच्या विवक्षित डोसाची एकदा सवय झाली की, तेवढ्याने नशा येईनाशी होते. लगेच विड्रॉवल लक्षणे सुरू होतात. मग नशेचा डोस आणखी वाढवायचा. हाही डोस नंतर अपुरा ठरू लागतो. विड्रॉवल लक्षणे लौकर लौकर दिसू लागतात. मग वाढीव डोसासोबत आणखी जालीम नशेचा वापर सुरू होतो. अनेकानेक नशिल्या पदार्थांचा पिसाट शोध गावगन्ना सुरू होतो.

नशेची सुरुवात चारआठ आण्यानी, एखाद् दोन रुपयांनी होते. पण तिचे प्रमाण व वेळा वाढू लागल्या की दिवसाकाठी तीस तीस चाळीस चाळीस रुपये लागू लागतात. पगारदार माणसे त्यापायी पुरा पगारच्या पगार खर्ची घालतात आणि ज्यांच्याकडे हमखास उत्पन्नाची सोय नाही ती माणसे त्यासाठी चक्क चोऱ्या करवून पैसे मिळवतात. शाळकरी, कॉलेजातली मुले प्रथम उधारउसनवारी. मग घरच्या वस्तू चोरून विकणे, गहाण टाकणे, मग आसपासच्या चिल्लर चोऱ्या या गतीने गुन्हेगारीचे प्राथमिक धडे गिरवू लागतात.

त्यातील काही आपली तल्लफ परस्पर भागवता यावी म्हणून नव्या नव्या 'सावजा' ना हे पदार्थ विकणाऱ्यांच्या जाळ्यात नेऊन सोडतात. अर्थात शाळा-कॉलेजातल्या मुलांची ही 'सावजे' म्हणजे त्यांचे सहाध्यायी वा समवयस्क दोस्तच असतात.

याची सुरुवातही मोठी साधीसोपी असते. हे पदार्थ विकणारी मंडळी शाळांच्या आवाराबाहेर चणेशेंगदाणे, भेळ, चिंचाबोरे, आईस्क्रीम असे पदार्थ विकत असतात.

शाळेत थोडीफार मुले अधूनमधून सिगरेट ओढतात. त्यातील काहीना तर चक्क तल्लफ वगैरे येत असते. शाळेत राजरोस सिगरेट ओढणे तर शक्य नसते. तेव्हा ही पोरे मधल्या सुट्टीत, पाणी प्यायच्या सुट्टीत शाळेबाहेर गटाराच्या वा झाडाच्या वा दुसऱ्या इमारतीच्या जिन्याच्या आडोशाला जाऊन गुपचूप एकाददुसरा झुरका घेत असतात.

बाहेरची ही बेरकी मंडळी वासावर असतातच. ती ही मुले अचूक हेरतात आणि त्यांना धाकदपटशा देऊन स्वत:च्या आधीन करतात; नि हलके हलके त्यांच्याशी दोस्ती जमवतात. स्वत:च्या जवळचे सिगरेटचे तुकडे देऊन ते अधूनमधून त्यांची तल्लफ भागवायला मदत करतात. अशी सिगरेट देतादेताच मधे एखादी नशिली सिगरेट त्या मुलाला दिली जाते.

त्याचा परिणाम विलक्षण मस्त वाटतो. मग अशा 'लोडेड' (म्हणजे 'माल' भरलेल्या) सिगरेटस् ते वरचेवर त्या सावजाला देऊन त्याला त्यांची चटक लावतात. पोरगा पुरता आधीन झालासे वाटले की, ते एकदम हात आखडतात. पोरगा गयावया करतो. पैसे देऊ करतो. मग ते त्याला अशा सिगरेटस् विकत देऊ लागतात. मधेच हा विकत पुरवठाही खंडित केला जातो.

'माल है ही नहीं, कहाँ से लाएंगे'– असे म्हणून तो भेळवाला– चणेवाला हात झटकतो, 'मंगता तो उधर मिलेगा'– असे म्हणून तो त्याला एक जवळचा पत्ता देतो. आता या मुलाला नशेबाज दुनियेचे प्रवेशद्वार उघडे झालेले असते.

पैसे नाहीत ?

हरकत नाही– या पहिल्या दलालांकडे त्यावरही तोड असते.

'तुम्हारे दोचार दोस्त ले आओ– तुम्हें मुफ्त मिलेगी– '

हा सौदा तर फारच खरा वाटतो. मग 'सावज' आणखी दोघा-चौघांना जाळ्याकडे घेऊन येते. ते दोघेचौघे आणखी आठदहांना–

अशा प्रकारे तळ्यात विषवल्लीची वाढ शतगुणित होत जाते; आणि मग बघता बघता तळे व्यापून टाकते.

वर उदाहरणादाखल तळ्याचे उदाहरण दिलेय नी– आज या देशातील अंमली पदार्थांच्या व्यसनाचे प्रमाण त्यातील वेलीच्याच गतीने वाढते आहे. आणि त्या हिशेबाने आपणही कदाचित 'एकोणतीसाव्या दिवसा' च्या उंबरठ्यावर उभे असू !

'एकोणतीसाव्या दिवसा' ला या हिशेबात 'उद्या' असतो तो फक्त मरण्यासाठी–त्या 'उद्या' ला भवितव्यच नसते !

आमच्या देशाचा, आगामी पुढच्या पिढ्यांचा 'उद्या' असाच गर्दच्या विळख्यात जाखडून राहणार असेल तर त्यालादेखील भवितव्य नाही.

मग याला काहीच इलाज नाही का ?

डॉक्टरी इलाजांबद्दल म्हणाल तर होऊ शकतात. पण आमच्याकडे त्याबाबत स्वतंत्र अभ्यास विभाग नाही. गेल्या काही वर्षात या व्यसनाचे वाढते प्रमाण बघून काही मानसोपचार तज्ज्ञ त्या संदर्भात रस घेऊ लागले आहेत. इस्पितळात या व्यसनग्रस्तांना दाखल देखील करून घेतले जाते. पण त्यांच्यासाठी स्वतंत्र विभाग क्वचितच कुठे असतो. हे उपचार मानसोपचारात येत असल्याने इतर मनोरुग्णांसमवेतच बहुधा या रोग्यांना ठेवले जाते.

या मानसोपचार विभागात मुळात बेड्सची संख्या फार कमी असते. त्यामुळे सगळ्याच व्यसनग्रस्तांना तिथे प्रवेश देता येत नाही आणि या व्यसनाधीन माणसाला तर सतत डॉक्टरांच्या निगराणीखालीच ठेवणे अत्यावश्यक असते. कारण त्याला डॉक्टरांच्या सक्त देखरेखीची गरज लागते ती 'विड्रॉवल सिगटम्स' सुरू झाल्यानंतर आणि व्यसनाच्या एका डोसपासून दूर राहिले की, त्याची लक्षणे सुरू होतात आणि व्यसनाचे प्रमाण जसे असेल तशी कमीजास्त काळ टिकतात व असतात.

पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला स्वत:ला हे जीवघेणे व्यसन जडले आहे त्यापासून मुक्त व्हायला हवे असे खुद्द त्या व्यसनग्रस्तालाच मन:पूर्वक वाटले पाहिजे. अशा तऱ्हेच्या उपचारांसाठी त्यानेच स्वत:हून तयार व्हायला हवे.

घरच्यांच्या वा इतर कुणाच्या दडपणाखाली अनिच्छेने वा मारूनमुटकून त्याला उपचारासाठी तयार केले तर तो तात्पुरता उप-

चारासाठी येतो; आणि संधी मिळताच दुप्पट वेगाने व्यसनाला कवटाळतो.

पण अगदी मनःपूर्वक उपचारासाठी आलेल्या व्यसनाधीनांना देखील नशेने एवढे गुलाम बनवलेले असते की, पूर्ण बरे होऊन तीनचार वर्षे उलटली तरीही त्यांच्या व्यसनाचे जुने अड्डे, दुकाने यांचे दर्शन घडले वा तिथल्या ओळखीच्या खुणा दिसल्या तरी आतून ओढल्यासारखे, भारावल्यासारखे होत राहते. अशा मनोवस्थेत थोंडा जरी गाफीलपणा आला, मनावरचे बंधन सैलावले तर मात्र खैर नसते.

म्हणूनच पूर्णपणे व्यसनमुक्त बनलेल्यांचे प्रमाण सर्वदूरच अत्यल्प आढळते. अमली पदार्थांचा प्रवास बव्हंशी एकतर्फीच असतो !

या व्यसनाला आळा घालण्याचा सर्वात परिणामकारक मार्ग म्हणजे नशिले पदार्थ मुळातच उपलब्ध होऊ न देणे; आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे अशा घातुक सवयीना अंगीकारण्यासारखी ढिसाळ समाजव्यवस्थाच आधी बदलून टाकणे.

पण सध्याची राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिस्थितीच अशी आहे की, आज हे दोन्ही उपाय आम्ही योजण्यास असमर्थ आहो, ना आम्ही नशेचा फैलाव रोखू शकत; ना समाजव्यवस्था बदलू शकत !

'स्मगलिंग' नामक राक्षसीने जगात स्वतःचे जे समांतर आर्थिक साम्राज्य आज उभे केले आहे त्याचा 'नशिले पदार्थ' हाच कणा आहे. आणि जोवर या 'स्मगलिंग'ला चोरटचा व्यापाराला परिणामकारक आळा आम्ही घालत नाही तोवर आम्हीच नव्हे; आमच्यासारखे कैक गरीब देश व त्याचे लक्षावधी नागरिक नशेबाज बनतच जाणार आहेत.

स्मगलिंगच्या आंतरराष्ट्रीय साखळीतील 'भारत' ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण कडी आहे. या कडीचे संरक्षण करण्यासाठी स्मगलिंगचे सूत्रधार राजकारण, अर्थकारण, आंतरराष्ट्रीय संबंध, व्यापार व उद्योग, शैक्षणिक धोरण, अशा सगळचा गोष्टींवर स्वतःचे नियंत्रण ठेवीत असतात. एवढेच काय शिक्षण व शैक्षणिक धोरण, कलाजीवन व सांस्कृतिक दृष्टिकोनदेखील त्यांच्या पंज्यातून सुटत नाही.

भारतातील स्मगलिंगचे जाळे इथे कसे उत्पात घडवते ते या संदर्भात बघण्यासारखे आहे.

५

'स्मगलिंग' म्हणजे चोरट्या मालाची आयातनिर्यात. कुठल्याही देशात परदेशातून कुठला माल किती प्रमाणावर आणावयाचा; तिथून परदेशात किती जाऊ द्यायचा यावर कडक निर्बंध असतात. आयात मालावर कस्टम्स वगैरेंचा कर लावलेला असतो आणि वस्तूच्या देशांतर्गत आवश्यकतेनुसार हा कर मूळ किंमतीच्या अनेक पटही असतो. देशांतर्गत अर्थव्यवस्थेत परदेशी मालाच्या भरमसाट आयातीने व निर्यातीने अनवस्था प्रसंग ओढवू नये म्हणून हे अत्यावश्यक असते.

देशांतर्गत चलनवाढ, महागाई, टंचाई यांवर आपली पोळी पिकवून व्यापारी व कारखानदार जेव्हा भरमसाट साठेबाजी व काळाबाजार करतात तेव्हा त्यांच्याकडे सरकारला दाखवता येत नाही असे प्रचंड धन जमा होते. त्यालाच 'काळा पैसा' असे म्हटले जाते. हा काळा पैसा कुठल्याही कायदेशीर व्यवहारात गुंतवायचा तर त्याच्याबद्दल जाब विचारणारी यंत्रणा जागोजाग असते. तेव्हा हा काळा पैसा कुठल्यातरी काळ्या उद्योगातच गुंतलेला असावा हे सूत्र काळाबाजारवाले वापरत असतात.

अनेक कायदेशीर व्यवहारांना या पैशाच्या जोरावर काळे स्वरूप देऊन त्यातून प्रचंड प्रमाणात काळा पैसा निर्माण करण्याचा मग प्रयत्न होतो. महानगरातील जमिनी व राहत्या जागांचा प्रश्न अशाच प्रकारे गोंच्याचा 'काळा' बनवला गेला. आज मुंबई शहरात बिशिष्ट विभागात जागोजाग 'पांढरी' किंमत व 'काळी' किंमत अशा दुहेरी पद्धतीने पैसा मोजावा लागतो. घरटंचाईच्या उग्र प्रश्नाने मेटाकुटीला आलेला अगदी साधासुधा माणूसदेखील निरुपाय म्हणून आपली कष्टार्जित पांढरी कमाई (आणि कष्टानेच फेडावयाचे 'पांढरे' कर्ज) अशा प्रकारे

काळे करीत असतो. परिणाम एकच होतो : याच प्रकारे काळे धन आपले हातपाय आणखी दूर दूर व खोलपर्यंत पसरत राहते.

'चित्रपट निर्मिती' हा अशाच काळा पैसा जिरवणारा आणखी एक उद्योग. याखेरीज चैनीच्या, छानछोकीच्या वस्तू, संपत्तीचे अश्लाध्य प्रदर्शन यांवरही तो खर्च होतो.

काळ्या पैशाचे सगळे व्यवहार हे छनछन रोखीत होतात. 'पैसा फेका माल उचला' या धोरणापायी नोटांच्या बंडलाच्या थप्प्या जय्यत तयार ठेवाव्या लागतात. पण या नोटांचीही एक गोची असते.

देशातील प्रचलित चलन या व्यवहारात अर्थातच डबघाईला येते. चलनवाढीचे ग्रहण अर्थव्यवस्थेला ग्रासू लागते आणि प्रत्यक्ष व्यवहारात ते चलन जवळजवळ कवडीमोल ठरते.

असले चलन जवळ बाळगून कुणाला फायदा ? तेव्हा हा पैसा शक्यतो मूल्यवान धातू, हिरे यांसारख्या शाश्वत (आणि चढ्या) मूल्यांमध्ये बदलून घेणे अपरिहार्य ठरते.

काळ्या धनाची समांतर अर्थव्यवस्था जसजशी या देशात वर्चस्व गाजवू लागली तशी त्यांना हवे असलेले आंतरराष्ट्रीय चलन, सोने, हिरे यांची, तशीच चैनीच्या वस्तूंची चोरटी आयातदेखील प्रचंड प्रमाणात वाढली. काळाबाजारवाले, सट्टेबाज, स्मगलर्स यांच्या टोळीने देशाचे अर्थकारण मजबूतपणे आपल्या ताब्यात घेतले.

स्मगलिंग व काळे व्यवहार यांना सर्वात मोठे संरक्षण हवे असते ते गुंडांचे. त्यासाठी गुन्हेगारांच्या पलटणी ते पोसत असतात. चोरट्या मालाच्या नेआणीपासून विरुद्ध टोळीच्या माणसास धडा शिकवण्यापर्यंत जागोजाग हे गुन्हेगार वापरले जातात. हे पोसलेले गुंड राजकीय क्षेत्रात, औद्योगिक क्षेत्रात, भाडयाने देऊन ही मंडळी राजकारण व अर्थोद्योग यांवर आपली पकड बसवतात आणि आपल्याला हवे तसे व्यवहार करवून घेतात.

जनता किंवा लोक ही फार मोठी ताकद आहे हे यांना जितके अचूक समजलेले आहे तेवढे आमच्या कुठल्याही लोकशाहीवाद्यांना समजले नसेल.

ही जनता कुठल्या ना कुठल्या गुंगीत राहावी यासाठी अगदी पद्धतशीर प्रयत्न ही मंडळी करीत असतात. पुनः तिच्या या गुंगीत राहण्यातूनही ते आणखी नवी धनसंपत्ती कमावीत असतात.

सवंग गल्लाभरू चित्रपटांद्वारे खोटी व चुकीची मूल्ये ते प्रस्थापित करू बघतात; आणि त्याचवेळी 'पैसा हाच परमेश्वर' हे रोकडे तत्त्वज्ञान व्यवहारतः लोकांच्या माथी मारतात !

चांगले शिक्षण हवे तर बापकमाईचा, भरपूर पैसा हवा; पदवी हवी– पैसे द्या; घरबसल्या मिळेल अगदी– अगदी डॉक्टरीपासून डॉक्टरेटपर्यंत. नोकरीसाठी पैसे द्या, जीवनातले अगदी कणभरचे सुख-देखील पैशाखेरीज मिळणारच नाही अशी जालीम कोंडी ही मंडळी करून ठेवतात.

पण एवढ्यावरच त्याचे कौटाळ थांबत नाही. सर्वसामान्य माणसाला त्याच्या दुरावस्थेचे मूळ कारण समजू नये, नि समजले तरी त्याने एकत्र येऊन लढू नये यासाठी ही मंडळी त्याला नानाविध पातळ्यांवर मनानेच खंडित करीत असतात. जातपात, धर्म, भाषा, पोटभाषा, राज्य, पंथ अशा नानाविध पातळ्यांवर आज माणसे शत-खंडित झालेली आढळतात. त्यांच्यातील हे भेदभाव, दुरावा अधिकाधिक तीव्र कसा होईल याची पूरेपूर दक्षता ही मंडळी घेत असतात; आणि त्यासाठी राजकारण्यांपासून धर्मगुरुंपर्यंत सगळ्यांना खिशात घालतात.

आज अगदी कडोविकडीला पोचलेला पंजाब प्रश्न हा याच कौटाळाचा एक भाग आहे, आणि त्याच्या पोटातदेखील अंमली पदार्थांच्या स्मगलिंगची पाचर ठोकण्यात आली आहे. (त्याचा तपशील नंतर बघू.)

जनतेला अशाप्रकारे शतखंडित करण्यासाठी पोसलेल्या गुंडांच्या टोळ्याच यथास्थित वापरल्या जातात. त्यांच्या करवी जातीय दंगे, भाषिक दंगे, राजकीय असंतोष पेटवले जातात. या आगीवर पोळ्या भाजल्या जातात त्या फक्त या समाजद्रोही कंटकांच्या !

अर्थातच या सगळ्या कौटाळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे

धागेदोरे गुंतलेले असतात. त्यामुळे ही मंडळी त्यांच्या त्यांच्या देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातदेखील पुरेपूर राजकीय संरक्षण मिळवून असतात.

या सगळ्याला अवाढव्य पैसा हवा असतो. अगदी रोजच्या रोज लाखांनी रोकडे चलन लागत असते. ते अर्थातच काळ्या अर्थकारणातून नि मुख्यत्वे स्मगलिंगमधून उपलब्ध होत असते; आणि आजमितीला सर्वाधिक किफायतशीर ठरले आहे ते अंमली पदार्थांचे स्मगलिंग.

किफायतशीर आणि अत्यंत सुलभ. एक किलो कोकेन वा हेरॉईनला आज चोरट्या बाजारात लाखो रुपये मिळू शकतात. आणि किलोभर द्रव्य अंगावर कुठेही विनासायास छपवता येते. उलट तेवढ्या किंमतीचे सोने वा हिरे लपवणे व चोरून नेणे–आणणे कैकपटीने जिकीरीचे नि त्याहून अधिक धोकादायक. शिवाय अंमली पदार्थांची मागणी विशिष्ट नि मोजक्या माणसांपुरती मर्यादित नाही. त्याची गिऱ्हाईके रोजच्या रोज चक्रव्याज गतीने वाढणारी. त्यामुळे मालाला सतत तेज मागणी नि वाढता उठाव. बाजारपेठ अशी हमखास उपलब्ध असल्यामुळे या पदार्थांचा चोरटा व्यापार हा विलक्षण वेगाने वाढत गेला.

कच्च्या मालाचे उत्पादन म्हणजे अफू व कोको यांतील अधिकृत व अनधिकृत उत्पादनाबद्दल मागे लिहिलेच आहे. संयुक्त राष्ट्रांच्या नियंत्रणामुळे या लागवडीवर कडक बंधने असली तरी त्यांचे अनधिकृत उत्पादन करणाऱ्या अनेक देशात उत्पन्नाचे ते एकमात्र साधन आहे. बेकारी, दारिद्र्य, टंचाई, महागाई आणि परकीय कर्जे यांच्या बोज्याखाली हे देश असह्यपणे चिरडले जात आहेत, त्यामुळे तिथल्या सर्वसामान्य नागरिकाचे व शेतकऱ्याचे जीवन विलक्षण हलाखीचे बनले आहे. अंमली पदार्थांची लागवड हे एकमात्र उत्पन्नाचे साधन त्यांच्या हाती आहे. आणि तिथे पिकणाऱ्या कुठल्याही पिकापेक्षा हे चोरटे पीक कैक पटीने अधिक उत्पन्न मिळवून देत असल्याने शेतकरी अगदी चोरूनमारूनदेखील त्यांची शेती करीतच असतात.

शिवाय बेकारीने होरपळलेल्या हजारो तरुणांना या व्यवसायाने (काळे का होईना) रोजगारही मिळवून दिले आहेत.

कच्च्या मालापासून पक्का माल, म्हणजे नशिले पदार्थ बनवण्याचा खर्चही अत्यंत मामुली येतो; आणि प्रक्रिया बरीच सुलभ असते. अफूपासून अशुद्ध स्वरूपाचे हेरॉईन–म्हणजेच 'गर्द' वा ब्राऊन शुगर–बनवण्याचे काम कुठल्याही स्वैपाकघरात होऊ शकते. त्यासाठी लागणारी रसायने कुठल्याही केमिस्टकडे मिळू शकतात. नि अवजारे म्हणाल तर स्टोव्ह, दोनचार पातेली, दोनचार बालद्या, रसायन ढवळण्यासाठी पळ्या, गाळण्यासाठी चारदोन फडकी, माल सुकवायला ट्रे वा थाळ्या नि खलबत्ते, बस्स.

कोकेन गाळण्यासाठी देखील साधारणतः अशीच सामुग्री लागते. त्यामुळे अफू वा कोका उत्पादक विभागात चोरट्या दारूभट्ट्यांप्रमाणे चोरटी गर्द वा कोकेन उत्पादक केंद्रेदेखील विनासायास चालवली जातात. दारूभट्ट्यांपेक्षा या केंद्राचा पसारा भलताच कमी असल्याने या केंद्राचा गवगवा होण्यास खूपच अवधी लागतो. उत्पादन इतके सोपे व नेआण सुलभ. त्यात आणखी नशेला व त्यातून मिळणाऱ्या पैशांना चटावलेल्या मंडळींची नेआणीसाठी सतत कुमक मिळत राहते.

प्रचंड प्रमाणावर परदेशी मालाचे गठ्ठे पाठवण्यात धोका अधिक. माल पकडला गेला तर नुकसानही खूप मोठे. पण त्याच्या छोट्या छोट्या पुड्या बनवून देशातल्या देशात फिरवल्या तर पैशाला व गिऱ्हाईकाला ददात नाही नि धोका तर जवळ जवळ नाहीच. अशा प्रकारे भाजीवाले, भेळवाले, बनारस–कलकत्ता साडीवाले या मालाच्या नेआणीत गुंतू लागले. साड्यांच्या घडचातून अशा शेकडो पुड्या विनासायास छपतात आणि एकेका गठ्ठचातून हजारो रुपयांची उलाढाल करता येते.

या सर्व परिस्थितीमुळे अंमली पदार्थांचे स्मगलिंग हा सगळ्या जगभरच्या जबरदस्त पकड बसवून राहिलेला काळा उद्योग बनला आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हेगार जगातील बडे बडे मातब्बर या उद्योगाचे उदार

आश्रयदाते आहेत. त्यांनी स्मगलिंग व गुन्हेगारीचे गच्च विणीचे जाळे जगभर फैलावले आहे.

या जाळ्याचे केंद्र जेव्हा सुवर्ण–त्रिकोण व सुवर्ण चंद्रकोर ओलांडून भारतात सरकले तेव्हा अंमली पदार्थांच्या छत्रीखाली आपले आंतरराष्ट्रीय राजकारण चालवण्यासाठी काही शक्ती पुढे सरसावल्या. त्यातील एक होते पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या मागे आणखीही काही आंतरराष्ट्रीय षड्यंत्र उभे होते.

त्यातील प्रत्येकाला अनेकानेक कारणांमुळे भारताचे अभंगत्व खुपत होते. तिथली राजकीय सुस्थिरता डाचत होती. त्याचे आर्थिक स्वावलंबनाचे धोरण नापसंत होते. त्याची मित्रमंडळी वा स्नेही त्यांना अजिबात आवडत नव्हते. अलिप्त राष्ट्रांचे गटबंधन करून त्यांचा वेगळा दबावगट आंतरराष्ट्रीय क्षेत्रात निर्माण करायला तर त्यांचा सक्त विरोध होता.

तर भारताच्या सीमांवर पापग्रहांची अशी दाटी झाली असतानाच ईशान्य व वायव्य व उत्तर अशा तिन्ही स्फोटक सीमांकडून भारतीय भूमीवर नशिल्या पदार्थाचे आक्रमण सुरू झाले. त्याचे निर्यात केंद्र अर्थातच पाकिस्तानात होते.

या सीमेवरच आहे भारताचा पंजाब हा अत्यंत महत्त्वाचा प्रांत. शूर, लढवय्या माणसांचा हा प्रांत भौगोलिकदृष्टचा अत्यंत मोक्याच्या जागी आणि विलक्षण समृद्ध असा. हिंदुकुश–हिमालयाची भित ओलांडून येणाऱ्या माणसाचे पाय प्रथम या भूमीवर पडतात. हिमालयातून वाहणाऱ्या पाच धोधाट नद्या सिंधू, रावी, बियास, सतलज व झेलम–तिथे मऊशार गाळ दरसाल आणून ओतत असतात. या पाच नद्यांच्या दुआबांचाच मिळून बनला आहे पंजाब.

तर अनेक शतकानुशतके भारतावर येणाऱ्या आक्रमणांशी मुकाबला करणाऱ्या येथील माणसाच्या रक्ताच्या थेंबाथेंबात लढवय्येपणा उतरला नसता तरच नवल.

पुनः या कमालीच्या समृद्ध भूमीवर लालची नजर ठेवणाऱ्यांची इतिहासात कमतरता कधीच नव्हती. अगदी सिकंदराच्या आधीपासून

ते मोंगल–इंग्रजांपर्यंत सगळ्यांच्या स्वाऱ्या या मुलखावर झाल्या; नि पंजाबी शेतकऱ्यांनी त्या तितक्याच निर्धाराने परतवल्या.

गुरु नानकांनी या भूमीला शीख धर्माची दीक्षा दिली, पण हिंदू व शीख हे इतिहासात अलग कधीच नव्हते. अगदी फाळणीच्या वेळी देखील शिखांनी मुस्लीमांप्रमाणे 'स्वतंत्र राष्ट्र' मागावे म्हणून जिना व ब्रिटिश यांनी जंग जंग पछाडले होते. पण शिखांनी हा प्रस्ताव धुडकावला. फाळणीच्या रक्तरंजित काळात हिंदू व शीखांच्या रक्ताचे एकत्र पाट जागोजाग वाहवले गेले. आणि त्या दुर्धर जखमांनी कडवा शीख कट्टर देशभक्त बनला. भारतीय सेनेत शिखांचा भरणा फार मोठा होता आणि तिन्ही भारत–पाक युद्धात त्यांनी भीमपराक्रम गाजवून पाक सैन्याला नामोहरम केले होते. एका अर्थी लढवय्ये शीख हा भारतीय सेनेचा महत्त्वाचा आधारच होता.

हा आधार काढून घ्यायचा तर प्रथम शिखांचा बुद्धीभेद करायला हवा होता– ब्रिटिशांनी जशी हिंदु–मुस्लीम संशयाची, अविश्वासाची मुत्सद्दीपणे पेरणी केली तेच तंत्र भारतद्वेष्टया शक्तींनी पुनः वापरायला सुरुवात केली.

हे पाकिस्तानने योजले नाही. त्याची योजना फार वरच्या पातळीवर, अँग्लो–अमेरिकन पातळीवर झाली होती. आणि त्यामागे कमाल सुसूत्रता होती. त्यानी शिखांच्या इतिहासाचे पुनर्लेखन केले. शीख हे संपूर्णपणे स्वतंत्र व वेगळेच कसे आहेत याचा प्रसार चालवला आणि शीख अस्मिता, शीख वेगळेपणा याबद्दलची खोटी आत्मप्रौढी शीख युवकात फुलवायला सुरूवात केली.

पण तरी सर्वसामान्य शिखांचा फारसा बुद्धिभेद होऊ शकला नाही. तेव्हा मग सी. आय. ए. ने आपल्या भात्यातील अक्सीर बाण बाहेर काढला... नशिले पदार्थ.

'दि पॉलिटिक्स ऑफ हेरॉइन इन साऊथ ईस्ट एशिया' या पुस्तकात सी. आय. ए. ने आग्नेय आशियामधील कित्येक देशात नशिल्या पदार्थाद्वारे आपले हेरगिरीचे जाळे कसे फैलावले आणि अमेरिकेच्या

विरोधकांचा कसा नायनाट करण्याचा प्रयत्न केला हे सविस्तर दिले आहे, या भागातील अनेक देशात अमेरिकेचे कळसूत्री लष्करशहा बेबंद अंदाधुंदी व भ्रष्टाचार यांनी बरबटलेला राज्यकारभार करीत होते. त्यामुळे तेथील जनतेत सर्वदूरच प्रचंड असंतोष व अमेरिकाविरोधी संतापाची लाट उसळली होती. दिवसेदिवस वाढत्या संख्येने तरुण मुले विरोधकांच्या मागे उभी राहात होती. त्यासाठी तेथील तरुणात अंमली द्रव्यांचा प्रसार करून त्यांना निकामी करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यात आला.

मग पाकिस्तानमार्फत पंजाबच्या सीमांवर अंमली पदार्थांचे बेमुर्वत आक्रमण सुरू झाले. तोबर पंजाब प्रश्न पेटू लागला होता. तेथे अतिरेकी दहशतवादी तयार करण्याचे काम सी. आय. ए. ने पाकिस्तानी मुलखात सुरू केलेच होते. या दहशतवाद्यांना गनिमी शिक्षण देऊन शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्याचे काम ही मंडळी करीत. दहशतवादी कारवायांना अव्याहत शस्त्रपुरवठा व्हावा म्हणून या मंडळींनी त्या माथेफिरू तरुणांना एक किफायतशीर मार्ग दाखवून दिला– नशिल्या पदार्थांच्या स्मगलिंगचा.

अशाच प्रकारे यापूर्वी अफगाण गनिमाना वापरण्यात आले होते. अफगाणिस्तानात रशियन फौजा उतरल्यानंतर हजारो अफगाणी नागरिक पाक भूमीच्या आसऱ्याला आले होते. त्याना शस्त्रास्त्रांचा अविरत पुरवठा व त्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा हवा होता. अफगाण गनिम दिल्लीतील आपल्या निर्वासित नातेवाईकांना भेटण्याचे निमित्त करून दिल्लीत येत व तिथे अंमली पदार्थ चोरट्या व्यापारातील हस्तकांना देत.

अगदी त्याचप्रकारे शीख अतिरेक्यांचाही आता वापर चालू झाला.

पंजाब हे भारतातील सर्वाधिक सधन राज्य. कृषिक्षेत्रातील क्रांतीने सर्वसाधारण शेतकऱ्याकडे रोकड पैशाला जराही ददात नसते. जमिनीचा, अत्याधुनिक कृषितंत्रांचा पुरेपूर वापर होत असल्याने कृषीत हा पैसा पुनश्च गुंतवायला वावच नाही.

पण पंजाब कृषीत अग्रेसर असला तरी उद्योगधंद्यात नाही. त्यामुळे आम्ही कच्चा माल पिकवतो आणि इतर राज्ये त्यावर प्रक्रिया करून पक्का बनवून आम्हाला तो दामदुपटीने विकतात म्हणून खिसा खुळखुळत असूनही पंजाबी शेतकरी असंतुष्ट. पुन्हा कृषीचे यांत्रिकीकरण झाल्यानें घरची मुले शाळा–कॉलेजात जातात, शिकतात. घरच्या शेतीत त्यांना कामच नसते. नि राज्यात उद्योगधंदे नसल्याने तिथेही त्यांना वाव नसतो. एकूण पंजाबी शेतकऱ्याची मुले अक्षरशः रिकामी राहतात. बापकमाईच्या पैशावर स्कूटरी, मोटारसायकली उडवतात, चैनीच्या, मौजेच्या वस्तूंवर पैसे उधळतात.

'पैसा उधळणे' हा एकच मार्ग मुळी पंजाबी तरुणांपुढे उपलब्ध असतो.

नशेबाजीसाठी इतके तयार वातावरण दुसरे कुठले ? माथेफिरू अतिरेक्यांनी आणलेल्या अंमली पदार्थांनी राज्यांतच भरपूर गिऱ्हाईके लाभू लागली.

पंजाबी तरुणांचा वावर जिथे जिथे तिथे पाकिस्तानी गर्द व हेरॉईन मोठ्या प्रमाणावर झिरपू लागले. तिथून देशाच्या कानाकोपऱ्यांत जाऊ लागले.

पाकिस्तानमधून भारतात चोरट्या मार्गाने येणारी अफू व हेरॉईन १९८१ साली पकडण्यात आले तेव्हा त्याचे वजन होते १.५ टन. म्हणजे पंधराशे किलो. १९८३ मध्ये पाकमार्गे भारतात १.७ टन अफू चोरून आणली जाताना पकडली गेली. म्हणजे सतराशे किलो. अमेरिकेने पाकला सणसणून तंबी दिल्यानंतर तर पाकिस्तानात तयार होणारी व सुवर्णचंद्रकोरीद्वारे पाकमध्ये येणारी अफू व हेरॉइन पंजाब, राजस्थानवरून भारताकडे मोठ्या प्रमाणावर वळवण्यात आले.

याच सुमाराला आंतरराष्ट्रीय तस्करीच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचे स्थित्यंतर घडत होते. भारत हा अंमली पदार्थांच्या चोरट्या आयातनिर्यातीचा मोठा अड्डा बनवण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय माफिया संघटनांनी घेतला होता. कारण नशेबाजीसाठी खुद्द भारतातच प्रचंड

मोठी बाजारपेठ तयार होत होती हे एक कारण. आणि पलिकडे आफ्रिकेच्या अवाढव्य खंडात आणखी एक नवी बाजारपेठ उदयाला येत होती. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून विमान व नौकांमार्फत या मालाची ने–आण करणे सुलभ होते.

साहजिकच भारताची पश्चिम किनारपट्टी थेट भूजपासून कन्याकुमारीपर्यंत स्मगलरांनी पादाक्रांत करायला सुरूवात केली. त्यात मुंबई, गोवा, केरळच्या किनारपट्ट्यांवरून आफ्रिकेशी नौकानयनाद्वारे जबर स्मगलिंग सुरू झाले. मँड्रेक्स किंवा लाल परी किंवा रेड डॉल्स अशा नानाविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या नशिल्या गोळ्या ही आफ्रिकनांची आवडती नशा. केरळ किनाऱ्यावरून आफ्रिकेकडे जाणाऱ्या यांत्रिक नौकांतून लाखो रुपयांचा हा माल वरचेवर जप्त करण्यात येतो.

'स्मगलिंग' हे एकटेदुकटे नसते. त्याला संरक्षण म्हणून गुन्हेगारांच्या फळ्यांमागून फळ्या उभ्या कराव्या लागतात. बेकारी, वाढती महागाई आणि बेबंद फुगणाऱ्या महानगराचे असह्य तणाव. जीवनावश्यक शिक्षणाचा अभाव, नैराश्य, विफलता यांतून गुन्हेगारीला 'कच्चा माल' म्हणजे कोवळे तरुण प्रत्यही मिळत राहतात.

गुंडांच्या फळ्या पोसण्यासाठी राजकारणी मंडळींचे स्वार्थही गुंतलेले असतात. त्यामुळे राजकारणी व गुंडदादा यांच्या कड्या जुळत जातात आणि वरिष्ठ राजकारणी नि गुन्हेगारांचा शहेनशहा यांची हातमिळवणी झाली की गुन्हेगारीच्या साखळीचे वर्तुळ पूर्ण होते. या वर्तुळात अर्थातच नोकरशहा, पोलिसयंत्रणा आणि अनुषंगाने येणारे सर्वजण ओढले जातात आणि या एकेकाला गुंफून घेत साखळी आणखी विस्तारत जाते.

ही गुन्हेगारी–राजकारण्यांची साखळी जेव्हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक हत्त्यार म्हणून वापरली जाते तेव्हा ती कुठल्याही जालीम अस्त्रापेक्षा विनाशी ठरते.

ज्याच्याभोवती तिचा फास फेकला जातो त्या राष्ट्राला तो मरणपाशच ठरतो !

तूर्तास भारताभोवती तिचे वेढे टाकलेले आहेत आणि ते सर्व बाजूंनी करकचून आवळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न होत आहे.

हा पाश तोडायचा तर फक्त एकाशीच झगडून भागणार नाही. स्मगलिंग, भ्रष्टाचार, गलथान व कामचुकार नोकरशाही, सडलेले राजकारण आणि भ्रष्टाचाराच्या भोवऱ्यात गरगरणारे राजकारण या सगळ्यांशी एकसमयावच्छेदेकरून लढायला हवे. पण तेवढेही करून भागणार नाही.

ऑक्टोपस नावाचा प्राणी पाह्यलाय का तुम्ही ? निदान त्याचे चित्र पाहिले असेल. प्राणी कसला; आठ पायांचा जलचर राक्षसच असतो तो. एकादे भक्ष्य एकदा का तावडीत सापडले की तो आठी पायांनी त्याला गच्च विळखून घेतो. कितीही का बलवान प्राणी असेना ऑक्टोपसच्या मरणमिठीत त्याची हाडे भुगा होऊन जातात, श्वास घुसमटतो; आणि प्राण डोक्याची कवटी फोडून बाहेर पडतात.

ऑक्टोपसचा एकेक विळखा जर तुम्ही सोडवायचा प्रयत्न कराल तर तो सुटणार नाहीच; उलट त्यात अधिकाधिक गुरफटूनच जाल. ऑक्टोपसला मारण्याचा एकच मार्ग म्हणजे त्याचे मांसल गोळ्यासारखे मस्तक सर्वशक्तीनिशी फोडूनतोडून टाकणे. तस्करी-गुन्हेगारी, भ्रष्टाचार-नशेबाजीचे ज्या कर्कगाठीतून वळवळत बाहेर पडतात त्या कर्कगाठीवरच दणकावून हल्ला चढवायला हवा तरच या सर्वांचे आपल्याभोवती, समाजाभोवती, देशाभोवती पडलेले विळखे सैल पडतील.

ही कर्कगाठ कसली ?

अर्थातच सडलेल्या समाजव्यवस्थेची. त्यातूनच नशेबाजीला पोषक वातावरण तयार होते.

कसे ते बघू या आता.

६

मी वर म्हटल्याप्रमाणे आपण सर्वच नशिल्या पदार्थांना 'अंमली पदार्थ' या एकाच लेबलाखाली घालतो. त्यामुळे त्याचे वास्तव स्वरूप नेमके कसे आहे हे नीट समजून घेणे अशक्य बनते. आज बाजारात हजारो अंमली पदार्थ अस्तित्वात आहेत. (अर्थात आपल्याकडे जास्तीकरून 'ब्राऊन शुगर' वा 'गर्द'च अधिक प्रसारात आहे) खेरीज विज्ञानाच्या, रसायन–तंत्रज्ञानाच्या अद्‌भूत किमयागारीमुळे तितकेच नवे मानवनिर्मित नशिले पदार्थ देखील तयार होत आहेत.

या सर्वांना वैद्यक परिभाषेत 'सायकोॲक्टिव ड्रग्ज' अशी संज्ञा आहे. म्हणजे मनाच्या प्रक्रिया सुरू करणारे पदार्थ. दिव्याचे बटण दाबताच क्षणार्धात विजेचा प्रवाह सळसळत सुरू व्हावा तशी मनाची 'बटणे' हे ड्रग्ज किंवा पदार्थ करू शकतात, आणि जोवर त्यांचा अंमल असतो तोवर मनावर ते आपली पकड ठेवून देतात.

पण या सगळ्या पदार्थांचे काम एकसारखे नसते. त्यांच्या प्रतिक्रियादेखील वेगवेगळ्या असतात. त्यामुळे त्यांचा अंगीकार करणाऱ्या माणसांतही फरक असतो. खूपदा चूब म्हणून, अनुकरण म्हणून, 'कळपा'तून अलग पडू नये म्हणून, मित्राच्या आग्रहाखातीर म्हणून अंमली पदार्थांचा वापर करण्याआधी त्याचे सांगोवांगी स्वरूप कोणते आणि त्याचे अस्सल वास्तविक स्वरूप कोणते हे जाणून घेणे अत्यावश्यक आहे. आज आमची तरुण व कोवळी मुले झपाट्याने या व्यसनाकडे ओढली जात असल्याने त्यांच्या पुढे या विविध नशिल्या पदार्थांचे वास्तव रूप स्वच्छपणे मांडणे अत्यावश्यक होऊन बसले आहे. तरच आपण गंमत म्हणून नशा करावी की, करू नये याचा

निर्णय त्यांचा त्याना घेता येईल. आज अशा स्वरूपाचे कुठलेही साहित्य उपलब्ध नसल्याने अंमलीं पदार्थाबद्दल अनेकानेक चुकीच्या निखालस उलटचा आणि भन्नाट स्वप्नाळू कल्पना उराशी बाळगून तरुण मुले या व्यसनाच्या आहारी जाऊ लागली आहेत.

त्याना या धोक्याची जाणीव झाली तरच ते त्यांच्यापासून आपणहून दूर राहू शकतील. या व्यसनाला आळा घालण्याचा हाच एक आणि एकमेव परिणामकारक इलाज आहे.

अंमली पदार्थ अक्षरशः हजारोंच्या संख्येने उपलब्ध असले तरी वैद्यक दृष्टचा त्यांची विभागणी तीन मुख्य वर्गात केली जाते. १) गुंगी आणणारे पदार्थ २) मनाला उत्तेजन देणारे पदार्थ आणि ३) मनाला वास्तवापासून दूर नेणारे पदार्थ.

मनाला गुंगी आणणारी सर्वात परिचयाची नशा म्हणजे दारू. त्याखेरीज झोपेच्या गोळचांचाही वापर यासाठी केला जातो. अमेरिकन हिप्पी संस्कृतीत नि या हिप्पींच्या प्रभावाखाली आलेली मुले–मुली 'ग्लू' नामक नशिला पदार्थ हुंगतात. त्यातही ही गुंगी आणणारी रसायने असतात.

आजवर विदेशातच दारूला सामाजिक प्रतिष्ठा लाभलेली होती. पण आता आपल्याकडे देखील सगळचा उच्चवर्णीयात व उच्च वर्गीयांत 'दारू' हे प्रतिष्ठेचे पेय बनले आहे. आनंदाप्रीत्यर्थ, समारंभाप्रीत्यर्थ दारूच्या पार्टचा देणे, झोडणे नि त्यांत मुलाबाळांसह स्त्री-पुरुषांनी सहभागी होणे ही काही आता अपूर्वाईची गोष्ट उरलेली नाही. अगदी किशोरवयीन मुलेमुली देखील आपापल्या दोस्त कंपनीत अशा ओल्या 'ड्रिंक-पार्टचा' आईवडिलांना सांगून सवरून देत असतात; नि आई वडिलही त्या जीवनाचा एक भागच आहे असे मानून त्याबद्दल उदार धोरण स्वीकारतात.

वास्तविक दारू हा अंमली पदार्थ मनाच्या प्रक्रियांवर आपला परिणाम घडवत असतो. त्याची नियमित सवय वा वाढते प्रमाण यामुळे हलके हलके मन आणि त्यामागून शरीर त्याचे गुलाम बनत असते.

कुठलाही अंमली पदार्थ एकदम सोडला की, त्याचे जे 'विड्रावल सिम्प्टम्स' सोडण्याचे परिणाम– होतात त्याला दारुही अपवाद नाही. किंबहुना माणसाला मरणाच्या अंमली पदार्थांत आजही दारु हाच 'सर्वश्रेष्ठ' अंमली पदार्थ आहे !

अंमली पदार्थांची दुसरी वर्गवारी म्हणजे मनाला उत्तेजन देणाऱ्या पदार्थाची अनेकवेळा अनेक कारणांनी मन निरुत्साही बनते, थकते. जबाबदारीचे काम वा कामाची जबाबदारी पार पाडण्यास साथ देत नाही अशा वेळी माणूस काही तरी उत्तेजक पेय घेऊन मनाला तरतरी आणण्याचा प्रयत्न करीत असतो. सौम्य प्रमाणात चहामधील वा कॉफीमधील कॅफीन अशी कामगिरी बजावत असतात. याही पदार्थाची मनाला आणि शरीराच्या प्रक्रियांना सवय होत असते. चहा घेतला नाही वा त्याची वेळ नुसती चुकली तरी अनेकांचे डोके दुखू लागते. चहा पोटात गेला नाही तर शौचाचे विधी अडून बसतात हा तर बऱ्याच जणांचा अनुभव. या सौम्य उत्तेजक पदार्थाची अशी सवय मनाला व शरीराला जडते.

पण विवक्षित अंमली रसायने जेव्हा उत्तेजक म्हणून घेतली जातात त्याची सवय एकदा का जडली की, त्याचे वाढते डोस शरीर मागू लागते. खुपदा परीक्षेच्या वेळी जाग्रण करता यावे, रात्रपाळीचे काम नीट पार पडावे, दिवसभराचे न संपलेले काम रात्रीचा दिवस करून पार पाडता यावे म्हणून विद्यार्थी, कामगार, वकील–डॉक्टर्स आदि व्यवसायी 'ॲम्फेटॅमिन्स' चा समावेश असलेल्या औषधांचा वापर करतात. अमेरिकेत त्यासाठी मेथॅम्फेटॅमिन हे द्रव्य सर्रास प्रचलित आहे.

या औषधामुळे माणूस विलक्षण उत्तेजित बनतो; कारण हे द्रव्य मुळी माणसाच्या मज्जासंस्थेवरच शीघ्र परिणाम घडवत असते. त्यामुळे एकूणच मज्जासंस्था कमालीची उद्दिपित बनते व माणसाचे भूक तहान व झोप याचे चक्रच बदलून टाकते. हाती घेतलेल्या कामगिरीत भूक व झोप यांची कटकट नको म्हणून द्रव्य सेवन

करणाऱ्यासही हे विलक्षण सुखकरच वाटते आणि बघता बघता त्याची गुलामी मन पत्करते. त्याचे दीर्घकालीन वा मोठ्या प्रमाणावर सेवन केले तर ही औषधे मनाला वास्तवापासून दूर घेऊन जातात; मनाच्या या रुग्णावस्थेस 'सायकोसिस' अशी संज्ञा आहे.

या मनोवस्थेत हरतऱ्हेचे आभास माणसाला होऊ लागतात. आत्यंतिक भयगंडाने तो पछाडला जातो वा संशयपिशाच्याने भारला जातो. आपल्याला कुणीतरी मारायला टपला आहे, दारामागे कुणीतरी हत्त्यार घेऊन आपला जीव घेण्याच्या तयारीत आहे असे चित्रविचित्र भास त्याला होत राहतात.

अर्थात या औषधांमुळे शारीरिक गुलामी मात्र येत नाही. एकाद्याची ही सवय एकदम तोडली तर तो कमालीचा थकतो आणि दीर्घकाळ झोपून राहतो. ही निद्रावस्था चोवीस ते अठ्ठेचाळीस तास टिकते. उठल्यानंतर त्याला प्रचंड भूक लागते आणि तो भसासा अन्न फस्त करीत राहतो. त्यानंतर तो बहुधा पूर्वस्थितीला येतो.

पण तरीही या औषधांचा प्रदीर्घकालीन वापर करून मज्जा-संस्था सतत उत्तेजित अवस्थेत ठेवली तर मात्र त्यामुळे मनोवस्थेत वा मेंदूत गंभीर बिघाड होऊ शकतात.

मनाला उत्तेजना देणाऱ्या या पदार्थांच्याच एका विभागाला 'सायकॅडेविक' किंवा 'विभ्रमजनक' पदार्थ अशी एक संज्ञा आहे. त्यात एल. एस. डी. या नावाने कुख्यात असलेले द्रव्य मोडते. लायसर्जिक ॲसिड डायथायलमिड या अगडबंब रासायनिक नावाचा एल. एस. डी. हा आद्याक्षरयुक्त अल्पभ्रंश. मक्याच्या बुरशीपासून हे द्रव्य प्रयोगशाळेत मिळविले जाते. याच जातीतील मेस्कालाइन हे निवडुंगापासून तयार होते. तर या जातीचे आणखी एक द्रव्य बुफोटॅनाईन हे चक्क एका जातीच्या बेडकापासून तयार केले जाते.

या सायकॅडेविक द्रव्यांचा अल्प भाग टोचला गेला तरी त्यामुळे मनाचा वास्तवाशी संबंध झट्दिशी तुटतो. त्याच्या दृक्, श्राव्य, नस्य, स्पर्ध, स्वाद्य संवेदना एकमेकात मिसळून जातात. त्याला रंगातून

स्वरातून गंधाचे परिमळ उठू लागतात. थोडक्यात जे वास्तवात अशक्य ते एल. एस. डी. मुळे स्वप्नपातळीवर शक्य होत असल्याने या 'देवी' अनुभवाची ओढ अंमल करणाऱ्याला लागते आणि मग त्यांच्या नशेत तो पार गुरफटत राहतो.

अर्थात हे प्रत्येकाला याच प्रकारे दिसेल, अनुभवाला येईल असे मात्र नाही. अनेकांना एल. एस. डी. भीतीच्या अशा काही महाभयानक विश्वात नेऊन सोडते की, वास्तवातील तारतम्य व वस्तुनिष्ठ दृष्टिकोन वापरण्यास ते असमर्थ ठरतात. यालाच नशेबाजांच्या दुनियेत 'सुखसफर' वा 'दुःखसफर' अशा संज्ञा आहेत.

त्यांच्या सेवनाने कुणाला सुखसफर अनुभवायला मिळेल; नि कुणाच्या वाटचास दुःखसफर येईल याला काही धरबंध नाही. एकाद्याला एकादवेळी सुखसफर अनुभवता आली तरी दुसऱ्या खेपेस अगदी त्याचप्रकारे आनंदयात्रा घडेल असे नाही, उलट दुसऱ्या खेपेस दुःस्वप्नांच्या दुनियेचा फेरफटकाच त्याच्या नशिबी येऊ शकेल.

खूपदा आपल्या असल्या 'आनंदयात्रा'ची अद्भूत वर्णने दोस्तांना ऐकवून त्याना या पदार्थांच्या जाळचात ओढले जाते. विशेषतः समवयस्क सोबत्याने सांगितलेला हा अनुभव कोवळ्या किशोर–किशोरीना कमालीचा प्रलोभनकारी वाटतो.

एल. एस. डी. चे मनावर होणारे परिणाम एवढे खोल असतात की, एकादाच डोस त्याला पुरे मनोविचलित करू शकतो. त्या सवयी-पासून परावृत्त झालेली मुले मनाने कमालीची खचलेली राहतात; एवढेच नव्हे तर आत्महत्येलाही प्रवृत्त होतात.

तिसऱ्या प्रकारच्या प्रतवारीस वैद्यक परिभाषेत 'नार्कोटिक्स' म्हणतात. खऱ्याने नशा आणणारे व मन व शरीराला पूर्णतः गुलाम बनवणारे पदार्थ हेच असतात. अफू, अफूजन्य पदार्थ (ओलिअेट्स–यात मॉर्फिन, हेरॉईन यांचा समावेश होतो, तसेच डेमेरॉल हे कृत्रिम ओपियॉईडही यातच येते) यांची गणना या वर्गवारीत होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३९८४
दा. क्र. २५१४
दि. १८।१०।९६
शाखा (स्थल

सौम्य डोस घेतल्यावर माणसाला त्यामुळे आपण चिंतामुक्त व सुखी–समाधानी आहो असा आभास मिळतो. पण अत्यंत वेगाने त्याची सवय मनाला व शरीराला ग्रासून टाकते. त्यामुळे शरीराच्या अनेक महत्त्वाच्या व जीवनावश्यक प्रक्रियाच त्यांच्या सेवनावर विसंबून राहू लागतात. त्यामुळे ही सवय सोडण्याचा प्रयत्न केला की प्रथम शरीरच बंड पुकारून उठते. आणि अत्यंत तीव्र स्वरूपाच्या 'विड्रॉवल सिम्पटम्क' दाखवते. या दारुण यातनापूर्ण अवस्थेला धैर्याने सहन करणे बहुतांश नशेबाजांना अशक्य होते. म्हणूनच त्यांच्यापासून त्याना मुक्त करणे आत्यंतिक अवघड व कर्मकठीण होऊन बसते.

चरस, भांग, गांजा, मेरिजुआना आदि जे वनस्पतीजन्य नशिले पदार्थ आहेत ते यातील नेमक्या कुठल्या वर्गवारीत बसतात ?

चरस-मेरिजुआना हे तात्पुरती नशा आणणारे पदार्थ आहेत. त्यांची अफूजन्य पदार्थांप्रमाणे सवय लागत नाही व त्यामुळे शारीरिक गुलामीही लादली जात नाही, असा एक युक्तिवाद त्यांचे समर्थक करीत असतात. काही मर्यादेपुरते त्यांचे म्हणणे खरे आहे. अर्थात चरस–गांजा–मेरिजुआना यानेही माणूस 'तारे'त राहतो. आणि तेवढ्या वेळापुरता त्याचा वास्तवाशी संबंध तुटतो. या नशेखाली अनेकांना आभासही होतात. त्यामुळे प्रदीर्घ सेवनानंतर शारीरिक गुलामी जरी नाही तरी मनावर होणाऱ्या विपरित परिणामांपासून हेही नशेबाज वाचू शकत नाहीत.

मेरिजुआना (भांग) पेक्षा चरस–गांजा हे या वर्गातले 'कडक' अंमली पदार्थ आहेत. दारूप्रमाणे ते भूक मारीत नाहीत वा शरीराला या सवयीचे दास बनवीत नाहीत ही (नि एवढीच एक) त्यांची जमेची बाजू. म्हणजे दगडापेक्षा वीट मऊ; पण डोक्यात घातला तर दगड काय नि वीट काय कपाळमोक्ष ठरलेलाच !

इथे प्रचलित व वाढत्या प्रमाणावर प्रसारात असलेल्या द्रव्यांचा म्हणजे चरस–गांजा व हेरॉईन यांचा तपशीलवार परिणाम पुढच्या प्रकरणात पाहू.

७

भांग वा चरस–गांजा ही द्रव्ये अगदी आदिम काळापासून माणसाला ज्ञात आहेत. चिनी वाङ्मयात त्यांचा उल्लेख पाच हजार वर्षांपूर्वी करण्यात आला आहे. आजमितीलादेखील त्यांचा जगभर प्रसार व उपयोग सर्वसामान्य माणसे करीत. संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालानुसार वीस कोटी माणसे आज या द्रव्यांची नशा करीत असतात. म्हणजेच दारूच्या खालोखाल लोकप्रिय नशिला पदार्थ म्हणून त्यांचा क्रम लागतो.

भांग व चरस यांच्या सुखविभ्रमकारी गुणांचा प्रत्यय आमच्या प्राचीन पूर्वजांना आलेला होता. म्हणूनच आमच्या सामुदायिक आनंद-सोहळ्यात त्याना दोन घटका करमणूक म्हणून आग्रहाने स्थान दिले गेले. या सुखविभ्रमकारक गुणामुळेच सर्वसंगपरित्याग करून वास्तवा पासून दूर जाऊ बघणाऱ्या साधूसंन्याश्यांना गांज्याची चिलीम ही आपल्या संन्यस्त जीवनातील एक जिवलग मैत्रिणच वाटत असते. त्यांनी विशेषतः शाक्त कापालिक वगैरेनी आपल्या धार्मिक विधीतच त्यांना स्थान दिल्याने त्यांच्याभोवती आणखी गूढ आध्यात्मिक वलय निर्माण झाले.

'मेरिजुआना' उर्फ भांगचे वनस्पतीय नाव आहे. कॅनॅबीज सतिवा किंवा निव्वळ कॅनॅबीज, चरस, गांजा ही याच जातकुळीतील वनस्पती. मात्र ती मेरिजुआनापेक्षा विलक्षण कडक असते.

ही वनस्पती वन्य आहे. ती जवळ जवळ सर्व जगात रानोमाळ वाढते. मात्र काही काही पौर्वात्य देशात तिची नशेबाजीसाठी खास लागवड केली जाते. भांगेचे झाड उंच असते. त्याचे खोड किंवा दांडा

तंतूयुक्त असतो व त्यापासून दोरखंडे व भरड कापड तयार होते. त्याच्या बिया पक्ष्यांच्या खाद्यात मिसळल्या जातात. वनस्पती नर वा मादी जातीची असते. त्यातील फक्त स्त्री जातीचे झाडच अंमली पदार्थ देते. हा पदार्थ फुलाभोवतालच्या व वरच्या वरच्या पानातल्या चिकात असतो. भांग किंवा मेरिजुआना म्हणून ही फुले व पानेच वापरली जातात.

उष्ण कटिबंधात चिकाचे प्रमाण अधिक असते. भांगेच्या 'असली' पानाफुलात झाडाची खालच्या अंगाची पाने मिसळून त्यांची तीव्रता व कडकपणा कमी केला जातो. नर व मादी जातीची सरमिसळ लागवड केली तरीही चिकाचे प्रमाण कमी होते.

भारतात हशीश किंवा चरस म्हणून जे उत्पादन तयार होते ते भांगेच्या सातआठ पटीने कडक असते.

भांग किंवा मेरिजुआना निरुपद्रवी असे मानताना हा फरक लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. कारण मनाला 'तारे' त नेणारा पदार्थ जेवढा कडक तेवढे त्याचे परिणामही अधिक दूरगामी व तीव्र असतात.

भारतात सणासुदीसाठी, होळीसारख्या सामुहिक आनंदोत्सवासाठी तसेच आध्यात्मिक 'तार' जमवण्यासाठी जसा या पदार्थांचा पूर्वापार वापर केला जातो तसाच तो औषध म्हणूनही केला जातो. शारीरिक पीडा, मनावरील ताण, व्याधीतील वेदना शमविण्यासाठी त्यांचा वैद्यकीय उपयोग भारतात तसेच मध्यपूर्वेतील युनानी वैद्यकात पूर्वापार केला जातो. तसेच निव्वळ नशा यावी म्हणूनही त्याचा वापर होतो.

अर्थात नशेसाठी (वा अन्य हेतूनी) जर चरसासारखे कडक द्रव्य सातत्याने वापरात ठेवले तर त्याचाही अतिरिक्त मद्यसेवनासारखाच दुष्परिणाम होतो. कडक द्रव्याचे सेवन अधिक प्रमाणात व वरचेवर करावे लागते.

असे म्हणतात की, भांग–चरस या द्रव्यांचा प्रसार भारतातूनच जगभर झाला. अर्थात लॅटिन अमेरिकेतील इंटियन्समध्ये देखील या

द्रव्यांचा प्रसार खूप जुना आहे. या इंडियन कामगारांनी १९२० च्या सुमारास प्रथमत: अमेरिकेत ही द्रव्ये नेली आणि हलके हलके विद्यार्थी कलावंतात त्यांचा प्रसार होऊ लागला.

भांग व चरस ही द्रव्ये नशेच्या प्रतवारीत 'सुखविभ्रमकारी' द्रव्यात घालता येतील. कारण हीही माणसाला अल्प प्रमाणात व अल्पकाळ वास्तवापासून दूर स्वप्नांच्या–हवं तर 'दिवास्वप्ना' च्या जगात नेत असतात. मनाच्या या तरळ अवस्थेत नशेबाज आपले दु:ख, ताणतणाव, विवंचना विसरून तेथल्या खोट्या आभासयुक्त जगात निर्धास्त जगत असतो.

भांग किंवा मेरिजुआना हा पदार्थ तंबाखूसारखा मुख्यत्वे धुराद्वारे ओढला जातो. त्याचा धूर दीर्घ श्वास ओढून आत फुप्फुसात भरून घेतला की, त्यांतील नशेबाज द्रव्ये प्राणवायूबरोबर रक्तात मिसळतात आणि त्वरित आपले काम बजावू लागतात व त्याचा परिणाम एक ते तीन तास टिकतो.

तशी ती खाद्यान्नात, विशेषत: मिठाईत, सरबतात, पेयात मिसळून पोटावाटेही घेतली जाते. अर्थात अशा प्रकारे तिचे सेवन केले तर तिचा परिणाम एक ते दीड तासाने जाणवू लागतो व तो चार एक तास टिकतो.

या पदार्थाच्या सेवनाचा शरीरावर तात्काळ काय परिणाम घडतो ? त्यामुळे नाडीचे ठोके जलद पडतात व रक्तदाबही वाढतो. डोळ्यांच्या बाहुल्या मोठ्या होतात. वरचेवर लघवीस जाण्याची भावना होते. रक्तातील साखरेची पातळी वाढते. भूक प्रज्वलित होते. विशेषत: गोड पदार्थ खाण्याची भावना बळावते.

भांग जर प्रमाणाबाहेर शरीरात गेली तर तोंड, घसा कोरडे पडतात आणि चक्कर आल्यासारखे वाटते.

त्यांच्या सेवनानंतर जिथे शरीराच्या विविध स्नायूचे एकजिनसी चलनवलन लागते तशा स्वरूपाचे कुठलेही शारीरिक काम त्यांना करता येत नाही. डोस मोठा असेल तर काळ व अंतर यांचे भान हरवते. अननुभवी माणसाला तर त्यामुळे फारच गोंधळात जायला होते.

या नशेच्या तारेत चव व स्पर्श या दोन संवेदना तीव्रतम बनतात. चिंतामुक्त, तणावमुक्त असे वातावरण तयार झाल्यासारखे वाटते. त्यामुळे सहसा दोस्तमंडळीत ते घेतले जातात.

नशेचा अंमला उतरू लागला की गुंगी व झोप येते.

अतिसेवनाने एल. एस. डी. सारखेंच आभास व्हायला लागतात. शरीरापासून आपण स्वतः अलग होतो आहो, रंगांतून वाद्यांचा झणत्कार झणझणतो आहे किंवा सुरातून रंगांचे इंद्रधनुष्य उमलते आहे असे अद्‌भूत आभास होतात किंवा भीतिदायक दुःस्वप्ने जागेपणी पाठपुरावा करीत राहतात. अननुभवी माणसाला असे भीतिदायक अनुभव आले तर त्या भीतीच्या सावल्या त्याचा दीर्घकाळ पाठलाग करीत राहतात. हे खोटे आहे, चुकीचे आहे हे जाणवून देखील तो बऱ्याचदा भयमुक्त होऊ शकत नाही. नव्हे, आपले डोके फिरलेले असून आपण पुनः पूर्वीसारखे नॉर्मल होणार नाही असे त्याच्या मनाने आधीच घेतलेले असते.

भांगेमुळे शारीरिक गुलामी येत नाही हे खरे आहे; पण भांगेपेक्षा सवाई कडक अशा चरस–गांजाच्या सेवनाने मात्र शरीरावर दुष्परिणाम घडत राहतात. त्यांतील सर्वात मोठा परिणाम डोळ्यांवर होतो. गंभीर स्वरूपाचा ब्रॉकायटिस निद्रानाश, पचनसंस्थेच्या व्याधी या पदार्थांच्या दीर्घ व अधिक प्रमाणावरील सेवनाने होतात. त्यांची एकूणच तब्बेत पार ढासळलेली आढळते.

अेल. अेस. डी. मुळे डोक्यावर, मनावर जसा विपरित परिणाम होतो तसा चरस–गांजाचा होतो का ? याबद्दल अजून तरी वैद्यकशास्त्र निश्चित निर्णय देऊ शकत नाही. पण त्यांच्या दीर्घकालीन सेवनाचा परिणाम माणसाचे व्यक्तिमत्व बदलण्यात मात्र होतो असे तज्ञांचे मत आहे. अर्थात हे बदल तात्पुरत्या स्वरूपाचे असतात, आणि व्यसनमुक्त झाल्यानंतर माणूस पुनः पूर्वस्थितीत येण्याची शक्यता खूपच अधिक असते.

या पदार्थाची सवय जडू शकते का ? म्हणजे ते घेतले नाहीत तर मन बंड करून उठेल, येनकेन प्रकारण ते मिळवण्याचा प्रयत्न करील, त्यासाठी कुठलेही भयानक दुष्कृत्ये करण्यास उद्युक्त होईल असे त्यांच्याबाबत घडते का ? नाही–निदान चरस–गांजाची सवय माणसाला या परिसीमेपर्यंत तरी नेत नाही. अर्थात यातील काही थोड्या माणसांच्या बाबतीत मात्र ही सवय त्यांच्या जीवनाची अगदी आद्यतम गरज बनून राहिलेली दिसते.

पण या सवयीचे वैशिष्ट्य म्हणजे जसे हेरॉईन वा गर्दची सवय सतत जसा वाढत्या प्रमाणातील डोस मागत राहते. तो सतत वाढवून मिळाला नाही तर शरीर व मन पिसाळून उठते तसे यांच्याबाबतीत घडत नाही.

जगात आज लक्षावधी माणसे सकाळी जागी होतात ती ह्याचमुळे आजच्या 'डोस'चे पैसे कुठून उभे करायचे या विवंचनेने. पैशांची फिकीर तर सगळ्यांना पडत असते. आणि कडोविकडीच्या महागाईच्या आजच्या काळात तर रोज सकाळी दुधाच्या पैशापासून रोजचे बसभाडे, मुलांच्या फीया, पुस्तके, भाजी, मिरची–कोथिंबीर, वाणसामानापर्यंत रोजच्या रोज लागणारे पंधरावीस रुपये आणायचे कुठून या विवंचनेत सर्वसामान्य संसारी माणूस होरपळत असतो. पण या गर्दुल्या माणसाची विवंचना नि आपल्यासारख्यांची चिंता यात जमीनअस्मानाचा फरक असतो.

व्यसनापायी या लाखो माणसांनी एव्हापर्यंत जवळ असेल नसेल ती सगळी पुंजी, सगळा पगार गमावलेला असतो. व्यसन फार पुढे गेलेले असेल तर अगदी तीन तीन, चार चार हजार रुपये पगारही वारंवार उचल करून त्यानी आधीच फस्त केलेला असतो. घरात विकण्याजोगे असेल ते सगळे किडुकमिडुक त्यानी फुंकून टाकलेले असते. विद्यार्थ्याची अभ्यासाची पुस्तके, किंमती उपकरणे, घड्याळे, अंगठ्या, गळ्यातील सोनसाखळ्या आदि वस्तूंना केव्हाच मारवाड्याचे दुकान दिसलेले असते.

त्यातील अनेकांची मजल किरकोळ उचलेगिरीपर्यंत केव्हाच पोचलेली असते. आणि जाग येताच आता कुठे 'हात मारला तर पैसे मिळतील' ही एकच काळजी त्यांना उठताबसता भेडसावत असते. व्यसन जर पुढच्या पायरीवर असेल तर जाग येताच त्याना नवा डोस घेण्याची गरज भासत असते– आणि तोही वाढता.

हव्या त्या प्रमाणात कसाही, कुठूनही नशेचा कोटा मिळावा. त्यासाठी पैसे मिळावेत म्हणून गुन्हेगारीची कुठलीही परमसीमा गाठायला हे गर्दचे गुलाम तयार असतात !

गर्दचे गुलाम ?

होय– ही एकच संज्ञा या व्यसनाधीनांचे निश्चित वर्णन करू शकते.

'गर्द' किंवा भरड हेरॉईन नेमके कसे असते ?

हेरॉईन म्हणजे शुद्ध केलेली अफू. साध्या रासायनिक प्रक्रियेने अफूचे शुद्धिकरण करण्यात येते तेव्हा त्यापासून मॉर्फीन, हेरॉईन आदि ओपियॉइडस मिळतात. याचप्रकारे 'कोका' या वनस्पतीपासून 'कोकेन' हे द्रव्य मिळविले जाते.

शुद्ध 'हेरॉईन' किंवा कोकेन हे पांढरे शुभ्र असते; अर्थात 'कोकेन' हे अत्यंत महागडे द्रव्य असल्याने इथे त्याचा वापर अगदी वरच्या वर्गातच नि तोही क्वचित केला जातो. आठशे ते हजार रुपये तोळा दराचे हे द्रव्य अर्थात परवडणार तरी कुणाला ? मात्र अमेरिकेत उच्चभ्रू वर्गात मुख्यत्वे 'कोकेन'चा मोठ्या प्रमाणात प्रसार आहे. गर्द उर्फ ब्राऊन शुगर म्हणजे अशुद्ध स्वरूपाचे हेरॉईन. त्याचा रंग करडापिंगट असतो आणि साधारणतः खांडसरीच्या पिठीसारखे ते दिसते. म्हणून त्याचे नाव ब्राऊन शुगर.

बाजारात तिची छोटी पुडी रुपया–दोन रुपयापासून मिळते. बोटाच्या पेराएवढ्या कुपीला साधारणतः चाळीस ते पन्नास रुपये पडतात. गर्द सिगरेटमध्ये घालून ओढता येते. पण बहुधा ती सिगरेटच्या चांदीवर पेटवून तिचा धूर दातात दहा पैशांचे नाणे पकडून नाका-

तोंडात घेण्यात येतो या धुराचा प्रवेश फुप्फुसात झाल्याक्षणापासून त्याचा परिणाम सुरू होतो.

मुख्यत्वे हे सगळेच नशिले पदार्थ मध्यवर्ती मज्जासंस्थेवरच परिणाम घडवत असल्याने त्याचा पहिल्याछूट परिणाम तुमच्या मनावर होतो. मनावर कुठल्या ना कुठल्या प्रकाराने दडपण आलेले असेल, औदासिन्य जमलेले असेल, कुठली चिंता–विवंचना सतावीत असेल तर त्यांचा बोजा एकदम नाहीसा होतो. मनाची ही मुक्त, बोजारहित अवस्था अर्थातच माणसाला एकदम सुखवते. नशेचा अंमल असेस्तोवर मनाची ही निर्धास्त अवस्था कायम राहते. पण एकदा तिचा अंमल उतरला की, मग मात्र पुन: जुन्या चिंता, भीति, काळज्या यांची भुते मनावर स्वार होतात.

कारण 'त्यांची जी मूळ कारणे असतात ती मनात नसतात मनाबाहेर असतात'. खूपदा या बाह्य कारणांचा इलाज करून मनाला चिंता–विवंचनापासून मुक्त करणे माणसाच्या आधीन नसते. त्यावर करायचे इलाज योजण्याची धमक नसते. वास्तविक मनाला भेडसावणाऱ्या कुठल्याही प्रश्नाची उकल त्या प्रश्नाचे वास्तव स्वरूप जाणूनच करायला हवी असते. पण खूपदा माणसे तसे करायला कचरतात मग मनाला व्याधिमुक्त करण्याच्या या खोट्या आभासात्मक मार्गाकडे वळतात.

शहामृगाबद्दल एक गोष्ट–किंवा आख्यायिका म्हणा हवी तर–प्रचलित आहे. वादळ येताना दिसले की शहामृग त्या वादळाकडे पाठ करते. आणि निवारा शोधण्याऐवजी तिथेच वाळूत डोके खुपसून बसते. वादळ यायचे अर्थातच थांबत नाही. ते येते–घोंघावत वाळूचे डोंगर इतस्तत: उडवते आणि निघून जाते. बिचारा शहामृग वाळूच्या ढिगाखाली केव्हाच गाडलेला असतो.

गर्दच्या आहारी जाणाऱ्या व्यसनाधीनाची अवस्था या शहामृगासारखी असते. सभोवतालच्या कठोर वास्तवाशी कणखरपणे आमनेसामने मुकाबला करण्याऐवजी तो नशेच्या खोट्या 'सुखभ्रमा' चा

आसरा घेतो. सुख मिळत नाहीच; आणि दुःख–संकटे मात्र अधिक तीव्र व गुंतागुंतीची बनून राहतात. वादळाचा भीषण चक्रवात बनून त्याच्यावर रोरावत येतात. परिणाम अटळ असतो. कुत्र्याच्या मोतीचे मरण, कणाकणाने शरीर व मन कुरतडून खाणारे मरण !

आणि मरण येण्याआधीचे जगणे ? तेही जिवंत मरणच असते की ! मरणाच्या कळा परवडतील; पण या जिते रहाण्याच्या यातना त्याहून कठीण. कपाळावर भळभळती अक्षय्य वाहणारी जखम घेऊन जिवंत पिशाच्याप्रमाणे फिरणाऱ्या अश्वत्थाम्यासारखेच जगणे ते. त्याला सारखे तेल हवे असते आणि याला ती 'पिंगट पुड !'

नशेबाजीच्या आहारी माणसे का जातात ? त्याचे काही गणित असते का ? नियम असतात का ? माणसातील व्यक्तिगत उणीवा वा दोष त्याला व्यसनाकडे नेण्यास कारणीभूत होतात की, सामाजिक परिस्थितीतही त्याला हातभार लावते ? आज अशी कोणती परिस्थिती आहे की, आमची तरुण पिढी गर्दच्या गर्तेत अशी वेगाने खेचली जात आहे ?

८

'गर्द' घेणाऱ्या माणसांत आज आबालवृद्धापासून समाजातील सर्व वर्गातील, सर्व थरातील माणसे आढळतात. ही माणसे एकाच सामाजिक तणावाची शिकार आहेत, असे मानायचे का ?

हजारोंच्या संख्येने तरुण मुले जेव्हा या व्यसनाला अंगिकारतात, तेव्हा ती सारीच्या सारी मनोगंडाने पछाडलेली असतात असे तरी मानायचे का ?

गणितात खूप मोठमोठे आकडयांचे समूह तुमच्या पुढ्यात ठेवले

जातात आणि त्यांचा परस्परांशी संबंध जोडण्यास सांगितले जाते. बघायला गेले तर ते सगळे आकडे अगदी वेगळे नि परस्पराशी फटकून राहिलेले दिसतात. पण नीट बघितले की, त्याचे सूत्र आपल्याला सापडते. त्यांचा एकमेकांना छेद देत आपण त्यांचा 'लसावि' एकदा शोधला की, ते गणिताचे उत्तर आपल्या हाती येते.

गोंधळून टाकणारी सामाजिक परिस्थिती, समाजातील विविध ताणतणाव, अर्थ व राजकारण, शिक्षण व कायदा याचे एक अगडबंब जंजाळ आपल्या पुढ्यात अक्राळविक्राळ फैलावलेले आहे. त्या गुंत्याला असाच छेद देत आपल्याला 'लसावि' शोधून काढायचा आहे.

इसापने तो असाच शोधून दिला होता !

घोडा का अडला ? भाकरी का करपली ? पान का सडले ? म्हटले तर तीन अगदी वेगवेगळे प्रश्न– एकाचा दुसऱ्याशी काडीमात्र संबंध जुळवता येणार इतके भिन्न. पण चतुर इसापने त्यांचा 'लसावि' शोधला आणि उत्तर सापडले ! हे सगळे का घडले ? न फिरवल्याने. फिरवला नाही तर घोडा अडतो. फिरवली नाही तर भाकरी जागच्या जागी करपते; नि फिरवली नाही तर विड्याची पाने जागच्या जागी सडून जातात !

'गर्द'च्या संदर्भात असा 'लसावि' काढणं जमेल का आपल्याला ? पण त्यासाठी आधी प्रश्न काय आहेत हे समजून घेऊ या.

खरं सांगू का, अवघड व किचकट प्रश्न सोडवणं आपल्या सर्वांनाच नकोसे वाटते. त्याबाबतीत आपण त्या वरच्या शहामृगाचे सख्खे भाईबंद आहो. वादळ येतंय ? मिटून घ्या डोळे– म्हणजे आपल्या लेखी ते आलेच नाही असे समजायला बरे. अर्थात ते येते नि सर्वांसकट आपल्याला देखील भरडून, चिरडून जाते.

तसं थोडं अर्थकारण आलं, राजकारण, आकडे आले की, आम्ही बिचकतो आणि म्हणतो, 'मरू दे आमचा काय संबंध ?' त्यापेक्षा आम्ही फर्मास हिंदी सिनेमा बघतो; नाहीतर फक्कड कादंबरी वाचतो. डोक्याला ताप नको नि ब्याप नको.'

हेच ते. याच पळपुट्या शहामृगी वृत्तीने माणसं आज नशेबाजीला कवटाळत आहेत.

'डोक्याला ताप नको' हे जगण्याचं सूत्र असू शकत नाही हे आम्हाला कधी समजणार? 'नशेच्या सुखविभ्रमा'त झुलणाऱ्या नशेबाजाला जशी त्याची चिलीम दूर करून कठोरपणे वास्तवाला सामोरे न्यायला हवे ना तसे तुमच्या आमच्याबाबत आज करण्याची वेळ आली आहे. तरच 'गर्द'चा अंधार कशामुळे गडद होतो आणि हा अंधार दूर सारण्याचे उपाय कोणते हे आपण सर्व, तुम्ही आम्ही नि समाजसुधारक, राजकारणी, अर्थकारणी, शिक्षण तज्ज्ञ आदि सगळे मिळून शोधून काढू शकू.

सुरुवात आपल्या राहत्या ठिकाणापासूनच करू. म्हणजे समजा तुम्ही मुंबईत राहता आहा, किंवा तत्सम एकाद्या महानगरात राहता आहा. तिथे रोजच्या दैनंदिन जीवनाचा तुमचा अनुभव काय?

एकदम कोलाहल करू नका. मला माहितेय् तुम्ही काय सांगणार ते–गर्दी, झोपडपट्ट्या, राहत्या जागेची टंचाई, वाहनांची प्रचंड त्रुटी, शाळा–कॉलेजात प्रवेशासाठी, परीक्षांसाठी चालणारा भ्रष्टाचार, पोलीसांचा आठमुठेपणा, पालिका कर्मचाऱ्यांची मुजोरी, पिण्याच्या पाण्याची टंचाई– एकूण काय, तुम्ही जिथे राहता त्या जागेत, त्या मोहल्ल्यात त्या शहरात तुम्ही सुखी नाही आहात. तिथल्या रोजच्या जगण्याचे ताण अगदी अहोरात्र तुमच्या मनावर, शरीरावर असह्य दबाव टाकत असतात.

तुम्ही नोकरदार असाल तर तुमची राहती जागा व नोकरीची जागा यात किमान दोन तासाचे अंतर बहुधा असणार. दोन–दोन नि कधी तीन देखील वाहने बदलून तुम्ही रोजच्या रोज ही ये जा करीत असणार. घरची गृहिणीही नोकरदार असेल तर या कसरतीसोबत घरच्यांच्या पोटापाण्याची विवंचना तिचा पिछा सतत पुरवत असते.

हे आणा, ते आणा, हे पैसे भरायला हवेत, यावेळी हा वाढीव खर्च आहे, मे पूर्वी दोन्ही महिन्यांची फी द्यायला हवी तर तिन्ही

पोराचे दीडदोनशे रुपये बाजूला काढायला हवेत. पोराला मार्क कमी पडले, अभ्यास करवून घ्यायचा आहे, कामवाली आली नाही, नळाचे पाणी गेले, महिना झाला गॅसच नाही, वाण्याकडचे तांदूळ–साखर रॉकेल संपले. भाज्यांचे भाव दहा रुपये किलो झाले एक क्षण असा जात नाही की यातली एकादी तरी भुणभुण तुमच्या मागे लागलेली नाही.

तुम्ही गरीब असाल तर या सगळ्यावरोबर आणखी नको त्या विवंचना उरावर धोंडा बनून टपकतात. सरकार नि पोलीस झोपड-पट्टी तोडणार म्हणे–मुकादमानं तीन दिवसांचा खाडा लावलाय, रोजंदारीत मुकादमानं तीस पैशांऐवजी पन्नास पैशाचं कमिशन घेतलं, झोपडी गळतेय, चाळ खाली करा म्हणून सरकारची नोटीस लागलीय (कोसळू घातलीय ना), हागिनदारीच्या जागेवर नवी इमारत उभी राहतेय् (बायामुलीनी कुठे जायचं आता संडासला? कुठं जायचं लघवीला? पोलीस हप्ते मागतात, मुन्सिपाल्टीवाले हप्ता मागतात, टगे गुंड पोरीची, जवान बायकोची छेड काढतात– या नि अशा आणखी देखील कित्येक,

माझी खात्री आहे तुमच्यापैकी अनेकांना अशा समस्या अस्तित्वात असतात याचीही बऱ्याच वेळा कल्पना नसते. कारण तुमचे जग तुम्ही वेगळे मानता; नि त्यांचे जग ते!

इथे शेजारच्या माणसाची फिकीर करायला कुणाला वेळ नसतो मग ही तर वेगळ्या वस्तीची माणसं न बघितलेल्या, माहीत नसलेल्या अज्ञात वस्तीचे जग. आमचा काय संबंध त्यांच्याशी? नि त्याचा आमच्याशी?

खरं आहे. महानगराच्या पोटात अशी असंख्य जगे सामावलेली असतात. नि ति सर्व एकमेकांना पार अनोळखी असतात. ही जगे वेग-वेगळ्या वस्त्यातच राहतात असे नाही. अगदी एकाघरात राहाणाऱ्या माणसांचे देखील अलग अलग जग असू शकते.

उदाहरणार्थ तुमचा कॉलेजात जाणारा किंवा बेकार पदवीधर

म्हणून नोकरीच्या शोधात वणवण फिरणारा मुलगा. या मुलाच्या वयोगटातली असंख्य मेले. त्यांच्या जगाबद्दल तुम्हाला काय माहिती आहे ? काहीही नाही ! तिथल्या समस्याबद्दल ? काही नाही !

मुलगा तुमचा असतो. तुमच्या डोळ्यांदेखतच वाढत मोठा झालेला असतो. पण तुम्ही तुमच्या विवंचनात इतके गर्क की कधी 'अरे, केवढा उंच झाला रे हा' असा आश्चर्याचा धक्कादेखील तुम्हाला बसतो. पण तो तेवढ्या पुरताच. तो वाढणार, मोठा होणार, उंच होणार हे अर्थात गृहितच धरलेले असते. मूल वाढणार, मोठे होणार, तरूण, प्रौढ होत वृद्धत्वाकडे वाटचाल करणार–त्यांत काय मोठेसे. आम्ही नाही का असे वाढलो ? मोठे झालो!

बरोबर आहे– जीवशास्त्रीयदृष्टया ढोबळ मानाने बघितलं तर हे म्हणणं काही चुकीचं नाही. पण एक गृहित तत्त्व थोडं चुकीचं आहे–तुमचे मूल–मुलगा–मुलगी मोठी होतात ती तुमच्याप्रमाणे मोठी होत नाहीत. तुमच्यापेक्षा भन्नाट वेगाने मोठी होत असतात. वाढण्याचा हा भयावह वेग ना त्यांच्या शरीराला पेलत ना त्यांच्या मनाला. आजच्या किशोरवयीन मुलांच्या सगळ्या समस्यांचे मूळ यात आहे याची कधी जाणीव झालीय् तुम्हाला ?

तरुण, किशोरवयीन मुले नशाबाजीकडे का वळतात हे समजून घ्यायचं तर या मूळ गाभ्यापासूनच प्रश्नाला हात घालायला हवा.

वेगाचा हा भन्नाटपणा खरं तर तुम्हालाही भिरभिरून टाकीत असतो. त्याच्याशी जुळतं घेण्यात तुमच्या सगळ्या चित्तवृत्ती गुंतून राहिलेल्या असतात. घड्याळाच्या सेकंद काटयाशी जणू तुमचे आयुष्य बांधलेले असते. तुम्ही एकटेच नाही धावत– तुमच्याबरोबर सारे घरच त्या दावणीला जुंपलेले असते. अगदी शाळेत जाणाऱ्या पिटुकल्या पिंटयापर्यंत.

'पिंटया सहा वाजले. उठ लौकर, शाळेची बस येईल.'

'पिंटया अरे किती वेळ– आंघोळ आटोप. दूध निवून चाललंय्.'

'पिंटया पळ– बस उभी राहिली खाली.'

असा पिंटच्याचा दिवस घड्याळासोबत सुरू होतो; आणि पंधरा मिनीटे पाणी प्यायची, पाच मिनीटे लघवीची, पंचवीस मिनीटे जेवणाची असा काटेकोर हिशेव करीत संध्याकाळी घरी येतो की, पुनः घड्याळाच्या दावणीला जुंपला जातो.

'आई आठ वाजले छायागीत लाव ना.'

'पिंटच्या साडेनऊ वाजून गेले किती वेळ टी. व्ही. पुढे बसणार आणखी ? उद्याचं होमवर्क करू चल.'

'अकरा वाजले नाहीत तर झोपतोस कसला ? ही गणितं कुणी सोडवायची ?'

पिंटच्या दमतो; अक्षरशः दमतो. पुरी दमछाक होऊन अंथरुणाला पाठ लागते न लागते तोच दुसऱ्या दिवशीचे सहा वाजतात की झालीच सुरू सेकंदकाट्यावरची कसरत.

आता आईबाबांचं बरोबरच असतं. पिंटच्याला वर्गात वरचा नंबर काढायलाच हवा असतो. नि कमी मार्क मिळवून तर मुलाचं भागत नाही. कारण बालवयापासूनच अशी धडाकेबाज मजल मारल्याखेरीज पिंटच्याचे पुढच्या आयुष्यात भागणारच नाही अशी त्यांची अगदी नितांत श्रद्धा असते. आणि या एकाच उद्दिष्टाने ते स्वतःही मरेमरेस्तोवर राबत असतात. पिंटच्याबरोबर त्यांचीही अहोरात्र दमछाक होत असते. पण पिंटच्याच्या उज्ज्वल भवितव्यावर नजर ठेवून ते तो सहन करीत असतात. अशा धडाकेबाज वेगातच केव्हातरी पिंटच्या एकदम मोठा झाला आहे असे त्याना जाणवते.

हे बदल पिंटच्या नि त्याच्या वयाची हजारो, लाखो मुलामुलीना कितपत पचनी पडतात ? सहजगत्या अंगवळणी पडतात ? मुख्य म्हणजे हे बदल सहजगत्या निसर्ग नियमानुसार होतात की, इतर काही निसर्गबाह्य गोष्टी त्याना धसमुसळेपणाने बाल्यावस्थेतून किशोरावस्थेत खेचून आणतात ?

शांतपणे विचार केला तर असं दिसतं की, आपलं बालपण ज्या वातावरणात गेलं त्यांत नि आजच्या मुलांच्या बालपणी वातावरणात

भयंकर तफावत आहे. वातावरण म्हणजे परिस्थिती नव्हे.

'आमच्या बालपणी साजुक तुपाखेरीज आम्ही कधी काही खाल्लं नाही–मेल्यानो तुमच्या नशिबी हे दरिद्री वनस्पती तूप–' असं आमची आजी करवादून म्हणायची. तिच्या, माझ्या आईच्या बाळपणीच्या आठवणी या एकूणच तेव्हाच्या स्वस्ताईशी, सुबत्तेशी निगडीत होत्या.

तुमच्या एवढ्या वयात आख्खे 'रेनेन् मार्टिन' पालथे पाडले होते आम्ही; नि अजून इंग्रजी व्याकरणाची एबीसी नाही येत लेको तुम्हाला' वडीलधारी दटावून कानपिचक्या द्यायची तेव्हा त्यांचा एकूण रोख असायचा घसरलेल्या शैक्षणिक दर्जावर.

हे सोडलं तर आमच्या पिढीचे म्हणा आमच्या आईवडीलांच्या पिढीचे म्हणा बालपण काही फारसे वेगळे गेलेले नव्हते. त्यांच्यासारखीच भातुकली, विटीदांडू, क्रिकेट आम्ही खेळायचो. अवान्तर वाचनाचा ओघ त्यांच्या आवडीनिवडीतून सुरू होऊन मग नव्या कवीलेखकांपर्यंत यायचा.

फडके–खांडेकर–रविकिरण मंडळ–कुसुमाग्रज त्यांच्या पिढीचे असतील, आम्ही गोखले–गाडगीळ–भाव्याना उचलून धरत असू. सुर्वे–ढसाळांच्या कवितांना माथी मिरवत असू. त्याना शेरलॉक होम्स प्रिय असेल; आम्ही जेम्स हॅडले चेस, पेरी मॅसनवाल्या गार्डनरचे फॅन असू. पण वाचनातील ही उत्क्रांती कशी सहज व अलगद लेझाली असायची.

पण पुस्तक म्हणजे दृश्य माध्यमातलं कॉम्मिक? ही कल्पना मात्र पार नवीन होती. आम्हाला ती पचनीही पडत नव्हती. पण आमच्या मुलाबाळानी ती केव्हाच पचविली होती. पुस्तकच नव्हे, या मुलांच्या आजुबाजूचे सगळे जगच मुळी विलक्षण भुरळपणाच्या रंगांनी नथळत होते. साधेसुधे रंग नव्हेत– सायकॅडेलिक रंग. झगझगत्या, झिळमिळत्या रंगांचा उत्सव अवतीभवती साजरा होत होता. अनेकदा तर सडक्याकिडक्या गोष्टीदेखील रंगाचे असे दिमाखदार बुरखे पांघरून खुणावत रहायच्या.

आमचे बालपण नि या मुलांचे हे बालपण असे पार वेगळेच बनलेले होते. त्याचे स्वरूप नेमके कसे आहे, तसे का घडले, कुणी घडवले आणि त्यामुळे मुलांच्या एकूणच विकासप्रक्रियेवर त्याचा कसकसा परिणाम होत गेला तेही जरा बघू. नि त्याचवेळी त्याचा कार्यकारणभाव, अर्थ व जिम्मेदारी निश्चित करू.

१

आजची मुलं विलक्षण हुषार आहेत. आम्ही त्यांच्या वयाचे होतो त्यावेळी आम्हाला जगाबद्दलचे जे सर्वसामान्य ज्ञान (किंवा खरं म्हणजे अज्ञान) होते ते या मुलांकडे असलेल्या सामान्य ज्ञानाच्या पासंगाला पुरणार नाही. आमच्या वेळेसारखे राक्षस नि पऱ्या नि विदुषक त्यांच्या परीकथात नसतात. तिथे कॉम्प्युटर असतात. ग्रह-परग्रहावरची चित्रविचित्र माणसे व प्राणी असतात. 'स्टारवॉर्स' हा त्यांच्या परीकथातला थरारक अनुभव असतो.

मघाशी या मुलांच्या जगातील रंगाबद्दल म्हटलं होतं. आजच्या या मुलांचे रंगविषयक ज्ञान व भान कमालीचे थक्क करून सोडणारे आहे. त्याना रंगांची अनेक इंग्रजी नावे आणि त्यांच्या छटा अचूक उमगता येतात. रंगसंगतीचे भान खूपच विकसित झालेले असते.

स्वतःचे कपडे व पोशाख याबद्दल त्यांच्या आवडीनिवडी तर चोखंदळ असतातच; पण आईवडिलांच्या कपड्यांबद्दल देखील ती खूपच रस घेतात.

त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयीदेखील पार भिन्न आहेत. त्या बद्दल त्याना फारसा विधीनिषेधही वाटत नाही. वरच्या वर्गात तर तयार डबाबंद अन्न ही चालू फॅशनच बनल्याने हॅम वा सलामी किंवा

'सँडविच मिट' घालून बनविलेले सँडविच हेच मुलांच्या खाऊच्या डब्यातले मुख्य अन्न असते.

मुलांच्या या आवडीनिवडी काही उत्क्रांतीच्या नियमानुसार पालटलेल्या नाहीत. त्याना तसे घडविण्यासाठी अनेक बाह्यात्कारी गोष्टी काम करीत असतात. त्यातील सर्वात महत्त्वाचा प्रभाव टाकतो तो दूरदर्शन.

दूरदर्शनवरच्या जाहिराती या अगदी छोटचा मुलांवरही विलक्षण मोहिनी घालत असतात. माझ्या ओळखीची कितीतरी लहान मुले (उम्र दोनतीन ते पाचसात) दूरदर्शनवरच्या फक्त जाहिरातीच अगदी आसुसून बघत असतात. मुख्य कार्यक्रम सुरू झाला की ती खेळायला बाहेर पळतात. या जाहिरातींमुळे एकूणच राहणीमानाबद्दल त्यांच्या बालकल्पना अगदी निश्चित होऊन जातात.

शहरांत राहाणाऱ्या मुलांना तर जाहिरातींचे मोठमोठे फलक पावलोपावली बघायला मिळत असतात. मासिका-साप्ताहिकातून या जाहिराती कमालीच्या आकर्षक रंगातून पुढे येत असतात. कपडचांची नवनवी अद्यावत् डिझाइन्स प्रत्यही नजरेखालून जात असतात.

शहरातल्या मुलांचे रंग व आकृत्या यांचे भान यामुळे अगदी नकळत प्रगल्भ होत असते. मुलांसाठी ज्या चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात त्यात हे अगदी प्रकर्षाने जाणवत राहते.

दुसरा मोठा प्रभाव म्हणजे चित्रपट. खोटी बाजारू मूल्ये, उघडेनागडे वासनाकांड आणि कडोविकडीचा हिंसाचार यांचे बेबंद प्रदर्शन करणारे हे चित्रपट आजवर चित्रपटगृहात बंदिस्त होते. पण दूरदर्शनने त्यांचा साप्ताहिक उकडा घरोघर सुरू केला आणि व्हीडीओचे पेव फुटल्याने तर खास प्रौढांचे 'ए' चित्रपट देखील चाळींच्या गच्चांवर, गल्लीच्या कोपऱ्यावर, दोस्ताच्या रिकाम्या खोलीत 'उत्सव' साजरे करू लागले.

अनेक इमारती-चाळीत असे मुलांचे खाजगी व्हीडीओ क्लब्ज आज बिनदिक्कत चालू असतात.

त्यासाठी वर्गणी जमवून पाचसहा चित्रपटांच्या कॅसेटस, रंगीत टी. व्ही. सेट व प्रक्षेपण यंत्रणा भाड्याने आणवली जाते. साधारणतः सुटीच्या आदल्या दिवशी संध्याकाळी पांचसहाला व्हीडीओ सुरू होतो; आणि जेवणाची सुटी, पाणी पिण्याचे मध्यंतर घेत पहाटे पाचसहापर्यन्त अविरत चालू राहतो. अगदी छोटी छोटी मुले आई-वडिलांच्या संमतीने हे पाच पाच चित्रपट एका दमात पाहात असतात.

अनेकदा तर एकादा फायटंफायईटचा वेस्टर्न वा अभिताभचा चित्रपट चारवेळा आणून बघण्यात येतो !

फॅशनपासून प्रेमापर्यंत आणि प्यारमोहब्बतीत पोरी कशा गटवाव्यात, कुणाची छेडछाड कशी करावी इथपासून लैंगिकतेपर्यन्त अनेक गोष्टींचे विकृत (डिस्टॉर्टेड) ज्ञान या मुलांना होते. गर्भधारणा प्रतिबंधक औषधाची माहिती त्याना या माध्यमद्वारेच होत असते.

मुलांवरचा तिसरा मोठा प्रभाव म्हणजे कॉमिक्स. आम्ही पुस्तके वाचत होतो; ते पुस्तके बघतात शब्दांच्या माध्यमातून आमच्या कल्पनाशक्तीच्या वकुबाप्रमाणे आम्ही पुस्तकातील जग आमच्या मनात उभे करायचो.

कॉमिक्समध्ये हे जग प्रत्यक्ष रंगीत स्वरूपात आधीच उभारलेले असते. तिथे शब्द केवळ खुलाशापुरते असतात. त्याना 'माध्यम' म्हणून प्रभावी अस्तित्व तिथे नसते.

नीट हेरले तर एक गोष्ट इथे लक्षात येईल की, मुलांच्या मनावर प्रभाव पाडणारी ही सगळी दृश्य-माध्यमे आहेत. या दृश्य-माध्यमाने त्यांच्या पुढ्यात आभासांच्या पातळीवरच आमचे परी-कथांतले अवास्तव स्वप्नाळू जगच खरे म्हणून मांडले जाते. तिथल्या रंगांनी, झुळझुळत्या संगीताने, आकर्षक सजावट व मांडणीने त्याला अव्वल त्रिमिती दिली जाते. ते सुंदर असते. हवेसे वाटते– प्रयत्न केला तर हाताच्या अंतरावर आवाक्यात असल्यासारखे भासते.

पण त्यांच्या वाट्याला आलेले वास्तव मात्र त्याहून वेगळे असते. वयाच्या तिसऱ्या वर्षी वह्यापुस्तकांचे दप्तर त्याच्या पाठुंगळी-वर बसते आणि सिंदबादच्या पाठुंगळीला बसलेल्या म्हाताऱ्याप्रमाणेच

दरसाल त्याचे ओझे वाढत राहते. अभ्यास व होमवर्क यांचा प्रचंड बोजा त्याच्या अंगावर संपूर्ण शाळकरी आयुष्यात पडलेला असतो.

नुसता अभ्यास करून भागत नाही. तिथे सतत भरपूर गुण मिळवावेच लागतात. वरचा क्रमांक मिळावा म्हणून धडपडावेच लागते. 'तुला डॉक्टर व्हायचेय, तुला इंजिनियर व्हायचेय, ऑर्किटेक्ट, कॉम्प्युटर तज्ज्ञ व्हायचेय, चार्टर्ड अकौंटट व्हायचेय' अशी ध्येये मुळात आईवडिलांनी त्यांच्यासाठी आधीच निश्चित केलेली असतात. त्यांच्या, या अपेक्षा पूर्ण कराव्यात म्हणून मुलांनी (आणि अर्थात् त्यांच्यासोबत आईबापानीदेखील!) रात्रीचा दिवस करून अभ्यास करायलाच हवा असतो.

आता, आईवडिलांनी मुलांच्या भवितव्याची उज्ज्वल स्वप्ने रंगविण्यात गैर काय आहे, असा कुणीही प्रश्न विचारील. आजकालचे आईवडील उलट तशी रंगवूनच थांबत नाहीत ते त्यासाठी स्वत: जातिनिशी धडपडत असतात. मुलांनी अभ्यासाचा विवक्षित दर्जा गाठावा म्हणून महागड्या ट्यूशन्स, कोचिंग क्लासेस, हरतऱ्हाची गाईडस् यावर पोटाला चिमटा घेऊन खर्च करीत असतात. कारण मुलाना नसलेल्या एका कठोर वास्तवाचे भान त्याला त्यांच्या अनुभवातून फार पूर्वीच मिळालेले असते. या जगात साधी कारकुनीची बऱ्यापैकी नोकरी मिळवायची तरी त्यासाठी निव्वळ प्रथमश्रेणी संपादन करून भागत नाही; त्यासाठी गुणांचे पर्वतप्राय ढिगारेच रचायला हवेत.

अगदी कॉलेजात प्रवेश मिळवायचा तरीही नुसती श्रेणी मिळवून भागत नाही; अगदी ऐशीनव्वद टक्के गुणच मिळवायला हवेत. याहून कमी गुण म्हणजे कॉलेज प्रवेशासाठी शहरभर वणवण; या जंजाळातून सुटायचे तर उत्तम गुण, प्रथमोत्तम दर्जाचे गुण मिळविण्याचे कसब मुलात बालवयापासूनच अंगी बाणायला हवे अशी आईवडिलांची धडपड.

शहरातील, महानगरातील जगण्याचे ताणतणाव आईवडिलाना

देखील डाचत असतात. घराबाहेर नानाविध तऱ्हेचे धोके आपल्या अपरोक्ष मुलांना वेढून टाकतील अशी भीती भेडसावत असते. त्यामुळे बाहेर खेळायला न जाता मुलांनी घरातच रमावे. आपण येईस्तोवर उगाच इथेतिथे भटकंती करू नये म्हणून दूरदर्शन संच घरात आणला जातो.

'आम्ही मुलांसाठी टी. व्ही. आणला' असे सांगणारे खूप आईवडील माझ्या माहितीचे आहेत.

जमेल तेव्हा, जरूर तेव्हा कठोर वास्तवापासून दूर पळण्यासाठी मुले त्यांच्याभोवती विणलेल्या रंगीत आभासांच्या जगात विरंगुळा शोधतात. तिथे विनासायास हाती येणाऱ्या माहितीचा जमेल तसा अन्वयार्थ लावून शरीराने वयात येण्याआधीच कितीतरी पूर्वी मनाने मोठी होतात.

मुलांच्या मनाला विलक्षण तणाव देणारी आणखी एक गोष्ट म्हणजे इंग्रजी माध्यम. इंग्रजी भाषा म्हणजे जगातल्या सगळ्या सुखांची, यशाची गुरुकिल्ली असा सार्वत्रिक समज व्हायला अर्थातच आमच्या केंद्र व राज्य सरकारांचे शिक्षणविषयक भोंगळ व भोंदू धोरण कारणीभूत आहे. पण कारण काहीही असो; आपला मुलगा (किंवा मुलगी) इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिकली नाही तर त्याला आयुष्यात कसलेही भवितव्य नाही असा ठाम समज आज सर्व-सामान्य भारतीय माणसाचा होऊन राहिला आहे. अगदी गरीबातला गरीब माणूस देखील मुलाला शक्यतो इंग्रजीतून शिकवायला धडपडत असतो.

मातृभाषा एक नि माध्यम दुसरे अशा कात्रीत मुलाची अक्षरशः ससेहोलपट होते. त्यात पुनः आईबाप अडाणी वा इंग्रजी न येणारे असतील तर, इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांत एक वेगळाच अहंगड बालपणापासून पोसला जातो.

इंग्रजी माध्यमाशी जुळवता जुळवता त्याच्या आयुष्याची अनमोल वर्षे निव्वळ घोकंपट्टीत जातात. शिक्षणापासून ज्ञानाचे संस्कार न होता

निव्वळ पाठांतराचे होतात (अर्थात हे निव्वळ इंग्रजी माध्यमातच घडते असे नाही– अगदी मातृभाषेच्या माध्यमातूनही घडते !) मन ओझ्याच्या गाढवाप्रमाणे पाठांतराचे उतारे पुस्तकातून उचलून परीक्षेच्या उत्तर पत्रिकेत ओतते; आणि स्वतः कोरे करकरीत राहते.

दृश्य प्रसार माध्यमातून मिळणारे हजारो भलेबुरे संस्कार या कोऱ्या मनाचा ताबा घेतात यात नवल ते काय ?

मुले मोठी होऊ लागतात तसतसे कठोर वास्तवाची प्रत्यक्ष झळ त्याला पोचू लागते. भ्रष्टाचार आणि काळा पैसा यांचा प्रत्यक्ष संबंध त्याला पदोपदी नाडू लागते– अगदी कॉलेजप्रवेशापासून नोकरीसाठी वशिला लावावा इथपर्यन्त.

मूल्यांचे संस्कार मुळातच झालेले नसतात किंवा अगदी तकलादू असतात. त्याना तिथून नेस्तनाबूत करून नवी बाजारू मूल्ये त्याची जागा घेतात.

'पैसा कोण खात नाही ?' असा सवाल भ्रष्टाचाराच्या संदर्भात तो सहजी विचारू शकतो. या सवालाचे उत्तर अर्थातच त्या प्रश्नातच छपलेले असते– पैसा सगळे खातात. जमले तर मीही खाईन !

ज्यांना या बाजारू मूल्यांनादेखील जवळ करणे जमत नाही ती स्वतःशीच पिचतात, वैतागतात, चडफडतात आणि या ताणतणावापासून दोन घटका दूर जावे म्हणून दारू घेतात, चरस–गांजा जवळ करतात, गर्दचे झुरके घेतात !

हे झुरके त्यांना दृश्य माध्यमांनी रंगविलेल्या, मोहमयी दुनियेची साक्षात् सैर घडवतात. कारण नशेच्या या दुनियेत देखील दृक् संवेदना, श्राव्य संवेदना विलक्षण उत्तेजित झालेल्या असतात. प्रथम हलके होते मनावरचे ओझे. एकदम हलके व तरळ.

त्याच्या अनुभवांनी उत्तेजित झालेली मुले आपल्या सहाध्यायाना, दोस्तांना त्या धुंदीचे अवर्णनीय सुखद अनुभव सांगतात आणि झुरक्यांची सवय लावतात. पहिल्या पहिल्या लहानश्या दमांनी खरोखरच चिंतामुक्त बनल्याचा प्रत्यय येत असल्याने मुलेही उत्सुकतेने

त्यांचा अंगिकार करतात आणि काही कळायच्या आत माशीप्रमाणे कोळ्याच्या जाळ्यात गुरफटतात.

मुलगा श्रीमंत वर्गाचा असू दे, नाहीतर मध्यम अथवा गरीब, त्याचा नशेबाजीच्या दिशेचा प्रवास साधारणतः याच 'लसावि' मुळे होतो.

यश, अत्युच्च यश यामागे आपल्या मुलांना गुलामासारखे खेचत नेण्याचा फार भयावह परिणाम दिसतो आजच्या जपानमध्ये.

शाळकरी मुलाला तिथे बाल्य नाही–तो असतो ज्ञानाचा गुलाम. ज्ञानही असेतसे नाही. जपानला तंत्रविज्ञानाच्या अत्युच्च शिखरावर नेण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, अपयशाला तिथल्या समाजात मुळी क्षमाच नाही. हे आईवडिलांइतकेच मुलांनाही माहीत असते. शाळेत अभ्यासात अपयशी ठरणारी मुले चक्क आत्महत्या करतात. कारण आत्मसन्मानासाठी आत्मघात करणे याला जपानने पूर्वापारपासून एक गौरवपरंपराच बहाल केली आहे.

पण तरीही जपानी विद्यार्थ्यांमधल्या आत्महत्येच्या वाढत्या भयावह प्रमाणामुळे तेथील समाजशास्त्रज्ञ कमालीचे चिंतीत बनलेले आहेत. या शास्त्रज्ञांना भेडसावणारे आणखी एक कारण म्हणजे जपानी माणसात विशेषतः तरुणात बोकाळू लागलेली मद्यपी वृत्ती, दारू पिऊन रस्त्यातून बेताल झिंगत जाणारा माणूस हे युद्धपूर्व जपानला अगदी अपरिचित दृश्य होते. पण आता सगळ्या मोठ्या जपानी शहरांचे ते नित्यपरिचयाचे दृश्य बनलेले आहे.

आणखी थोडी वर्षे जपानी माणूस आजच्याच ताणतणावाखाली जगत राहिला तर अंमली पदार्थांसाठी तो अगदी 'आदर्श'? बाजारपेठ ठरणार आहे!

अमेरिका, युरोप, आफ्रिका या सगळ्याच भूखंडात आज नशेबाजीने जे भन्नाट थैमान चालवले आहे त्यामागे हाच 'लसावि' थोड्याफार फरकाने काम करीत आहे, अतिश्रीमंती व सुखासीनता यांनी अमेरिकन तरुणाला सुखशांती लाभत नाही, तर भुकेकंगाल

आफ्रिकेत रिकाम्या पोटाची आग विसरावी आणि त्याच्या चोरट्या व्यापारातून, गुन्हेगारीतून चार दिडक्या कमावता याव्यात म्हणून आफ्रिकन माणूस नशेबाजीकडे वळतो. उध्वस्त मूल्यांचे पोकळ रिकामेपण युरोपीय तरुणाला असह्य भासते. त्यात पुनः वाढत्या बेकारीची झळ तिथल्या सगळ्याच राष्ट्रांना लहानमोठ्या प्रमाणात लागली आहे. जपानी मालाने युरोपीय बाजारपेठांची भयानक गळचेपी चालविल्याने तिथल्या कारखानदारीला मंदीचे दिवस आल्याने बेकारीचे प्रमाण वाढतच राहिले आहे. परदेशातून आलेल्या माणसानी आमची रोजीरोटी हिरावून घेतली या कल्पनेने तिथल्या अनेक देशांत वांशिक तणावही वाढू लागले आहेत. त्यात आणखी अमेरिका व रशिया या दोन महासत्तामधले शीतयुद्ध शिगेला पोचू लागल्याने तिसऱ्या महायुद्धाच्या सावल्या आपल्यामाथ्यावर भिरभिरत आहेत या भीतीने त्याना चांगलेच ग्रासून ठेवले आहे.

युरोपमधील अनेक देशात अमेरिकेची अण्वस्त्रे तळ ठोकून आहेत. तिसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला तर अणुयुद्धाचा जो आगडोंब उठणार आहे, त्यात निव्वळ युरोपच नव्हे अवघे जगच होरपळून नष्ट होणार आहे याची हताश जाणीव युरोपीय माणसाइतकी कुणालाही जाळीत नाही.

यातून सुटण्याचा मार्ग ? एकच– दम मारो दम; भुल जावो गम ! दुःख विसरू या– तसे मरायचे तर असे मरू या !

पश्चिम युरोपमधील बहुतेक देशांत आज हेरॉईनच्या नशेने प्रचंड उग्र रूप धारण केले आहे, ते याचमुळे. त्यातच तेथील वाढते राजकीय तणावही माणसांच्या मनावरचे अस्थिरतेचे सावट अधिक गडद करतात आणि त्याना नशेबाजीच्या गर्तेत लोटतात. युरोपातील देशात नशेबाजीविरुद्ध कडक कायदेकानू असून देखील त्यांची संख्या व त्याना मिळणारे चोरटे द्रव्य वाढू लागले आहे हे विशेष. अलिकडे अलिकडे स्वस्त दर्जाचे अशुद्ध हेरॉईन म्हणजेच ब्राऊन शुगर वा गर्द यांचा सुकाळ या देशात होऊ लागला आहे.

इंग्लंडमध्ये या मालाची चोरटी आयात मुख्यत्वे पाकिस्तानी करतात; तर फ्रान्स, स्वीडन, नॉर्वे येथे तुर्की माणसे त्यात गुंतलेली दिसतात. जर्मनीत हॉंगकॉंगी चिनी चोरटे अंमली पदार्थ पुरवितात. या देशातील कामगारवर्गात तसेच मध्यमवर्गात या व्यसनाचा जोरदार प्रसार झाला आहे. इंग्लिश नशेबाज मुले एकेका आठवड्याला दरडोई पन्नास तें दोनशे पौंड त्यासाठी खर्च करतात.

इंग्लंडसारख्या छोट्या देशात सुमारे पन्नास हजार गर्दुले असावेत असा अधिकृत आकडा आहे. आयर्लण्डमध्ये सहा हजार माणसे व्यसनाधीन आहेत. इंग्लंडमध्ये बेकार युवक व मंदीने ग्रासलेली लहानमोठी शहरे यातून या व्यसनाची लागण जबरदस्त प्रमाणावर दिसून येते.

पुढारलेल्या पाश्चिमात्य देशांची ही अवस्था तर, जिथे नशिले पदार्थ सहजासहजी उपलब्ध होऊ शकतात आणि त्यांना आळा घालणारे कायदे जवळ जवळ नगण्य आहेत तिथे काय होत असेल ?

आपल्या अगदी शेजारी नेपाळ व पाकिस्तानची या व्यसनाने काय हालत केली आहे तेही बघू :

नेपाळ हा भारताच्या सीमेवरचा देश. अंमली पदार्थांची उतारपेठ म्हणून या पदार्थाच्या माफिया तस्करानी या चिमुकल्या देशाची निवड केली आणि गेल्या पाच–सहा वर्षात नेपाळातील गर्दुल्यांची संख्या तीस पटीनें वाढली. काठमांडूच्या रस्त्यावरच हजारभर नशेबाज एका फटक्यात आढळतात.

नेपाळ हा सर्वार्थाने मागासलेला देश आहे. पर्यटन हाच सर्वात मोठा व्यवसाय देशात चालतो. हिमालयाच्या डोंगराळ कुशीत वसलेल्या या देशात शेती अत्यंत कष्टदायक नि कारखानदारीचा पद्धतशीर विकास नसल्याने रोजगार तयार होत नाहीत. त्यामुळे दारिद्र्याने गांजलेला नेपाळी अक्षरशः पोटासाठी देशोधडीला लागतो. भारतातील बऱ्याच शहरात नेपाळी मुली अक्षरशः फुकापासरी विकत आणून वेश्याव्यवसायाला लावल्या जातात. भारतातच रोजंदारीची समस्या

उग्र बनली तशी नेपाळचाना इथे सहजासहजी रोजगार मिळणे कठीण होऊ लागले. सगळचा अडाणी देशांप्रमाणेच लोकसंख्या वाढ आणि या वाढीमुळे निर्माण होणारे अन्नोदक–निवाऱ्याचे प्रश्न नेपाळलाही भेडसावत आहेत.

उतारपेठ म्हणून नेपाळात अफू सहजासहजी मिळू लागली तेव्हा चार आण्याच्या झुरक्यात पोटाची आणि मनाची सगळी विवंचना नेपाळी बुडवू लागला.

जे नेपाळात घडले तेच पाकिस्तानातही घडले. उतारपेठ पाकिस्तानात सरकली आणि अंमली व्यसनाधीनांचे प्रमाण अतिप्रचंड वाढले. आजमितीला पाकिस्तानात पंधरा ते अठरा लाख नशेबाज असावेत असा अधिकृत अंदाज आहे. आणि सालीना चाळीस हजार या गतीने त्यात नव्या व्यसनग्रस्तांची भर पडत आहे. सालीना चाळीस हजार म्हणजे दररोज सुमारे शंभर नवी माणसे या व्यसनाकडे ओढली जात आहेत. त्यात पुनः तिथे उपलब्ध असलेले हेरॉईन ७० ते ८० टक्के शुद्धतेचे असल्याने माणूस विलक्षण वेगाने या व्यसनाचा गुलाम बनतो.

पुनः ती मुख्य उतारपेठ असल्याने हे द्रव्य खूपच स्वस्त व सहज मिळते. साधारणतः एक ग्राम हेरॉईनला ४० पाकिस्तानी रुपये मोजावे लागतात; तर तेवढ्याच वजनाच्या शुद्ध मालाला अदमासे सत्तर पाक रुपये पडतात. याच मालाची न्यूयॉर्क वा पॅरीसमधील किंमत साडेतीन ते सात हजार रुपये इतकी आहे.

व्यसनाधीनाचा आकडा विलक्षण झपाट्याने वाढतो आहे हे एकच कारण पाक राज्यकर्त्यांच्या चिंतेचा विषय नाही– या व्यसनाधीनाचे सरासरी वय फार झपाट्याने विशीच्या घराकडे सरकू लागले आहे. व्यसनाधीनात ४७ टक्के माणसे साक्षर आहेत. खेड्यात जिथे सर्वसाधारण साक्षरतेचे प्रमाण चौदापंधरा टक्के आहे तिथेही नशेबाजी करणाऱ्यातील ४१ टक्के साक्षर आहेत.

पण तरीही भारत-पाक सीमेवरून हा माल धडाकेबाज वेगाने

भारताच्या हद्दीत नेला जात आहे. हा माल निव्वळ चोरूनच भारतात येतो असे नाही. पाक राज्यकर्त्यांचे त्या व्यापाराला आतून चांगले पाठबळ असावे, असे अनेक पुराव्यावरून दिसते.

वर भारत-पाक हेरगिरी व शीख दहशतवादी यांच्यासाठी पाकिस्तान हेरॉईन व अन्य अफूजन्य पदार्थांचा कसा वापर सी आय ए च्या प्रेरणेने व यंत्रणेने करते हे सांगितलेच आहे.

गंमतीचा भाग असा की, १९६० पर्यंत पाकिस्तान भारताकडून अफू आयात करीत असे. १९६१ मध्ये अध्यक्ष अयूबखान यानी ही आयात बंद केली व देशान्तर्गत अफू उत्पादन सुरू करण्याचे ठरविले. वायव्य सरहद्द प्रांतातील श्रीमंत जमीनदारांनी तात्काळ या निर्णयाला प्रतिसाद दिला व अफूची लागवड सुरू केली. अधिकृतरीत्या हा आकडा ३६०० एकर आहे, असे सांगितले गेले; पण प्रत्यक्षात त्याच्या कैकपट जमिनीवर अफूची लागवड करण्यात आली.

भुत्तो सत्तेवर आल्यानंतर त्यानी या लागवडीला जोरदार उत्तेजन दिले आणि त्याचा राजकीय वापर सुरू केला. अफू उत्पादनाचे पट्टे मुक्त हस्ते बहाल केल्याने वायव्य सरहद्द प्रान्त बलुचिस्तान येथील मोठमोठे सरदार व मलोक याना स्वतःच्या बाजूला वळवून घेणे त्याना शक्य झाले. अफूचे उत्पादनच नव्हे त्याची प्रक्रिया, वाहतूक यानाही बेबंद उत्तेजन देऊन 'अफू' हे भुत्तोनी राजकारणातले मोठे हत्यारच बनवले.

उत्पादनालाही सरकारचे अप्रत्यक्ष उत्तेजन मिळत असल्याने अफू-उत्पादक विभागात चोरटे अफू कारखाने फोफावले. अफूजन्य मालाचे चोरटे उत्पादन अधिकृत लाहोर कारखान्यापेक्षा कैक पटीने या कारखान्यात होऊ लागले.

या व्यापाराने संबंधिताना विलक्षण बरकत आली. तेव्हा साहजिकच या व्यापाराला आंतरराष्ट्रीय स्मगलर माफियानी आपल्या पंखाखाली घेतले.

अमेरिकेच्या दडपणामुळे झिया सरकारने अनिच्छेने अफू-उत्पादनावर कडक नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला तेव्हा साहजिकच

उत्पादक शेतकरी–शेतमजुरापासून व्यापारी–माफीयापर्यंत सर्वांना कडवा प्रतिकार केला.

तेव्हा झिया सरकारने आणखी वेगळे तंत्र अवलंबले. त्यानी भारताकडे पाकमधून जाणाऱ्या चोरट्या मालाकडे जाणूनबुजून काणाडोळा करायला सुरुवात केली. सीमा ओलांडून पाकिस्तानी हेरॉइन व अफू निर्धास्तपणे भारतात येऊ लागली आणि कोवळ्या भारतीय तरुणांना गांजलेल्या संसाऱ्याना, थकल्या भागलेल्या वृद्धाना एकाच सफाईने जाळ्यात गुरफटवू लागली.

हेरॉईन वा ब्राऊन शुगरचा व्यसनाधीन नशेच्या पैशांसाठी कितीही कडोविकडींचे कृत्य करू शकतो. पण तो कुठल्या थराला जातो याचे एक आत्यंतिक टोकाचे उदाहरण पाकिस्तानात अधिकृत-रीत्या नोंदलेले आहे.

रावळपिंडी येथील एक टॅक्सी–ड्रायव्हर फरीद अली या व्यसना-वर आपली सर्वच्या सर्व रोजची मिळकत उधळत असे. त्यावरून घरात सदैव कुरबूर चालायची. या कुरबुरीमुळे फरीद अलीला एका त्याच्या ठराविक डोसासाठी पैसे मिळाले नाहीत.

तेव्हा त्याने संतापून आपला स्वत:चा मुलगा साजिद याची कुऱ्हाडीने खांडोळी केली आणि त्याच्या रक्तामांसाची बिर्याणी बनवून आख्ख्या मोहल्ल्याला वाटली !

हेरॉईनमुळे माणूस पशुत्वाच्याही सीमा ओलांडून कसा सैतानात परावर्तित होतो त्याचे हे काळजाला थरकाप उडवणारे उदाहरण.

या मालाची उतारपेठ आता भारतात आली आहे. त्यामुळे इथेही व्यसनाधीशांचे व त्या अनुषंगाने गुन्हेगारीचे प्रमाण भयावह वाढू लागले यात नवल काहीच नाही.

प्रश्न असा आहे की, यातून आमच्या देशाला, आमच्या उगवत्या भावी पिढ्यांना वाचविण्याचा कोणताच मार्ग नाही का ? महापुराच्या वेळी भोवऱ्याच्या दिशेने गरगरत जाऊन मुले, माणसे, झाडे, गुरे जशी वेगाने नष्ट होतात तसे आमच्या मुलाबाळांची जिवंत मरणे आम्ही डोळ्यादेखत भोगायची का ?

१०

पहिली गोष्ट म्हणजे कायदा. भारतात अगदी आतापर्यन्त अगदी जुनाट कायदेच किरकोळ दुरुस्त्या करून अंमली पदार्थांच्या नियंत्रणासाठी वापरले जात.

जुनाट म्हणजे किती जुनाट? अगदी १८५७ सालचे म्हणजे चक्क बंडाच्या काळातले. त्यानंतर १८७८ व १९३० या काळात या अफूविषयक कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. बस्स. त्यानंतर म्हणजे १९८५ मधे नवा कायदा अंमलात येईस्तोवर हेच कायदे याबाबतच्या गुन्हेगारीची दखल घेत.

हे कायदे मुख्यत्वे ब्रिटिश सरकारची अफूची लागवड व अफूजन्य पदार्थाचे ब्रिटिश सरकारी उत्पादन यांचे हितसंबंध जपणारे असल्याने त्यात ना बदलत्या परिस्थितीचे भान होते ना भारतीय जनतेच्या हिताची कळकळ. त्यामुळे त्याना असलेल्या हजारो पळवाटांचा फायदा घेऊन लक्षावधी गुन्हेगार शहाजोगपणे सुटत.

गेली काही वर्षे नशेबाजी व अंमली पदार्थ यानी देशावर उघडे नागडे आक्रमण केल्यानंतर परवापरवा सरकारला जाग आली व त्यासंबंधीचा नवा कायदा तयार केला. दि. १४ नोव्हेंबर १९८५ रोजी हा 'दि नार्कोटिक्स ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रॉफिक सबस्टन्स १९८५' अस्तित्वात आला.

या कायद्यानुसार अंमली पदार्थ जवळ बाळगणे व त्यांची ने आण करणे यासाठी जबर तुरुंगवास व दंडाची तरतूद करण्यात आली आहे. पदार्थाचे बेकायदा व्यवहार करणाऱ्याला किमान दहा ते कमाल वीस वर्षे सश्रम कारावास देता येईल. तसेच दंडाची रक्कमही एक ते दोन लाख एवढी भरावी लागेल.

आतापर्यंत चारदोन वर्षे जास्तीत जास्त सजा व मामुली दंड असे. त्यामुळे या क्षेत्रांतील माफिया दादा आपल्या हस्तक गुन्हेगारांच्या कारावासातील काळात त्यांच्या कुटुंबियांची देखभाल करणे, दंडाची रक्कम भरणे या जबाबदाऱ्या बिनबोभाट पार पाडीत. बदल्यात त्या अडकलेल्या गुन्हेगाराने गुप्ततेची जालीम शपथ घ्यावी लागे. (याच गुप्ततेच्या शपथांचा भंग करण्यावरून माफिया संघटनेत खुनाखुनीचे सत्र चालते, आता मुंबईच्या गुन्हेगार जगात त्या खुनाखुनीचे लोण पसरल्याने या क्षेत्रात माफिया संघटना पाय रोवून इथे उतरली आहे या संशयाला बळकटीच येते.

कारावासाची प्रदीर्घ मुदत व जबर दंड यामुळे गुन्हेगार कुटुंबियाना पूर्वीप्रमाणे आर्थिक संरक्षण देणे अवघड जाईल, परिणामी गुप्ततेची शपथ सुटून खऱ्या गुन्हेगारांपर्यंत सहज पोचता येईल असा विश्वास पोलीसांना वाटतो.

पण खरे गुन्हेगार पकडून हे देशाच्या नसानसात फैलावणारे विष निपटून टाकता येईल का ?

या प्रश्नावर दोन बाजूनी इलाज करायला हवा. एक म्हणजे व्यसनाधीनाना या नरकातून बाहेर खेचून काढले पाहिजे आणि त्याचवेळी नवी सावजे, नवे बळी या व्यसनाकडे ओढले जाऊ नयेत म्हणून दक्षता घेतली पाहिजे.

या व्यसनाकडे नवी माणसे, तरुण वळू नये म्हणून आमची एकूण समाजव्यवस्था, येथली भ्रष्टाचारावर उभारलेली अर्थव्यवस्था, सडकी शिक्षण व्यवस्था बदलली पाहिजे हे तर खरेच. पण हे काही एका रात्रीत साध्य होणार नाही. ऐंशी करोड माणसांच्या या बहुढंगी देशात एकजिनसी सकस समाजव्यवस्था स्वीकारण्याएवढी बहुसंख्य माणसांची बौद्धिक, मानसिक तयारी होईपर्यंत किती अवधी लागेल ?

मग तोपर्यंत काय आमची तरुण पिढी अशीच गर्दच्या गर्तेत वाढत्या संख्येने ढकलत राह्यची ?

नवी लागण थोपवण्याचा तात्कालिक उपाय म्हणजे गर्द ही काय चीज आहे याचे अगदी शाळकरी पातळीपासून पद्धतशीर शिक्षण देणे.

त्याच्या सेवनाचे प्रत्येक पातळीवर काय परिणाम मनावर, शरीरावर होत राहतात याची संपूर्ण कल्पना चित्रांद्वारे, स्लाईडसद्वारे त्याना देणे. सुखभ्रम कसा होतो इथपासून आभासाचे जग कसे विणले जाते याची नीट तपशीलवार व अत्यंत सोप्या पद्धतीने माहिती देणे.

या आभासाच्या दुनियेतील झळझळते रंग, तिथले स्वर्गीय स्वर, मनाची तरळ अवस्था, शरीराचे हलकेपण हे सर्वच तद्दन खोटे असून त्यांच्या दुनियेत रमण्याने वास्तव बदलत नाही. ते बिघडत असेल तर आणखी बिघडते हे त्याना पटवून देणे.

विद्यार्थी व पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील पिढीचे अंतर कमी करून त्यांच्यात परस्पर संवाद निर्माण व्हावा म्हणून जेथे शक्य असेल तिथे अशी पालक–शिक्षक–विद्यार्थी याची मंडळे स्थापन करणे.

रिकाम्या मनांसाठी अनेक तऱ्हांचे छंदोवर्ग, क्रीडास्पर्धा भरवा. ग्रंथालये, वाचनालये, मोकळी मैदाने जिमखाने, आखाडे यांच्या सोयी सहज उपलब्ध करून द्या आणि शाळांतील अभ्यासक्रमाचे ओझे शाळेबाहेर घरापर्यन्त येऊ नये याची दक्षता घ्या. त्यासाठी सर्वात तातडीने व अग्रमहत्त्वाने करायला हवी ती शैक्षणिक सुधारणा. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील सुसंवाद वाढावा असे वाटत असेल तर प्रथम शिक्षक व विद्यार्थी यांचे प्रमाण निश्चित करायला हवे. पण त्याहून अधिक म्हणजे वाकबगार व हुषार माणसांना या क्षेत्रात रस वाटावा अशीही योजना आखायला हवी.

पण तरीही हे अगदी इकडचा डोंगर तिकडे हलवण्याएवढें कठीण काम आहे. त्यामुळे तूर्तास तरी अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबद्दल सर्व दूर यथायोग्य कल्पना देणे हा एकच उपाय आपल्या हाती आहे !

आता व्यसनग्रस्ताबद्दल. 'एकदा व्यसनी म्हणजे जन्माचा व्यसनी' असे त्याच्याबद्दल सांगितले जाते. वाघाच्या गुहेत जाणाऱ्याचीच पावले दिसतात आणि बाहेर येतात ती फक्त त्याची हाडे; असे बहुतांश व्यसनग्रस्ताबद्दल घडते.

पण नेटाचे प्रयत्न केले तर त्यानाही त्यातून बाहेर खेचता येते. पण त्यांच्यासाठी खास वेगळी उपचारकेंद्रे मात्र असायला हवी ही

उपचारकेंद्रे व्यसनाधीनांच्या खास वातावरणापेक्षा अगदी वेगळी मन:शांती देणाऱ्या निसर्गरम्य ठिकाणी असावीत; पण अगदी निर्जन जागी मात्र असू नयेत. या केंद्रावर या विषयातील तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, सेवाभावी परिचारक व कष्टाळू स्वयंसेवक यांचे सुसज्ज पथक असावे.

अनेकदा व्यसनग्रस्ताला स्वत:ला या घातुक सवयीपासून सुटका व्हावी असे मनोभावे वाटत असते, पण तो घाबरत असतो विड्रॉवल–सिम्प्टम्सच्या यमयातनाना. या यमयातनांवर काही रासायनिक इलाज आता डॉक्टर्सनी शोधून काढले आहेत. व्यसन सोडले की शरीर तडफडत त्याचा ठराविक व वाढीव डोस मागते त्यावेळी ही रसायने तज्ज्ञांच्या देखरेखीखाली दिली जातात. त्यामुळे नशेच्या अंमलाप्रमाणेच परिणाम घडतात; पण त्यांची सवय शरीराला लागत नाही. या रसायनांचा वापर करून शरीराला जडलेली ही घातुक गुलामगिरी सोडवली जाते. मग हळुहळू रोग्याची प्रतिकारशक्ती परत येऊ लागते आणि या शक्तीला मनोबळाची जोड देऊन तो व्यसनमुक्त होऊ शकतो.

हे आता लिहिले इतके सहजसोपे नाही. सतत वर्ष–दीड वर्ष ते दोनतीन वर्षे अथक प्रयत्न केल्यानंतर व्यसनाधीन त्यातून बाहेर पडण्याच्या परिस्थितीत येतो. एवढा प्रदीर्घकाळ त्याला उपचार केंद्रात डांबून ठेवणे तर शक्य नसते. पण त्याला त्याच्या पूर्वपरिचित गर्दुल्या वातावरणात परत पाठविणेदेखील धोकादायक असते. त्यासाठी या व्यसनमुक्तांवर उपचार करता करताच त्यांचे पुनर्वसन होऊ शकेल अशा दुय्यम केंद्रांचीही आवश्यकता असते. या केंद्रांच्या जवळ त्याला स्वतंत्रपणे राहता यावे घरसंसार थाटता यावा वा नव्याने सुरू करता यावा, आपले अर्थार्जन चालविता यावे अशी सोय असायला हवी.

या स्वतंत्र जगण्याच्या प्रयत्नात त्याना काही मानसिक अडचण आली, व्यग्रता निर्माण झाली तर त्यांना केंद्रातील परिचित मानसोपचार तज्ज्ञ वेळीच मदत देऊ शकतील.

उपचार केंद्रावर व्यसनमुक्त मंडळीना पगारी वा सेवाभावी मानद स्वयंसेवक म्हणून नेमणे उभयपक्षी खूपच फायदेशीर ठरते. एकतर त्याच्या पुनर्वसनाची समस्या आपसूक सुटते; आणि त्याचे उदाहरण सतत नजरेसमोर असल्याने व्यसनमुक्त होऊ इच्छिणाऱ्या माणसाना त्यामुळे मनोधैर्य लाभते. व्यसनमुक्त होणे म्हणजे काय याचा प्रत्यक्ष अनुभव गाठी असल्याने हे स्वयंसेवक विलक्षण जिद्दीने व तडफेने केंद्रातील हे काम करतात.

जिथे पुनर्वसन केंद्र उभारणे शक्य नाही तिथे सुटू इच्छिणाऱ्या व्यसनग्रस्तांचे व असे स्वयंसेवक यांचे गट बांधले पाहिजेत. मात्र व्यसनग्रस्तांच्या जुन्याच राहाण्याच्या ठिकाणी हे गट बांधले तर ते पहिल्या संधीला व्यसनाकडे वळण्याचा धोका मात्र अधिक असतो. म्हणूनच उपचार व पुनर्वसन केंद्रे त्यांच्या परिचित ठिकाणापासून अन्यत्र असणे अधिक फलदायी असते.

दुसरी गोष्ट म्हणजे यासाठी आवश्यक ते प्रशिक्षित डॉक्टर्स तयार करण्याची. हे डॉक्टर्स मानसोपचार तज्ज्ञ तर असायलाच हवेत. पण त्याना क्षेत्रातील नवनव्या उपचारपद्धतींचे व औषधांचे ज्ञान असणे अत्यावश्यक असते.

इतर कुठल्याही व्यवसायाप्रमाणेच आज वैद्यक व्यवसायदेखील पैसे पाडणारी टाकसाळ बनली आहे. त्यामुळे अशा केंद्राना पुरेसे डॉक्टर्स मिळणे विलक्षण अवघड आहे यात शंकाच नाही.

अशा केंद्रांचा एकूण खर्चही फार मोंठा असणार आहे आणि व्यसनग्रस्तांचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यांची संख्याही फार मोठी असावी लागणार आहे.

या खर्चाची ही प्रचंड जबाबदारी उचलायची कुणी ? अर्थातच समाजाने, सरकारने, तुम्ही आम्ही सगळ्यांनी मिळून.

'मला काय त्याचे ? माझा मुलगा नाही ना त्यात ? मग मी का फिकीर करायची–' अशा आत्मसंतुष्ट वृत्तीने या प्रश्नाबाबत स्वस्थ बसणे कुणालाही शक्य नाही– आज त्यात तुमचा मुलगा

नसेलही; पण उद्या तो त्यात ओढला जाणार नाही याची खात्री देऊ शकता तुम्ही ?

व्यसन फैलावू न देण्यासाठी योग्य ते वातावरण तयार करण्यासाठी जशी तुम्ही आम्ही सर्वांनी कंबर कसायची आहे तशीच व्यसनग्रस्ताना मार्गावर आणण्यासाठीही कसायला हवी, पिढ्यांमागून पिढ्यांचा ही अशी वाताहत थांबवायची तर हाच मार्ग आहे.

एकेकाळी चीनही या व्यसनाच्या गर्तेत अगदी गळ्यापर्यन्त बुडालेला होता. कर्जबाजारी शेतकरी, रंजलागांजला मध्यमवर्गीय, शासनयंत्रणेचे पाईक नोकरशहा, सरदार–दरकदार असे समाजातील सगळे थर या व्यसनाच्या चक्रात अडकले होते. अफीमबाजी हा त्याकाळी चीनचा एकमेव धर्म होता. त्याची लोकसंख्या आपल्यापेक्षा अफाट होती, नि देशाचा विस्तार आपल्या कैकपटीने मोठा. भुकेकंगाल माणसांच्या या देशाने क्रांतीनंतर अत्यंत कठोरषणे या विघातक व्यसनाचे पुरते निर्दालन केले. ज्या समाजव्यवस्थेत अशी व्यसने पोसली जातात त्या समाजव्यवस्थेलाच त्यानी नेस्तनाबूत करून तिथे नव्या समाजाची उभारणी केली. या व्यसनाधीनतेने चीनमध्ये वेश्याव्यवसाय हे स्त्रीच्या जगण्याचे मोठे साधन बनले होते नि तदनुषंगाने गुप्त रोगांचा फैलाव चीनमध्ये झाला होता.

पण या नानाविध सामाजिक समस्यांनी ग्रासलेल्या चिनी समाजाने स्वत:ला त्यातून बाहेर काढले; आणि पुढच्या पिढ्यांना त्यानी बरबादीतून वाचविले !

त्याना जे जमले ते आम्हा ऐंशी कोटी भारतीयांना जमणार नाही का ?

नक्की जमेल– निदान आपल्या मुलाबाळांसाठी, त्याना निकोप उद्या दिसाबा म्हणून तरी सगळी शक्ती एकवटून आम्ही अंमली नशेबाजी या राक्षसाशी प्राणपणाने मुकाबला करायला हवा.

तात्कालिक उपाय प्रथम योजून मग ज्या समाजव्यवस्थेत नशेबाजी, गुन्हेगारी फोफावते ती कशी निपटून टाकता येईल ते बघायला हवे.

त्यासाठी हवेत अथक परिश्रम आणि कठोर हात. या हातांनी प्रथम देशातील गुन्हेगारी व चोरट्या पदार्थांची, अंमली पदार्थांची तस्करी पुरती निपटून काढायला हवी. राजकारणात कितीही मोठ्या माणसापर्यन्त त्यांची मुळे पोचली असतील तर त्याच्यासकट हे गुन्हेगारी जाळे तोडून फोडून नष्ट करायला हवे.

कारण व्यसनाधीन मुले हा मुळी या गुन्हेगारीचा कच्चा मालच असतो. नशेच्या एकेका दमासाठी, घोटासाठी, इंजेक्शनसाठी नशेबाज अगदी पराकोटीचे दुष्कृत्य करायला तयार होतो– मग भले तो डाकादरोडा असू दे नाही तर खून !

अमेरिका, युरोपमध्ये या नशेबाबाजांच्या गुन्हेगारीने आज कळस गाठला आहे. ते लोण इथे पसरू नये असे वाटत असेल तर 'मुळे कुठार'च घालायला हवी.

आज ही मुले घरातील चिल्लर पैसे, वस्तू चोरत असतील. नशेची तल्लफ जसजशी वाढत जाईल तसे त्यांचे हे गुन्हे घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडतील. आजची अनेक व्यसनाधीन मुले नशिल्या पदार्थांची नेआण करून, खिसेकापू–पाकिटमार म्हणून चिल्लर गुन्हे करून नशा भागवत आहेत. आणखी थोडे दिवस गेले की, नशेसाठी हे पैसेही कमी पडू लागतील नि मग गुन्हेगारीच्या अव्वल क्षेत्रात पदार्पण होईल.

पण गुन्हेगारी निपटण्याचे काम वाटते तसे सोपे नाही. गुन्हेगार तस्करांच्या या जाळ्याला राजकीय संरक्षण वरपासून खालपर्यन्त लाभलेले असते. म्हणूनच किरकोळ गुन्हेगार सापडता. इथेतिथे धाडी पडून चोरटा माल पकडण्यात येतो. (अनेकदा तोही जनता व वृत्तपत्रे यांच्या डोळ्यात धुळ फेकण्यासाठी संगनमताने केले जाते !) त्याची वारेमाप जाहिरात केली जाते. बस्स. पुढे काहीही होत नाही– ना या जाळ्याचा मुख्य सूत्रधार सापडत ना त्याला संरक्षण देणारा राजकारणी.

भारतातील सगळचा ठिकाणी असे गुन्हेगारीलासंरक्षण देणारे राजकीय पुढारी उच्चासनांवर बसलेले आहेत. त्यांच्यावर आरोप-प्रत्यारोपांची फैर वृत्तपत्रातून झडते. विधीमंडळात चर्चा होते. पण त्यांचे कूस कधी वाकडे झालेले दिसत नाही

साटेलोटचाच्या राजकारणात ते पदभ्रष्ट होत नाहीत हेही समजण्यासारखे आहे. पण त्यांच्या काळचा कृत्यांची यादी जिथे आबालवृद्धांना तोंडपाठ असते तिथे ते बर्षानुवर्षे सदरशीर मार्गानी निवडून येत राहतात तेव्हा लोकशाही, वगैरे शब्द 'सुखभ्रम' असल्यासारखे वाटतात.

'पैसे फेका, पैसे पेरा, पैसे खा, पैशांनी पदव्यांपासून खुर्ची-पर्यन्त सगळे विकत घ्या' अशा पैशांवर उभारलेल्या आजच्या या समाजव्यवस्थेत नशेबाजी नाहीतर आणखी काय फोफावणार ?

पैशांच्या मागे धावणाऱ्या, ऐहिक यशाच्या मागे पळणाऱ्या, परक्या संस्कृतीची भ्रष्ट नक्कल व उचल करणाऱ्या बांडगुळी समाजात हे आणि हेच घडणे अपरिहार्य आहे.

शतकातकांच्या संस्कृतीचा वारसा मिरवणाऱ्या भारतीय समाजाचे हे दृष्ट परिवर्तन ज्या समाज व्यवस्थेने घडवले ती नासकी सडकी व्यवस्थाच आमच्या जीवनाचे यापुढेही अंग बनून राहणार असेल तर मात्र या देशाच्या पिढ्यानपिढ्या यापुढे अंधारातच गाडल्या जाणार आहेत.

प्रकाशाची एकेक नामोनिशाणी मिटवून!



परिशिष्ट–१

सारं वातावरण कसं दुधावरल्या दाट सायीसारखं दुलदुलीत मऊ नि मुलायम. असायलाच हवं तसं.

गरीब भारताची असली तरी राजधानी दिल्ली आहे ती. देशाचा कारभार चालविणारे मंत्री आणि त्यांचे ज्येष्ठ नोकरशहा. परदेशांचे राजनैतिक प्रतिनिधी आणि त्यांचे दुय्यम–तिय्यम सहकारी. येणारे जाणारे शाही पाहुणे. आंतरराष्ट्रीय संमेलने, बैठका, परिषदा.

या सगळ्यांची उठबस, येरझारा, वर्दळ, औपचारिक आणि अनौपचारिक मेजवान्या, खानपान–मेळावे, स्वागताचे नि निरोपाचे समारंभ–साऱ्या वातावरणात एक प्रकारचा शाही इतमाम ओतप्रेम भरून राहिलेला.

त्यात पुनः दिल्लीची नजाळत आणखी वेगळी आधी मोगलांचीच राजधानी. तेव्हाचे दरबारी इतमामाचा रुबाब तिच्या नसानसात मुरलेला.

मागून ब्रिटिशानी आपला मुख्य डेरा तिथे घातला. तेव्हा त्यांची साह्यबी शिस्त, शिष्टाचार तिच्या हाडीमासी खिळणे.

अभिषेक अशा मलईदार वातावरणात जन्माला आला. वाढला नि मोठा झाला.

त्याचे वडील दिल्लीदरबारचे ज्येष्ठतम सनदी. अधिकारी. सगळे वडीलभाऊ त्यांच्या उच्च शिक्षणाला साजेशा बडच्या-बडच्या नोकऱ्यात स्थिरस्थावर झालेले.

घरची गृहिणी, लेकीसुना या वातावरणाला साजेशा उच्चविद्याविभूषित. कुणी स्वतंत्र प्रज्ञेने व्यवसायात पडलेली,

कुणी सामाजिक कार्यात नाव मिळवून राहिलेली. कुणाच्या चोखंदळ कलारसिकतेला अवघ्या दिल्लीची दाद मिळून राह्यची.

अभिषेकचे भाऊ वडिलांच्या पंखाखाली वाढले, मोठे झाले, पण आता त्यांचेही पंख दहा दिशांना विस्तारलेले होते. कुणी इंग्लंडला कुणी अमेरिकेला, कुणी आणखी कुठे दूरपल्याडची क्षितिजे आपल्या पंखाखाली घेण्याच्या त्यांच्या उद्योगात अभिषेककडे नजर टाकायला कुणालाच सवड नव्हती तशी प्रथाही नव्हती घराची.

नि नजर कसली टाकायची? सगळ्या उच्च विद्यांचे संस्कार इतर भावंडाप्रमाणे त्याच्यावरही झाले होते. चांदीचा पाळणा नि सोन्याचा चमचा जन्मतःच लाभलेल्या मुलाला ऐहिक उणीव तर नव्हतीच कसली. पंखात बळ आले तसे बाकीचे दहादिशात फाकले; आभिषेकही निघालाच होता की !

निघाला होता, पण पोचला मात्र भलतीकडे. गर्दच्या भोवऱ्यात भेलकांडत जिथे तो पोचला तिथे आता काळोख नाही; पण उजेडही नाही. गतीची जाण नाही, दिशांचे भान नाही !

उच्च विद्या विभूषित अभिषेकला आकर्षण होते चित्रपट व्यवसायाचे. सुदैवाने त्याचे वडील अशा जागी होते की या व्यवसायातील सर्वोच्च शिक्षण ते आपल्या मुलाला विनासायास देऊ शकत होते. नव्हे व्यवसाय कुठला की निवडा ना त्याचं अगदी संपूर्ण व समग्र शास्त्रोक्त ज्ञान मुलाना मिळायलाच हवं यावर जबरदस्त कटाक्ष असे त्यांचा.

अभिषेक असा फिल्म इन्स्टिटचूटमधे आला. आता 'फिल्म इन्स्टिटचूट' ही या व्यवसायाचे शिक्षण देणारी सर्वोच्च व श्रेष्ठ संस्था. पुनः तिथला एकूण अभ्यासक्रम असा महागडा की तिथे विवक्षित वर्गाचीच मुले बव्हंशी असणार म्हणजे आपल्या देशातल्या श्रीमंत 'पब्लिक स्कूल' चाच हा वेगळा अवतार.

या रईस वातावरणात आपला मुलगा अगदी 'घरच्याप्रमाणेच' सुरक्षित राहिल असे बहुधा घरच्याना वाटले असावे.

इन्स्टिटचूटमध्ये अभिषेकने मित्रांसमवेत गर्दचे झुरके घेतले;

आणि मग तो घेतच राहिला. 'पॉकेटमनी' ची वानवा नव्हती; तेव्हा व्यसन कसे भागवायचे ही विवंचना नव्हती. अभिषेकने इन्स्टिटचूटची परीक्षा दिली; आणि तो प्रत्यक्ष चित्र व्यवसायात आला.

तिथं त्याचे बूड टिकेचं ना. कधी चित्रपट व्यवसायाची ही शाखा कधी ती शाखा दूरदर्शन, कधी कर्मशियल, कधी सिरीयल अभिषेकच्या हातून काहीच घडेनासे झाले. अपयशाकडून अपयशाकडे फक्त रस्ता वाहत राहिला तसा अभिषेक गर्दच्या जाळचात अधिकाधिक गुरफटत राहिला.

पण घरचे वातावरण असे वेगळे की अभिषेकमध्ये काही बदल घडलाय् हे ही कुणाला समजले नाही !

असेच खूप दिवस गेले, महिने गेले. दोन तीन वर्ष पसार झाली. तेव्हा मग त्याच्या मुंबईत स्थिरावलेल्या भावाला वाटलं अभिषेकचं काही फारसं बरं दिसत नाहीये.

मग त्याने हलकेच चाचपडायला सुरुवात केली. तेव्हा त्याच्या लक्षात आले की तो या व्यसनाच्या नादी लागलाय. त्यानेच त्याला डॉक्टरकडे नेले. नेले म्हणजे स्वाधीन केले.

डॉक्टर आणि अभिषेक यांची अनेकदा गाठभेट झाली. हे डॉक्टर महाशय जणू काही आपली दूरदर्शनसाठी मुलाखत घेताहेत अशा थाटानी व गुर्मीत अभिषेक वावरत होता. स्वत:चे कलावंतपण, मनस्वी वृत्ती, स्वत:चे आगळेपण डॉक्टरांच्या नजरेला ठसलेच पाहिजे असा एकूण अट्टाहास त्यांच्या दर मुलाखतीत होता.

पुन: हे व्यसन म्हणजे प्रतिभेचे संजीवक औषधच असा वर ठाम आग्रह. डॉक्टरांनी त्याला समजावण्याचा आटोकाट प्रयत्न केला. नि मग स्वारी गायबच झाली.

ज्याने आणले त्या भावालाही त्याचा काही थांगपत्ता नव्हता. मग भावाने चौकशी केली तेव्हा अभिषेक दिल्लीला असल्याचे कळले. तिथे दूरदर्शन मालिकांच्या खटपटीत गढलेल्या अभिषेकचे व्यसन आता पराकोटीला पोचल्याचे कळले.

तिथून परतण्याचा मार्ग निदान त्याच्या पुरता तरी पुरता पुसून गेलेला आहे.

पण असा पुसला जाऊ लागलेला मार्ग गौतमने स्वत:च्या हिंमतीवर खोदून काढला आहे. केवळ स्वत:च्या जबर इच्छा शक्तीच्या जोरावर.

गौतम कनिष्ठ मध्यम वर्गाच्या तळच्या पायरीवरचा मुलगा. घरात हातातोंडाची गाढ पडायची मुष्कील तिथे शिक्षण, संस्कारकसले कपाळाचे. इथली मुले वाढतात तसाच हाही वाढत; बिनबुडाच्या गाडग्यासारखा; नि तिथून घरंगळत 'आपकमाई' ला लागला !

आपकमाई म्हणजे सिनेमा तिकीटांचा काळाबाजार. बुकिंग सुरू व्हायच्या दिवशीच दोनेक दिवस हातापायी करावी लागायची. मग चैनच चैन. गुंतवलेल्या पैशाच्या दुप्पट तिप्पट पैसे एका फटक्यात हाती पडायचे. त्यात याच्याकडे ड्रायव्हिंगचे लायसेन्स होते. रात्री भाड्याने टॅक्सी चालवायचा म्हणजे तिकिटांच्या काळ्या बाजारातली कमाई म्हणजे शुद्ध वर कमाईची चांदीच की !

तिथेच गंमत म्हणून चरस, गांजा ओढायला सुरुवात केली. आणि तिथून गाडी 'गर्द' वर येऊन पोचली.

चरस घेत होता तिथवर रात्रीची टॅक्सी नि दिवसाचा काळाबाजार त्याने बऱ्यापैकी सांभाळला होता. थोडे पैसे गाठी पडत असत.

पण 'गर्द' सुरू झाले नि सारेच जाऊ लागले. पैसे तर केव्हाच संपले, टॅक्सी चालविण्याचे वरचेवर खाडे होऊ लागले तेव्हा टॅक्सी मालकाने त्याला बंदच करून टाकले.

या पराकोटीच्या नशिल्या अवस्थेत गौतमला एका गोष्टीचे भान होते. गर्दने आपली अशी 'हिनदीन' व्यवस्था केलीय् याची जाण होती. यातून सुटायचे तर कसेही करून गर्द सोडायलाच हवे या निर्धाराने मग तो आपणहून नशामुक्ती शिबीरात दाखल झाला.

झाला त्रास सुरुवातीला–जीव आता जातो की मग, अशा दारुण यातनानी आख्खे शरीर पेटून निघाले. पण गौतमचा निर्धार अभंग होता. वाट्टेल तो त्रास सहन करायचा, पण पुनः गर्दच्या वाटेला जायचे नाही म्हणजे नाही या आपल्या निर्णयाला तो ठाम चिकटून राहिला.

पहिले यातनामय दिवस उलटले. व्यसनावर उतारा म्हणून डॉक्टरानी दिलेल्या औषधांचा हलके हलके परिणाम होऊ लागला. गर्दपायी गमावलेली ताकद हळूहळू परत येऊ लागली. शरीर पुनः तरतरीत झाले, पण मन त्याआधीच उभारले होते.

पुढे काय करायचे हे गौतमने आधीच नक्की केले होते. टॅक्सी घालायची, प्रथम त्याने चालवायला टॅक्सी घेतली. त्यातून थोडेथोडे पैसे मागे टाकत. त्याने कर्ज उभारून स्वतःची टॅक्सी आता उभी केली आहे.

या नव्या जीवनात जुन्या आठवणींच्या छाया डोकावतात का कधी ?

सुरुवातीला खूप त्रास व्हायचा, टॅक्सी ओळखीच्या अड्डया. जवळून गेली की 'गर्द' च्या आठवणीने गलबलायला व्हायचे. पण गौतमच्या मनाचा निर्धार डगमगला नाही. पुढे तर असला त्रास व्हायचा नाही.

गौतम आता इतर गर्द पीडितांच्या मुक्ततेसाठी स्वतः प्रयत्न करतो.

★

परिशिष्ट– २

'या–'

डॉ. राजेंद्र बर्वेनी माझं हसत स्वागत केलं.

'तुमचं पुस्तक वाचलं मी. पण त्यात थोड्या तांत्रिक उणीवा

वाटताहेत. सांगू ?'

'जरूर सांगा–'

मी अगदी आग्रहपूर्वक म्हटले 'हे पुस्तक माझ्या विद्वत्तेचं वा ज्ञानाचं प्रदर्शन करण्यासाठी लिहिलेलं नाही मी. या विषयाबद्दल सर्वसामान्य माणसाला पूर्णपणे भान यावे हाच एक हेतू आहे त्यामागे. गर्दशी मुकाबला केवळ याच मार्गाने करता येईल. असं वाटतं मला–'

तुम्ही सुरुवातीला म्हटलंय बघा, रविंद्र सिंग जरा जर्जर अवस्थेत विसाव्या वर्षी मेला; कसा मेला तो माहीतेय ?'

'कसा म्हणजे ?'

'म्हणजे असं, या व्यसनाने माणसं मरतात किंवा नाही याची माहिती तुम्ही दिलेली नाही.'

'माणसं मरतात यामुळे ?' मी पृच्छा केली

'अशीच तांत्रिक माहिती अपुरी आहे तुमच्या पुस्तकात–' डॉक्टर सांगू लागले,

'या व्यसनाने माणूस का मरतो माहीत आहे ? त्याचे चक्क कुपोंषण होते म्हणून, आता कुपोषण कशामुळे होते ? तर शरीराला आवश्यक असलेली आहार द्रव्ये पुरेशा प्रमाणात पोटात न गेल्याने ती पुरेशा प्रमाणात पोटात जात नाहीत याचं सर्वात मोठं कारण म्हणजे व्यसनाच्या नशेत–किंवा तारेत म्हणा हवं तर–माणूस मुळात जेवतच नाही. नुसत्या याच व्यसनाबाबत नाही; दारूबाबतदेखील हेच घडते.

'दारूत काही प्रमाणात कॅलरीज (उष्मांक) असतात हे तर माहीतच असेल तुम्हाला. त्यामुळे दारू प्याली की माणसाला पोट भरल्यासारखं वाटतं. भूक लागली तर दारूडा करतो काय? तो जेवत नाही. परत दारू पितो. पुनः भुकेचे तात्पुरते शमन होते. अर्थात् दारूमधल्या कॅलरीज शरीराचे पोषण करण्यास असमर्थच असतात. मग कुपोषणातून उद्भवणारे सगळे आजार माणसाला ग्रासू लागतात.

'गर्द घेणाऱ्या माणसाचे असेच होते. गर्दचा जोर उतरला की त्याला एकदम खचल्यासारखे वाटू लागते. त्याचा जीव वेडापिसा होऊ लागतो. व्यसन पुढच्या कोटीला पोचलेले असेल तर भयंकर विड्रॉवल सिम्प्टक्स होऊ लागतात. अशा अवस्थेत माणसाला जेवण वगैरे नकोसे वाटते. त्याला एकच हवे असते. गर्द. ते घेतले की मग त्या तारेत तो तहान भूक हरपून असतो. गर्दच्या या अशा घातचक्रात शरीराला आवश्यक ती पोषण द्रव्य मिळणे दुरापास्त बनते-नि माणूस मृत्यूची शिकार बनतो!'

कुपोषणाने मरणाऱ्या माणसांची संख्या किती असेल अशी?

'संख्या नाही सांगता येणार. पण गर्दुल्यांच्या जीवन मर्यादे-बद्दल सांगू शकेन मी–'

किती जगतात ही माणसं ?

'माझे ऑस्ट्रेलियन डॉक्टर स्नेही आहेत ते गर्दच्या माणसाची जीवन रेषा पंचवीस वर ओढतात. अर्थात त्यांच्याकडे या व्यसनाचे प्रमाण खूपच भयानक, त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत आणखी प्रचंड. त्यात पुनः त्यांच्या जीवनमानाच्या विलक्षण सैलपणामुळे इतर विकार (यात एडस्सारखे लैंगिक विकार मोठ्या प्रमाणावर मोडतात) नि विकृती नशेबाजात मोठ्या प्रमाणावर पैलावत असतात. त्यामुळे हे डॉक्टर स्नेही म्हणतात. असा व्यवनासक्त पंचवीसपर्यंत जगला तरी मी त्याच्या जीवनेच्छेचे कौतुक करीन. आपल्याकडे इतकी आटोक्याबाहेर परिस्थिती गेली नाही. त्यामुळे माझ्या मते इथल्या नशेबाजांची आयुमर्यादा पस्तीसपर्यंत जायला हरकत नाही–'

पस्तीस ? माणसाच्या खऱ्या सुस्थिर, सुजाण आयुष्याला जिथून सुरुवात होते तिथे काही मंडळींनी स्वतःच्या हाताने स्वतःचे आयुष्य संपवायचे ? मी मनोमन शहारलेच.

'दुसरं म्हणजे गर्दकडे माणसं खूपदा प्रयोगादाखल वळतात. म्हणजे अनेक नशिले पदार्थ हाताळतानाच गर्द त्यांच्या हाती

लागते. नि मग त्याची रुची लागली तर तो गर्दचा गुलाम बनतो. एकदम 'गर्द' ने सुरुवात करणारी माणसं थोडी असतात, बरीचशी भांग, चरस, गांजा इतर औषधी द्रव्ये असा प्रवास करीत 'गर्द' च्या स्टेशनात येऊन पोचतात. आणि मग तिथेच मुक्काम ठोकतात.'

सगळीच जातात कशी ?

'छे: छे: अनेकजण चरस वगैरेतच मश्गुल असतात. चरसबद्दल तुम्ही लिहिलय ते बरोबर आहे. चरसमुळे शारीरिक गुलामी येत नाही. त्याचा वाढीव डोसही शरीर मागत नाही. पण सगळ्या नशाप्रमाणे शरीरावर चरसचेदेखील दुष्परिणाम होतातच–'

कसले दुष्परिणाम ?

'पहिला म्हणजे कुपोषण. कुपोषणामुळे शरीराची सर्व यंत्रणा एका मागून एक कोलमडू लागते. अगदी पेशी मागून पेशीदेखील मरणाच्या दिशेने वाटचाल करू लागतात. दुसरा मोठा दुष्परिणाम म्हणजे श्वसन व फुप्फुसाच्या विकारांचा. ही सगळी व्यसनं मुळात सिगारेट वा विडी, चिलीम या मार्गानेच केली जातात. त्यामुळे धूम्रपानाचे सगळे दुष्परिणाम त्याच्या फुप्फुसावर होत असतातच. त्यात कुपोषणाची भर पडली की न्युमोनिया, ब्रॉंकायटिससारखे विकार शरीरात 'ठाण' मांडतात.

'त्यात पुन: नशेबाजाचं कळंदर उध्वस्त जगणं. नशेच्या तारेत भर टळटळीत ऊन असो नाहीतर सोसाटचाचा थंडी पाऊस– नशेबाज सगळी शुद्धबुद्ध हरपून उघड्यावर कुठेही पडलेला असतो. नशा-पाणी न करणारा माणूसही अशा थंडी पावसाने उन्हाने आजारी पडणारच. नि याना तर त्याची जाणीव नसते कित्येक काळ. त्यामुळे नशेबाजाच्या अनारोग्याची गुंतागुंत वाढत राहते. अनेकदा नशेबाजीच्या लाटेत काही घाणरेडी व्यसनं, घाणेरड्या सवयी जडतात. त्यातून नसते वा भलभलते रोग जडतात. पण तब्येतीबद्दल स्वत:च्या शरीराबद्दलच्या आत्यंतिक बेफिकीरीमुळे

त्यांच्याकडे नशेबाज दुर्लक्ष करतो. पण त्याने दुर्लक्ष केलं तरी रोग बळावायचे थांबत नाहीत–मग आणखी गुंतागुंत–नशेबाजाचे आयुष्यमान फार कमी होते ते ह्यामुळे.'

डॉक्टरानी पुस्तकाच्या प्रतीवर पुनः एकवार नजर फिरवली.

'आणखी एक 'सुखभ्रम' किंवा दुःखसफर यांच्याबद्दल थोडी माहिती सांगतो. त्या त्या माणसांच्या मनोभूमिकेवर या व्यसन हस्तांची 'सुखसफर' वा 'दुःखसफर' (ज्याला इंग्रजीत 'गुड ट्रिप' वा 'बॅड ट्रिप' म्हटलं जातं) अवलंबून असते. काही काही माणसं मुळातच असतात विपुल मनोवस्थेने ग्रासलेली. नैराश्यपूर्ण दृष्टीने जगाकडे बघणारी. त्याना बहुधा नशेचा झुरका 'दुःस्वप्ना'चा अनुभव देतो. काही माणसं असतात विलक्षण संशयी. शुद्धीबर असताना देखील ते आपल्याकडे बघून लोक हसतात, आपल्यापाठी आपली टवाली करतात अशा संशयाने ग्रासलेले असतात. अशा व्यक्ती जेव्हा 'नशा' चढवतात तेव्हा त्यांच्या मनातलं संशयपिशाच्च अक्राळ विक्राळ रूप धारण करतं, नि त्यांच्या मानगुटीवर बसतं.

'काही माणसं आधीच मनाने जगापासून अलिप्त झालेली असतात. ते बहुधा स्वतःतच गुरफटून राहतात. जग एकूणच तुच्छ आहे अशा भावनेने जगाकडे बघत असतात. त्यांच्या मनातली ही तुच्छता 'गर्द'वा तत्सम नशिल्या द्रव्यांमुळे अधिकच तीव्र बनते.

'पण नॉर्मल माणसाला मजा वाटते, आनंद मिळतो, असे सांगून जेव्हा नशेचा 'दम' ओढायला दिला जातो तेव्हा बहुधा त्याला त्याद्वारे आनंद–सफर घडते. इथं एक प्रचंड धोका निर्माण होतो. नशेबाजी म्हणजे काहीतरी कमालीचं आनंददायी प्रकरण आहे ही भ्रामक समजूत हा नवा नशिला उराशी बाळगतो; आणि मग व्यसनाधीन बनतो–'

पण व्यसनात गुरफटलेल्या या माणसाना बाहेर काढण्याचा मार्ग कोणता ?

'मार्ग एकच म्हणजे त्यांचा स्वत:चामनोनिर्धार. त्यानी स्वत जर या नशेबाजीचे दुष्परिणाम जाणून घेतले आणि निर्धाराने त्यातून बाहेर पडण्याचा निश्चय केला तर डॉक्टरी इलाज आहेत त्यावर. पण मुळात, त्याला स्वत:ला मनापासून वाटलं पाहिजे तसं की, आपण हे जे करतो आहो ते गैर आहे–'

पण अशी किती माणसं बाहेर पडतात या व्यसनातून ?

डॉक्टर हसले.

'असं बघा, मी डॉक्टर आहे. मला निराश बनून भागणार नाही. एकेक करून एकेका नशेबाजाला त्यातून बाहेर काढण्यासाठी आपण सगळ्यानीच प्रयत्नांची शिकस्त करायला हवी. हो की नाही ?'

परिशिष्ट– ३

मी त्याच्याकडे बघत होते, म्हणण्यापेक्षा तोच माझा अंदाज घेत होता, असं म्हणणं अधिक संयुक्तीक ठरेल.

त्याचे घारे डोळे, आता खुपसे निस्तेज डोळे माझ्या चेहऱ्याचा एकटक वेध घेत होते.

मी तशी त्याला ओळखत होते. तेव्हा तो चांगल्यापैकी कविता करायचा, वाचायचा, चर्चा करायचा, मग तो भेटायचाच बंद झाला. कळलं होतं, तो खूप दारू पितो, गांजा ओढतो, भणंगासारखे आल्या गेलेल्यांकडे पैसे मागतो. ऐकलन तेव्हा वाईट वाटलं होतं. पण ते तेवढ्यापुरतंच होतं.

मग तो असा भेटला.

कुणीतरी संदर्भ दिला नि मी त्याला भेटायला गेले.

सुदैवाने तो मला ओळखत होता. म्हणून मुलाखत ठरण्यात काही अडचण आली नाही.

मध्यस्थ म्हणाले होते, तो आता त्यातून पुरता बाहेर आलाय. पण तरी अगदी बेताने; तो उत्तेजित होईल असं काही विचारू नका त्याला. आणि आणखीही काही सूचना माझ्या मनावर त्याचं ओझं होतच.

बहुधा माझ्या चेहऱ्यावर देखील त्याचा ताण दिसत असणार.

'ओळखलंत मला ?' त्यानेच सुरुवात केली.

ताण एकदम सैलावला. आता सुरुवात करता येईल.

'हल्ली लिहितोस की नाही पहिल्यासारखा? नव्या कविता वगैरे ?'

'ऊं हूं सगळंच सोडलंय आताशा–'

'मग वाचन ?'

'ते मात्र जोरात चालू आहे. त्यानी सांगितलं होतं चरित्र वाच. खूप वाचली मधल्या काळात–'

'त्याचा आवाज एकदम उत्तेजित झाला.

'काय जगतात नाही माणसं ? केवढं विलक्षण, विचक्षण, आयुष्यात अशी नि इतकी अकल्पित वळणं असतात हे सांगूनही खरं वाटणार नाही कुणाला–'

'तुझंच बघ ना–'

भेटल्यानंतर प्रथमच तो मनमोकळं हंसला.

'खरंच तुमचं–'

'त्यासाठीच भेटायला आलेय् मी–बोलू या ?'

'खुशाल.'

घरची चांगली शेती. भाऊ बँकेत चांगला अधिकारी. हा मुंबईला भावाकडेच राह्यचा शिकण्यासाठी. वहिनीही दिराचं मायेनं करायची. भाऊ आस्थेने शिक्षणाकडे बघायचा. कसलीच उणीव नव्हती. रीतसर पदवी घेतली आणि भावाने चांगल्या ठिकाणी नोकरीला डकवून टाकले.

लेखनाचा छंद कॉलेजातच जडला. खूप 'आऊट ल्टॅंडिंग' नाही पण बऱ्यापैकी लिहायला जमायचं. लेखनाच्या आवडीने लेखक, मित्रमंडळींच्या कंपूत उठबस होऊ लागली. बरेचसे नवथर, एकदोघे जरा नाव मिळवलेले.

आपण लेखक आहो याची जाणीव प्रत्येकाने अगदी जपलेली. नि त्याहून जपलेलं आपलं लेखकपण. इतरांना आपण वेगळे आहो हे दाखवण्याचा मग उगीचच आटापिटा. त्यातून अकारण कलंदर वागणं–चालणं तयार झालं.

भाऊ म्हणायचा चालायचंय, तरुण, पोरवय आहे. मार्गी लागला की येईल ताळ्यावर. वहिनी म्हणायची,

'भावोजी निदान केस तरी कापा हो नि ती दाढी ट्रीम तरी करा ना–आणि तो शर्ट द्या बचू काढून धुवायला. किती घाण झालाय–'

तो ज्ञानी माणसासारखा हसायचा नि स्थित प्रज्ञासारखा चालू पडायचा.

लेखक दोस्तांच्या दारूच्या पार्ट्या झडायच्या. पण याला दारू आवडतच नसे. मग ते याला टोकरायचे, चिडवायचे. कधी चिडवणे अगदी इरेच्या टोकाला जायचे.

'हात् लेका, दारू नाही पीत तर स्फूर्ति कसली कपाळाची येणार ? साल्या, डाळभाताने कधी कविता येतात करायला–'

मग ते याच्या कवितांची सालं काढत बसायचे. एकेका ओळीची टिंगल करीत राहयचे. दारू जसजशी चढत जायची तसतशी यांच्या टिंगल टवाळीला आणखीच धार चढायची.

एकदा कडेलोट झाला.

याच्या संतापाने शीग गाठली.

'अरे, दारूचे काय सांगता, याहून भारी नशा करून दाखवतो बघाच तुम्ही–'

त्याच तिरीमिरीत तो बाहेर पडला. ओळखीचा एक बुजूर्ग

लेखक नेमाने चरसी अड्ड्यावर जायचा. हा त्याला भेटला म्हणाला, मला चिलीम दे.

बुजूर्ग बघतच बसला.

'तुम्हारे बस का काम नही बच्चू–'

हा अणखी पिसाटला. त्याचा एकूण अवतार नि आवेश बघून तो हबकलाच. पण याने आठ दिवस त्याचा पिच्छाच सोडला नाही. त्याचा अड्डा याला ठाऊक होता. तो सरळ तिथे दाखल झाला. नि मग जातच राहिला.

सुरुवात कशाने केलीस ?'

'चरस. तशी भांग घेतली होती मी त्या आधी. पण ती निव्वळ गंमत म्हणून. त्याची मजेदार तार तेव्हा त्यावेळ पुरती बरी वाटली होती. पण पुनः पुन्हा ती घ्यावी असं कधीच वाटलं नाही–'

'मग चरस नियमित घ्यायचात का ?'

'इरेलाच पेटलेलो ना–'

'मग त्या तारेत कवितात काही बदल, सुधारणा, नवा उन्मेष वगैरे ?'

'कसलं हो–आता कळतंय हं बग सगळं, नशेत दिसतं, भास होतात त्याना एकतर नसतो शेंडा की बुडखा–पुनः ते असतात हवेतले अगदी आत्मकेंद्रीत अनुभव. आणि तेव्हा तर काही लिहिलं जायचं नाही नि नशा संपली की ते इतस्ततः विखरून पडायचं–'

पण चरस वगैरे नशेच्या पातळीवर तो होता तोवर फारसं काही बिघडलं नव्हतं. तो कामावर जायचा, यायचा. जुन्या लेखक मंडळींच्या अड्ड्यावर अधून मधून जायचा–चिलीम ओढून दाखवायचा. त्यातल्या दोघाचौघाना (एक पोरगीही होती त्यात) त्यानं चिलमीची दीक्षाही दिली.

अड्ड्यावरच कुणी तरी 'गर्द' ची ओळख करून दिली. आणि सगळेच तिरपागडे झाले.

त्याचे तंत्र, आयुष्य आरपार बिघडले. चरस तो दोनचार

दिवसानी घ्यायचा–माफक प्रमाणात. आता गर्द रोजच्या रोज हवीच होती. मग दिवसातून दोन वेळा. तीन वेळा.

चरस घ्यायचा तेव्हा घरी कुणाला पत्ताही नव्हता. पण गर्दने त्याचा इतक्या लौकर 'बकरा' केला की भाऊ, वहिनी पार घाबरूनच गेली. डॉक्टराना आणले. तेव्हा याचा उलगडा झाला. डॉक्टरनी त्याला इस्पितळात दाखल केले.

आई गावाहून आली. अहोरात्र त्याच्या अंथरूणापाशी बसून राहिली. सगळे अंथरूणातच व्हायचे. आईने, वहिनीने त्याची विनातक्रार सेवा केली. त्याला शरमल्यारखे होई. पण विशिष्ट वेळ झाली की जीव कावराबावरा होई.

इस्पितळात जरा तब्बेत सुधारली आणि घरी येताच पुनः पहिले पाढे पंचावन्न पुनः उपचाराचे सगळे फेरे इस्पितळ.

घरात पुनः पाऊल ठेवले तेव्हा समोरच्या खिडकीतून लख्ख उन्हाची तिरीप त्याच्या अंगावर पडली होती आणि समोरच्या आरशात त्याचा उन्हात न्हालेला सांगाडा झुलत होता !

तो आरपार हादरला. भूत बघावे तसे स्वतःचे प्रतिबिंब बघत राहिला. स्वतःचे देखणे, राजस रूप त्याला अस्पष्ट आठवत होते. हे विरूप आपले ?

'जिवंतपणी पिशाच्याचा जन्म लाभलाय असं वाटलं तेव्हा–'

त्या क्षणी गेल्या दोन वर्षांतल्या आयुष्याचा सगळा हिशेब त्याच्या नजरेपुढे तरळला.

खर्ची खूप काही पडलं होतं. रूप, शरीर, तारुण्य, नि मुख्य म्हणजे त्याच्या मनातली कविता, प्रतिभा आणि हाती काय राहिलं होतं ? शून्य.

हजारो उपदेशपर शब्दांना जे साधलं नव्हतं ते त्या प्रतिबिंबानं साधलं होतं.

त्याचे एक वडीलधारे स्नेही होते. लेखन कामाठीच्या

होतकरू उमेदवारीच्या काळात त्यानी याला खूप प्रोत्साहन वगैरे दिले होते. नंतर कान उघाडणीही केली होती. याच्या निरोपासरशी ते खरोखरच आले.

काही दिवस नुसतेच बोलणे चालले. याचे औषधपाणी चालू होते. स्नेही म्हणाले, माझ्या घरी चल. इथे नाही मळ्यातल्या घरी.

तो खरंच गेला. आई सोबतीला गेली. अजून अशक्त होता ना तो.

हवा बदलाचा परिणाम असेल, उपचारांचा परिणाम असेल किंवा त्याच्या मनाच्या निर्धाराचाही असेल; पूर्वी त्याला पुडीची जशी तीव्रतेने आठवण यायची तशी यायची नाही. काही थोडया विवक्षित वेळाच बैचैन करून सोडायच्या.

मग स्नेही त्यावेळेस त्याला आवर्जून बाहेर घेऊन जाऊ लागले. घरातल्या लायब्ररीत चांगली पुस्तके होती. आपल्या मुलाकरवी त्यानी लायब्ररीतून खास मागवून आणली होती.

त्याच्या 'त्या' वेळांची पुरती दक्षता ते घ्यायचे. वाचलेल्या पुस्तकांची चर्चा करायला लावायचे. तो विमनस्क झाला तर त्याला मुद्दाम वादात ओढायचे. त्यानीच त्याच्याकडून चरित्रे, आत्मचरित्रे वाचवून घेतली. (त्यांच्या एका डॉक्टर स्नेह्यांचा खास सल्ला घेऊन त्यानी पुस्तकांची निवड केली होती हे त्याला नंतर कळले.)

मग तो मळ्यात, बागेत रस घेऊ लागला. त्या स्नेह्यांनी त्याला त्याचा छंदच लावला. बी रुजते कसे, वाढते कसे, पाने कशी वर येतात सगळे लक्षपूर्वक बघू लागला.

'खरं तर आमची घरची शेती, पण मी लहानपणापासून भावाकडेच राहिलो ना शिकायला त्यामुळे तिकडे कधी रसच वाटला नव्हता मला'--तो म्हणाला.

तीन महिने तिथे काढले नि तो परत घरी आला.

घरात वाचन चालूच होते. सकाळ संध्याकाळ नियमित फेरफटका.

भाऊ त्याला म्हणत होता, दुसरी नोकरी देऊ का लावून ? आहेत एकजण ओळखीचे–पण हाच नको म्हणाला.

'का नाही पत्करलीस नोकरी ? मी त्याला विचारले.

'मला रस नाही वाटत त्यात–'

'अरे पण असा रिकामा बसलास तर–'

'परत तिकडे वळणार नाही मी–' तो जरा जोरात म्हणाला.

'मग काय करणार ? लेखन ? आत्मचरित्रात्मक पुस्तक?'

'भलतच. एक सांगतो तुम्हाला ते प्रतिबिंब मी तेव्हा पाहिलंन् ना त्या क्षणी वास्तवाला कठोरपणे सामोरा गेलो मी. वस्तुस्थितीपासून दूर पळण्यात कुणाचाच फायदा नसतो. यापुढे मला लेखन नाही जमणार, एवढं उमगलंय मला–'

'मग काय करायचं ठरवलंयस ?'

'शेती. गावी जाऊन शेती करायची. नवी निर्मिती काय फक्त शब्दाद्वारे, रंगातून नाहीतर सुरातालातूनच साधता येते ? झाडावेलीची जोपासना देखील तसा आनंद देऊ शकतात–'

'छान आहे की. महानोरांच्या कविता अशाच उमलल्यात मातीतून. तुझी हरवलेली प्रतिभा कदाचित तशीच सापडेल तुला.'

तो हसला.

'तुमच्या आशीर्वादातली सदिच्छा समजते मला. पण बहुतेक आशीर्वाद म्हणजे निव्वळ आशावाद असतो–'

'असेल; तसंही असेल; पण सदिच्छा नाही बळ असतंच.

'असतं ना. असतंच. आणि ते बळ मनाला निश्चितच उभारी देतं. सध्या मला तरी त्याचीच गरज आहे–!'

★

३१८
दा. मा. २१९४
-१६-

REFBK-0025140


'गर्द' अंधार
गर्द
अनेक घरातले दिवे
या महाभयानक व्यसनाने
कायम विझवले...
आणि तिथे
मरणाचा थंडगार काळोख
पसरला आहे...
गर्द म्हणजे काय?
कुणामुळे नि कसे
फैलावते ते व्यसन?
त्यावर इलाज काय?